नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

युगवाणी

जुलै/ऑगस्ट ८३

7	14	21	28
8		22	29
9	16	23	30
10	17	24	31
11	18	25	
12	19	26	
13	20	27	

15 Independence Day
23 Raksha Bandhan

26 Parsi New Year

AUGUST 1983

॥ पत्रे ॥

□ युगवाणीच्या 'पुस्तके' या सदरात परीक्षणार्थ आलेल्या बहुतेक पुस्तकांची पोच व त्यावरील थोडक्यात मार्मिक अभिप्राय देण्यात आले आहेत. ही पद्धती मला अतिशय आवडली. महाराष्ट्रात इतकी पुस्तके अलिकडे प्रसिद्ध होत आहेत की त्या सर्वांवर वेळच्या वेळी अभिप्राय दिला नाही तर ती तुंबून राहतात. आपली पोच, परिचय व अभिप्रायाची पद्धत स्वागतार्ह आहे. यामुळे एकतर पुस्तक प्रसिद्ध झाल्याचे वाचकांना कळते व दुसरे म्हणजे त्यांची पोच व अभिप्राय तावडतोब मिळत असल्यामुळे प्रकाशक व वाचक खुप असतात. पुस्तकपरिचयामुळे पुस्तक प्रसारालाही मदत होते.

ज्या पुस्तकावर विस्तृत समीक्षण लिहिणे योग्य आहे, असशी काही महत्त्वाची पुस्तके असतात. त्यावर सवडीने विस्तृत परीक्षणे देण्यात आली तर त्या पुस्तकांना योग्य तो मान दिल्याचे श्रेय संपादकांना मिळेल. **—वा. रा. ढवळे**, मुंबई

□ युगवाणीकडे आलेल्या पुस्तकांची पोच आणि काही पुस्तकांचा थोडक्यात परिचय त्वरेने देणाचा प्रयत्न आहे. शिवाय काही महत्त्वपूर्ण पुस्तकांच्या विस्तृत समीक्षालेखांना युगवाणीत स्थान राहील. —संपादक, युगवाणी

□ अंकाचा चेहरा, मुद्रण व मांडणी सुंदर. मात्र कथाचित्रे खटकली. अशा उथळ व अकलात्मक सजावटीची युगवाणीला गरज काय ? **—भ. मा. परसवाळे**, हिंगोली

□ द. भि. कुळकर्ण्यांच्या लेखात बौद्धिक कसरत व ती कसरत करणाऱ्याचे सामर्थ्य दोन्ही दिसतात. विहाईन्ड द न्यूज ही कथा फॅशनेबल. **—के. ज. पुरोहित**, मुंबई

□ दभिंचा लेख वादग्रस्त त्यावर चर्चा हवी. संजय धोतरकरांच्या रेखाटनांनी अंकाला परिसस्पर्श दिला. **—वि. स. जोग**, नागपूर

□ शुद्धलेखनाचा प्रश्न धसास लावण्याची गरज आहे. संस्कृत–हिंदी–मराठी या तिन्हीच्या संदर्भात विचार–फेरविचार व्हावा. **—वि. म. कुळकर्णी**, पुणे

□ युगवाणीला बदलते सामाजिक भान असावे आणि ते युवा लेखकांचें व्यासपीठ व्हावे. हीच काळाशी सुसंगतता ठरेल. **—नारायण सुर्वे**

□ **अन्य पत्रलेखक** तु. ना. काटकर; चंद्रपूर, प्र. श्री. नेरुरकर; मुंबई, म. ल. वऱ्हाडपांडे; दिल्ली, डॉ. वि बा प्रभुदेसाई; नागपूर, शिवराम भोंडेकर; मलकापूर, अशोक दामोदर रानडे; मुंबई, म. ना. अदवंत; पुणे, विजय तेंडुलकर; मुंबई, अवधूत हर्डीकर, पुणे

□ □

अनुक्रमणिका

युगवाणी

वर्ष एकोणचाळीसावे अंक ९ [illegible] जुलै/ऑगस्ट १९८३

• संपादक प्रकाश देशपांडे • कार्यकारी संपादक केशव जोशी

• संपादक मंडळ भा. ल. भोळे, इंदुमती शेवडे, अरुण वेलणकर, पंकज चांदे, अक्षयकुमार काळे

• विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असलेल्या युगवाणीस महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त झाले आहे.

• पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर ४४० ०१२

श्रीकांत कोरे

दान



तो तो राहिला नव्हताच प्रहराप्रहराने वाढत जाणारं त्याचं झपाटलेपण त्याला पुढे पुढेच ओढत होतं. त्याची पावलं क्षणाक्षणाने काळ ओलांडीत निघाली होती. डोळयात एक दिशा नव्हती, डोक्यात ऐच्छिक ठिकाण नव्हत की पावलांना पाऊलवाटेची जाणीव नव्हती. वारं भरलेल्या शरीराला कसलीच पर्वा नसल्यासारखा तो चालला होता

अचानक तो थांबला.

हरवलेल्या जाणिवा त्याच्या शरीरात प्रवेशू लागल्या. आजुबाजूचा कानोसा घेत त्यानं माथं झटकलं. डोळयात शिरलेली दिशा अनोळखी असल्याचं पाहून तो दचकला.

मागे फिरावं का ?

त्याच्या डोक्यातलं प्रश्नचिन्ह भोवरा गरगरावा तसं गरगरलं.

अचानक एक टिटवी कर्कश किंचाळत त्याच्या कानावरून सुसाट गेली. डोंगरमाथ्यावरून खोल दरीत कोसळल्याचा भास झाला. स्वत:ला सावरायचा प्रयत्न करीत तो सावध होऊ लागला.

मागे फिरावं का ? की विलीन व्हावं, या निरभ्र आकाशाच्या निळसर–धवल पट्ट्यांमध्ये ? त्याच्या डोक्यात थांबलेल्या प्रश्नचिन्हाने गरगरून वेग घेतला.

पराभवाची एक अस्पष्ट शिरशिरी त्याला चाटून गेली. हळूच त्याची पावलं मागे वळली.

या उजाड माळरानावर आपण एकटेच आहोत ? त्याची पावलं वेगानं चालू लागली.

घरातून निघतानाचं वारं आता झपाटयाने ओसरू लागलं होतं. घरच्या आठवणीने तो दचकला. ओठांची थरथर नकळत सुरू झाली.

बदफैली !

हृदय फिनेलमध्ये मुरवल्यासारखं सुरकतून गेल्याची तीव्र जाणीव.

तिच्या निर्विकार चेहऱ्यातून डोकावणारे दोन डोळे. पुरुषत्व ओरबाडून काढणारे घणात्कार. असह्य होऊन शरीरात शिरलेलं आयुष्य संपवून टाकणारं वारं !

त्यानंतर तो चिथरला होता, झपाटला होता. तिच्या मेंदूतील रक्त पिण्याचे अमानवी विचार त्याच्या डोक्यात रटरटू लागले होते. पण

सुसंस्कृतपणाचा मज्जाव आणि शरीरात छुपलेल्या असहायतेची अलगद प्रकरणं ! तेव्हाच तो घरापासून दूर सुसाटला होता.

एका अनामिक क्षणाने त्याच्या झपाटल्या शरीराचे लगाम आवळले. तो सावध झाला.

ताजंतवानं आयुष्य क्षणार्धात कुजवून टाकणाऱ्या अनुभवाचं गाठोडं सोबत. आतातल्या सांदिकोपऱ्यात वंदिस्त घुरकटलेली दिशा. तो थोडयाशा ओळखीची वाट शोधीत होता.

कुठवर आलो होतो आपण ? या अनोळखी माळरानावरली वाट इतकी अनोळखी कशी ?

घरी जावं का ?

तो तद्दन छिनाल चेहरा बघावा का पुन्हा ? बुबुळं आणि मेंदूतील धमन्या तटाटून फुटणार तर नाहीत ? आणि.........

अज्ञात गर्तेत शिरल्यासारखी ही वाट कुठं नेतेय आपल्याला ? अज्ञाताकडून अज्ञाताकडे, की आणखी कुठे ?

ज्ञात ? दररोज उष्टावलं जाऊन पातिव्रत्याची जपणूक करणारं शील ! ज्ञात ? षंढत्वाची भावना पोसणारी निर्विकार नजर ! ज्ञात ? उद्ध्वस्त आयुष्य ! ज्ञात ? श्वास रोधू पाहणारी जगवुडी ! या खोल गर्तेतून वाट सापडेल ? कदाचित !

तो आणि त्याच्यातला तो एकाच वेळी विचारांच्या जळमटात अडकवून घेत होते. तो मात्र चालतच होता.

एकाएकी तो थबकला.

समोर पडझडलेली ओसाड विहीर अनोळखी प्रदेश सिद्ध करीत उभी होती.

सुकत जाणाऱ्या घशाची आठवण येऊन तो पुढे झेपावला. डोळे विस्तारीत त्याने आत डोकावलं. तळ मिठीत घेऊन बसलेलं वीतभर पाणी आणि बाकीचा तळ शुष्क, वेडयावाकडया दगडांचे वास्तव्य स्वीकारून.

तो वैतागला. सुकलेल्या गळयातून आवंढा सोडीत त्यानं घसा ओला करण्याचा प्रयत्न केला. पण क्षणभरच.........

ही खोल ओसाड विहीर माझ्या बायकोच्या इंद्रियाचं प्रतिक. ते तळ गाठून बसलेले आजूबाजूचे दगडगोटे तिच्या जारांच्या जननेंद्रियाची प्रतिके !

सुचलेल्या कल्पनेने स्वत:ला विसरून तो खुष झाला. त्यानं मिरमिरून भोवताल पाहिलं. मोकळा श्वास घेत त्याचे अवघडलेले हात आपोआप लांब झाले. मोकळा होत तो विसाव्याची सावली शोधू लागला. क्षणभरात त्याला आपल्या थकल्या अवयवांची जाणीव झाली. पाठीला जमिनीच्या सलगीची आस लागल्यासारखा तो घाईला आला. डोळे बारीक करून तो सावली शोधू लागला. त्याच्या नजरेने एक तीक्ष्ण कोन असलेला भलामोठा दगड टिपला. बाह्यांवरून हात फिरवीत, लांब टांगा टाकीत तो दगडाजवळ पोहोचला. थकल्या अवयवांचे भान सोडून त्यानं हलकेच हवेत शीळ सोडली आणि पाठ थोपटावी तसा दगड थोपटला.

जय हो, जननेंद्रियाची जय हो !

मोठया प्रयासाने दगड उचलण्याचा प्रयत्न करीत तो ओरडला. घामाच्या थेंबाचं दान देत दगड कसाबसा उचलून त्यानं विहिरीच्या मोडक्या कठडयाशी आणला. क्षणभर उसंत घेतली आणि पुन्हा विहिरीच्या तळात डोकावलं.

तसूभर फरक न करता विहीर तशीच निर्विकार होती. त्याचे डोळे कमालीचे विस्फारले.

घे, माझं दान तुझ्या इंद्रियात कायम सामावून घे.

तो त्वेषाने पुटपुटला आणि निर्जिव दगड त्याने ताकतीने विहिरीत ढकलला.

तळातला आवाज आसमंत भेदत पसरला. वीतभर पाणी जीव सभोवती पसरलं, घचकभर पाण्याचे थेंब वर उडून जायच्या आधीच खाली आदळले.

एक विजयी हास्य त्यांच्या डोळयात चमकून चेहऱ्यावर. पसरलं विहिरीच्या आत डोकावत तो खुषीत येऊन खदखदला. त्याला डिवचल्यासारखे त्याच्याच हसण्याचे प्रतिध्वनी खोल विहिरीतून त्याच्या अंगावर धावून आले.

तो दचकला.

त्वेष डोक्यात भरीत तो आणखी खदखदला विहिरीतले प्रतिध्वनी यंत्रवत पुन्हा त्याच्या अंगावर धावून आले. तो पूर्ण बिथरला.

आतडी ताणून तो खदखदला आणि मग घडक्या कठड्यावर मुठी गच्च आवळीत खदखदत राहिला.

विहिरीतली खोली त्याच्या खदखदण्याचे प्रतिध्वनी काढीत निर्विकार होती.

शरीरातलं संपूर्ण रक्त परागंदा झाल्यासारखा तो थकला आणि विहिरीच्या मोडक्या कठड्याचा आसरा घेत रेलून बसला. एका सुखद ग्लानीत त्याने थकल्या पापण्या मिटल्या.

त्याचे अनाहूत दान स्वीकारून विहीर पूर्वीसारखीच होती. निर्विकार !

■ ■

विदर्भ साहित्य संघ नागपूर

निमंत्रण

माननीय सभासद
विदर्भ साहित्य संघ
नागपूर

सप्रेम नमस्कार विनंती विशेष

वि. सा. संघाच्या वतीने वर्षभर सतत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. या सर्व कार्यक्रमांची वैयक्तिक निमंत्रणे सर्व सभासदांना पाठविणे आर्थिक दृष्टया व व्यवहारशःही अशक्यच असते.

वृत्तपत्रात प्रत्येक कार्यक्रमाचे निवेदन स्थानिक / आजचे कार्यक्रम सदरात प्रसिद्ध होत असते. वि. सा. संघाच्या सर्व सभासदांना आग्रहाची विनंती आहे की हे निवेदन म्हणजेच कायमचे आग्रहाचे निमंत्रण समजून सर्व कार्यक्रमांना आपण अगत्यपूर्वक उपस्थित राहावे.

कळावे, लोभ आहेच. कार्यक्रमास उपस्थित राहून त्यात वृद्धी करावी.

आपले

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस

राम शेवाळकर
अध्यक्ष

अनुक्रमणिका

जयंत परांजपे

विलियम फॉकनर : 'द साऊंड अँड द फ्युरी '
(उत्तरार्ध)

५

लेखक जो भावानुभव अभिव्यक्त करू इच्छितो तो मूलत:च संकीर्ण किंवा व्यामिश्र स्वरूपाचा असू शकतो, हे जसे खरे तसेच तो व्यक्त होत असताना, त्याचे शब्दीकरण होत असताना, येणारा अनुभवही तितकाच व्यामिश्र असू शकतो, हेही खरे. एखादे फूल किंवा पान जसे अत्यंत सहजपणे उमलते तशीच कलाकृतीही सहज अवतरावी असे एक स्वच्छंदतावादी कवी म्हणतो. पण सर्वच कलाकृतींच्या बाबतीत असे घडत नाही. कलानिर्मितीच्या कळा या प्रसववेदनेसारख्याच तापदायक ठरतात. धरतीच्या गर्भात खदखदत असलेला लाव्हा नेमका कसा मार्ग काढील, कोणते रूप घेईल हे सांगणे कठीण, तसेच लेखकाचे संपूर्ण अंतर्विश्व ढवळून काढणारा आणि उत्कटपणे वर येऊ पाहणारा अनुभव नेमका कोणता आकार घेईल हेही सांगणे कठीणच. जिथे निरगाठ-उकल सारख्या तांत्रिक चौकटीच्या मर्यादेतच कलाकृती उभारण्याचे प्रयत्न चालू असतात, तिथे हे प्रश्न फारसे त्रासदायक ठरत नाही. भावानुभवातील घटकांची विशिष्ट पद्धतीने जुळवणी आणि मांडणी केल्यामुळे इष्ट परिणाम साधतो हे कळल्यानंतर तो इष्ट परिणाम साधण्यासाठी जुळवणीचे कोणते तंत्र कसे हस्तगत करायचे हे ओघाने येतेच. आणि एकदा 'तंत्र' अवगत झाले की लेखकाच्या घरात वार्षिक पाळणा झुलायला हरकत नसते !

पण जिथे असे नसते तिथेच काही प्रश्न निर्माण होतात. एका बाजूने अभिव्यक्त होऊ पाहणारा भावानुभव मनाचा पुरता ठाव घेतो, लेखकाला व्यापून टाकतो, त्याला अस्वस्थ करतो. तर दुसऱ्या बाजूने या भावानुभवाच्या मूल स्वरूपाला धक्का न लावता, त्याच्या सर्व रंगच्छटांसह तो शब्दात पकडण्याचा लेखक कसोशीने प्रयत्न करीत असतो. अशावेळी लेखन हा एक अनुभव होतो. 'द साऊंड अँड फ्युरी 'सारख्या कादंबरीचे लेखन म्हणजे एक अनुभवच.

या कादंबरीच्या निर्मितीविषयी फॉकनरने स्वत:च केलेले वर्णन फार बोलके आहे. ते त्याच्याच शब्दात वाचणे अधिक चांगले. तो म्हणतो :

'I wrote it five separate times, trying to tell the story, to rid myself of the dream which would continue to anguish me until I did...It began with a mental picture. I didn't realize at the time, it was symbolical. The picture was of the muddy seat of a little girl's drawers in a pear tree, where she could see through a window where her grandmother's funeral was taking place...I had already began to tell the story through the eyes of the idiot child, since I felt that it would be more effective as told by someone capable only of knowing what happened, but not why. I tried to tell it again, the same story

through the eyes of another brother. That was still not it. I told it for the third time through the eyes of the third brother. That was still not it. I tried to gather the pieces together and fill in the gaps making myself the spokesman. It was still not complete, not until fifteen years after the book was published, when I wrote as an appendix to another book the final effort to get the story told and off my mind, so that I myself could have some peace from it.'

उद्धरण जरा लांबले. परंतु या कादंबरीचे स्वरूप समजून घेण्यासाठी निर्मितीप्रक्रियेविषयी फॉकनरनी केलेली विधाने लक्षात घेणे आवश्यकच ठरते. निर्मितीच्या क्षणी मनावर पडणारा ताण, आणि अस्वस्थता आणि ताणक्षयापासून मिळणारी प्रसन्नता मिळविण्यासाठी चालू असणारी तडफड यांचे विलक्षण मनोवेधक चित्र याठिकाणी रेखाटले आहे. त्यामुळेच या विशिष्ट 'अपत्या'-विषयी फॉकनरला विशेष आपुलकी (tenderness) वाटली तर नवल नाही !

तर अशी ही कथा. कॉम्पसन कुटुंबाच्या पतनाची आणि ऱ्हासाची. बेन्जी, क्विंटिन आणि जेसन या कॉम्पसन कुटुंबातील तीन भावांच्या संज्ञाप्रवाही निवेदनातून उलगडत जाते. कथेच्या केन्द्रस्थानी आहे ती तीन भावांची बहिण—कॅडी. तिचे नैतिक अधःपतन हा या कादंबरीतील सर्व तणाव-बिंदूंना जोडणारा धागा, किंवा, थोडे वेगळया शब्दात सांगायचे तर, कादंबरीतील अत्यंत जटिल व गुंतागुंतीच्या भावविश्वाचे केन्द्र (Nucleus). जणू कॅडी ही या तिन्ही भावांच्या भावविश्वाच्या केन्द्रस्थानी आहे. प्रत्येक जण तिच्याविषयी सांगतो आणि तिच्याविषयी बोलता-बोलता स्वतःविषयी, स्वतःच्या कुटुंबाविषयी, इतकेच काय पण दक्षिण परगण्यातील गोऱ्या कुटुंबाच्या ऱ्हासाविषयी खूप खूप सांगून जातो. संज्ञाप्रवाही निवेदनपद्धतीचा अंगिकार करून आत्माविष्कार करणारी या तिन्ही भावांची आत्म-निवेदने म्हणजे कादंबरीचे पहिले तीन भाग. चौथ्या आणि शेवटच्या भागात लेखक स्वतःच समोर येतो आणि पारंपारिक तृतीय पुरुषी निवेदनपद्धतीचा अवलंब करून तीच कथा वेगळया दृष्टिकोनातून सांगू लागतो. याठिकाणी कादंबरीची रचना आणि मांडणी याविषयी अनेक प्रश्न निर्माण होतील. पण ते प्रश्न उपस्थित करण्यापूर्वी आणि त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यापूर्वी पहिल्या तीन भागातील आत्मनिवेदनातून उमलणाऱ्या तीन भावांच्या व्यक्तिरेखांकडे वळणे जास्त हिता-वह ठरेल. याचे महत्त्वाचे कारण असे की हे तीन भाऊ केवळ निवेदक नाहीत; तर कादंबरीत घडणाऱ्या नाटयाचा अविभाज्य भाग असलेल्या तीन स्वतंत्र व्यक्तिरेखा आहेत. मध्यवर्ती संघर्षातून उमललेल्या आणि त्या संघर्षाला कमी-अधिक प्रमाणात जबाबदार असलेल्या या व्यक्तिरेखांचे स्वरूप आकलन झाल्याशिवाय ही कादंबरी देऊ पाहत असलेल्या व्यामिश्र भावानुभवाला सामोरे जाणेच शक्य नाही. या तिन्ही भावांची आत्मगत निवेदने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे बरे-वाईट रंग घेऊन आले आहेत. सर्वसाधारण कोणत्याही पारंपारिक कादंबरीतील व्यक्तिरेखा समजून घेण्यासाठी प्रसंगचित्रणाकडे वळावे लागते; तर 'द साऊंड...' सारख्या कादंबरीत व्यक्तिरेखेचे कंगोरे निवेदनात प्रतिबिंबित होताना दिसतात. म्हणूनच 'द साऊंड...'सारखी कादंबरी आक-लनाच्या कक्षेत आणण्यासाठी तिच्या अभ्यासाची सुरुवात कथेऐवजी व्यक्तिचित्रण आणि निवेदन-शैलीपासून करावी लागते.

६

'द साऊंड...'चा आरंभ बेंजामिनच्या निवेदनापासून होतो. या विभागाच्या शीर्षस्थळी असलेली तारीख आहे एप्रिल ७, १९२८-आणि बेंजामिनचे वय आहे तेहेत्तीस. वरवर पाहता हा तपशील आपल्याला तसा गौण वाटण्याची शक्यता आहे. परंतु या कादंबरीतील एकूण प्रतिकात्मक-तेच्या संदर्भात या क्षुल्लक वाटणाऱ्या तप-शिलालाही अनन्यसाधारण महत्त्व पुढे प्राप्त होते...तर असा हा बेंजामिन किंवा बेन. तेहेत्तीस वर्षाचा असला तरी त्याचं मानसिक वय मात्र पाच सहा वर्षाच्या मुलापेक्षा जास्त नाही. अशा नुसत्या वयाने वाढलेल्या 'मुला'ची शब्दसंपत्ती तरी कितीशी असणार? पण अत्यंत मर्यादित

अनुक्रमणिका

शब्दांचा कौशल्याने वापर करून तेहेत्तीस वर्षांच्या आयुष्यात कॉम्पसन कुटुंबात मागेमागे घडलेल्या अनेक लक्षणीय घटना आणि प्रसंग फॉकनर अशा पद्धतीने हाताळतो की बेनची वेदना तर मूर्त होतेच पण त्याचबरोबर त्याची व्यक्तिरेखा तिच्या सर्व अंगोपांगासह आपल्यासमोर उभी राहते.

मर्यादित शब्द संपत्ती आणि भाषिक पातळीवरील साधी सरळ रचना यामुळे बेनचे हे निवेदन खरं तर अतिशय साधं आणि सोपं आहे. पण बेनची एक फार मोठी अडचण आहे. त्याला वर्तमानकाळ आणि भूतकाळ यातील अंतर ओळखता येत नाही. पंधरा वर्षांपूर्वी घडलेला प्रसंग तो अशा रीतीने सांगतो की जणू काही तो आत्ता याक्षणी आपल्यासमोर घडतो आहे. क्षणभर आपणच कल्पना करू की कालिक संगती, कालानुक्रम किंवा कार्यकारणभाव विचारात न घेता आपल्याच आयुष्यात वेगवेगळ्या क्षणी घडलेले प्रसंग आणि घटना आपण तुकड्या-तुकड्यांनी सांगू लागलो तर कसा गोंधळ उडेल? नेमका असाच काहीसा गोंधळ बेनच्या निवेदनात उडतो. यामुळे पहिल्या भागात जणू दाट धुके निर्माण होते.

वर्तमानकाळ आणि भूतकाळ किंवा भूतकाळातील दोन वेगवेगळ्या क्षणी घडलेले प्रसंग यातील सीमारेषा मिटल्यामुळे गोंधळ उडतो हे खरे. पण त्याचे वेडेपण खरे वाटू लागते. अनुभवाच्या घटकामध्ये कार्यकारणभाव निर्माण करून आकलनाला सोपे जाईल अशा पद्धतीने अनुभवाचे बुद्धिनिष्ट पदांमध्ये रूपांतर करण्याची कुवत बेन्जीमध्ये नाही किंवा कालक्रमानुसार भावानुभवातील घटकांची मांडणी करून किमान पक्षी तो अनुभव समजेल अशा पद्धतीने सांगणेही बेनला शक्य नाही. गमतीचा विरोधाभास असा की बेन अर्धवट आहे, त्याची मानसिक वाढ कुंठित झालेली आहे, आपल्याला वेगळं न सांगताही कळावं इतकी त्याची निवेदनशैली 'प्रभावी' आहे. अर्धवट समजल्या गेलेल्या किंवा ठार वेड्या झालेल्या माणसांची व्यक्तिचित्रणे वाङ्मयात नाहीत असे नाही. पण ती सर्व पात्र 'बाहेरून' रेखाटली आहेत; 'आतून' नाही. एखाद्या अर्धवट मुलाच्या मनात शिरायचे, त्याच्या जाणिवेच्या प्रवाहात स्वतःला झोकून द्यायचे, ही गोष्ट खचितच सोपी नाही. एखादा अर्धवट माणूस 'आतून' रंगवायचा एवढे पुरेसे नाही. तो विश्वसनीय (credible) वाटला पाहिजे. विशेष म्हणजे तो विश्वसनीय वाटण्यासाठी त्याच्या निवेदनात त्याच्या संज्ञाप्रवाहाचा असा काही विलक्षण भास निर्माण व्हायला हवा की वाचकाला क्षणभरही शंका येणार नाही. फॉकनरने हे इंद्रधनुष्य लीलया पेलले आहे छोट्या छोट्या, साध्या-सरळ, विशेषतः संवेदनिक अनुभवावर भर देणाऱ्या वाक्यातून बेन आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो. वर्तमानकाळ आणि भूतकाळ यात फरक करणे बेनला जमत नसेल; पण जे प्रसंग तो निवेदन करतो त्यात त्याची कमीत कमी भावनिक गुंतवणूक असल्याने कुठेही विरूपता (distortion) येत नाही. एका दृष्टीने, त्याचे मन आरशासारखे पारदर्शक आहे. कॉम्प्सन कुटुंबात जे काही घडते ते जसेच्या तसे त्याच्या निवेदनात उमटते. बेनच्या निवेदनात आरशाची प्रतिमा सातत्याने येते. कादंबरीच्या प्रतिकात्मक अर्थविस्तारात या दर्पण-प्रतिमेला वेगळेच महत्त्व येते.

एक व्यक्तिरेखा या नात्याने जेव्हा आपण बेनकडे पाहतो. तेव्हा त्याच्या स्वभावाच्या अनेक छटा आपल्यासमोर येतात. बेन निरागस आहे. निष्पाप आहे तसाच तो आक्रमक आहे, ओंगळवाणा आहे. त्याच्या मानसिक वाढीच्या शक्यताच संपुष्टात आल्यामुळे त्याचे अनुभवविश्व अतिशय मर्यादित आणि बंदिस्त आहे. या बंदिस्त विश्वात एक प्रकारची व्यवस्था अंतर्भूत आहे. कोणताही नवीन अनुभव घेणे, त्या अनुभवाला सामावून घेऊन आंतरिक पुर्नव्यवस्था प्रस्थापित करीत राहणे, हे बेनला केवळ अशक्य आहे. त्याच्या दृष्टीने अनुभव एकतर सुखात्मक किंवा दुःखात्मक असतो. सुखदुःखात्मकता हेच एक मूल्य आहे. दुःखात्मक अनुभवाविरुद्ध आपली प्रतिक्रिया नोंदविण्याचा एकच मार्ग बेनजवळ आहे. आणि ते म्हणजे त्याचे रुदन. लहान मूल रडण्याचा जसा शस्त्रासारखा उपयोग करून घेते त्याचप्रमाणे

एखादी गोष्ट एका विशिष्ट पद्धतीने घडून यावी-यासाठी बेनदेखील या भेसूर रुदनाचा प्रयोग करतो. ठराविक ज्ञात अनुभवापेक्षा थोडया वेगळया अनुभवाला सामोरे जाण्याचा प्रसंग आला की हे रुदन सुरू होते. या अत्यंत बेसूर, भेसूर, दु:खद रुदनाचे विलक्षण वर्णन फॉकनरने शेवटच्या भागात केले आहे. ठराविक रस्ता सोडून लस्टर (कॉम्प्सन कुटुंबातील निग्रो नोकर) घोडागाडी डावीकडे वळवतो. फॉकनर लिहितो :

...Ben Sat, holding the flower in his fist, his gaze empty and untroubled. Luster hit Queenie again and swung her to the left at the monument.

For an instant Ben sat in an utter hiatus. Then he bellowed. Bellow on bellow, his voice mounted with scarce interval for breath. There was more than astonishment in it, it was horror; Shock; agony eyeless, tonguelesr...

इतरांच्याच नव्हे तर प्रत्यक्ष आईच्याही जुगुप्सेचा विषय ठरलेल्या बेन्जीविषयी खऱ्या अर्थाने आस्था, सहानुभूती आणि प्रेम वाटणारी एकुलती एकच व्यक्ती. ती म्हणजे त्याच्यावर निरागस प्रेम करणारी त्याची बहिण-कॅंडी बाल्यावस्थेतील निरागस. निष्पाप कॅंडीची तुलना बेन्जी कळतनकळत झाडं, पानं आणि पाऊस या निसर्गवस्तूंशी करतो. Caddy smells like rain, Caddy smells like leaves, अशी सांवेदनिक अनुभवावर भर देणारी आणि अतार्किक पातळीवर कॅंडीच्या निरागसतेचा निसर्ग प्रतिमांशी संबंध स्थापित करणारी कितीतरी वाक्य निवेदनात येतात. कादंबरीतील अर्थविस्ताराच्या प्रक्रियेत–विशेषत: निसर्ग व भूमी आणि त्यांचे शोषण करू पाहणारा माणूस यांच्यातील संघर्षाच्या संदर्भात या निसर्गप्रतिमांना आणि त्यातील सहसंबंधाना एक वेगळेच महत्त्व प्राप्त होते.

बेन्जीच्या छोटयाशा आणि मर्यादित भावविश्वातील कॅंडीचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेतले तर तिचे त्याच्यापासून दूर जाणे हा त्याच्या व्यक्तिगत आयुष्यातील किती विलक्षण दु:खद अनुभूती असेल त्याची कल्पना सहज येऊ शकते. कॅंडी ज्यावेळी भ्रष्ट होते, तिची निरागसता संपते त्यावेळी तर्काच्या पलीकडील विश्वाच्या अंधारभरल्या गुहेतील अणुरेणू सुरळ नियतीच्या काठावर फुटणाऱ्या निरर्थतकेचे प्रतिध्वनि अंकित करतो. आता त्याची निरागस कॅंडी तशीच राहणार नसते. त्या तिच्या अंगोपांगातून दरवळणारा झाडांचा, फुलांचा आणि पानांचा गंध हरवतो. बेनच्या मनाची विलक्षण जीवघेणी तगमग, तडफड, न सांगता येण्यासारखी वेदना पहिल्या भागाच्या, अखेरीस समर्थपणे व्यक्त झाली आहे. एखाद्या शटलसारखे त्याचे तडफडणारे मन सातत्याने वर्तमानकाळाकडून भूतकाळाकडे आणि भूतकाळातील एखाद्या क्षणापासून दुसऱ्या क्षणाकडे अस्वस्थपणे भरकटत राहते. केवळ निवेदनशैलीच्या माध्यमातून तर्कातीत वेदनेला मूर्त रूप देण्याचा हा प्रयत्न किंवा अमेरिकन वाङमयातच नव्हे तर जागतिक कादंबरी वाङमयातही आगळावेगळा–म्हणूनच वैशिष्टयपूर्ण ठरावा.

७

'द साऊंड......'च्या दुसऱ्या विभागाकडे आपण वळतो तेव्हा कालिकदृष्टया जवळजवळ अठरा वर्ष मागे सरकतो. बेनच्या आत्मगत निवेदनाची तारीख आहे ७ एप्रील १९२८ तर क्विंटिसच्या आत्मगत निवेदनाची तारीख आहे २ जून १९१० क्विंटिनच्या आयुष्यातला हा शेवटचा दिवस. याच दिवसाच्या अखेरीस तो आत्महत्या करतो.

कालक्रमानुसार विचार केला तर बेनच्या आत्मगत निवेदनापूर्वी क्विंटिनचे आत्मगत निवेदन यावयास हवे. पण वेगळया दृष्टीने विचार केला तर बेनचे निवेदन सुरुवातीला देण्यात एक सहेतुक योजकता दिसून येते. ज्या गोष्टी, घटना आणि प्रसंग यावर बेनच्या निवेदनात आपले लक्ष विशेषकरून केंद्रित करण्यात येते त्यातील बव्हंशी घटना बाल्यावस्थेशी संबंधित आहेत. ज्या घटना आणि प्रसंग कादंबरीतील इतर पात्रांना आठवणारही नाहीत, किंवा आठवले तरी ज्यांच्या-विषयी स्मृती अंधुक आणि धूसर राहील, असे पंचवीस-तीस वर्षापूर्वी घडलेले प्रसंग बेनला

स्पष्टपणे आठवतात. शिवाय, त्यात बेनची भावनिक गुंतवणूक कमीत कमी असल्याने त्या प्रसंगांच्या निवेदनात एक प्रकारची वस्तुनिष्ठता प्रत्ययाला येते. ' द साऊंड...' ही एका कुटुंबाच्या ऱ्हासाची आणि पतनाची सूक्ष्म प्रक्रिया अधोरेखांकित करते. अशा कथेचा प्रारंभ बाल्यावस्थेतील विशुद्ध निरागसतेवर भर देणाऱ्या बेंनच्या आत्मगत निवेदनापासून व्हावा हे साहजिकच आहे. फॉकनरच्या कालविषयक संकल्पनेत 'एडेनिक पास्ट' ला एक विशेष महत्त्व आहे. ' एडेनिक भूतकाळ ' म्हणजे कालप्रवाहातील असा एक ' इतिहास–पूर्व ' बिन्दु किंवा क्षण की ज्यावेळी मानवी इतिहास किंवा मानवी जाणिवेच्या अखंड प्रवाहात नैतिक संकल्पनांचा उद्‌भव किंवा शिरकाव झालेला नव्हता. बेनच्या आत्मगत निवेदनातून उमलणारे विश्व हे या ' एडेनिक पास्ट ' ला अतिशय जवळचे आहे. देवदुर्लभ अशी ही निरागसता लोप पावणे म्हणजे एका परीने माणसाच्या ऱ्हासाची आणि पतनाची सुरुवात होण्यासारखेच आहे. ही निरागसता टिकवून ठेवता येत नाही, जीवन व्यवहारात अटळपणे तिला पारखे व्हावे लागते ही एका अर्थाने मानवी शोकात्मिकाच आहे.

कालिक दृष्टया बेनचे विश्व हे केवळ मर्यादित किंवा बंदिस्तच नाही तर अतिशय स्थितीशील आणि स्थिर आहे. या विश्वात बदल, वाढ आणि विकास यांना स्थानच नाही. जणू काल आणि कालकल्पनेत अंतर्भूत असलेला विकास आणि बदल यांच्या ' बाहेरचे ' हे विश्व आहे. बाल्यावस्थेतील निरागस कॅंडी वाढत असते, मोठी होत असते, विकसित होत असते, तिच्यात अपरिहार्यपणे बदल होत असतात. पण हे समजून घेण्याची पात्रताच बेनमध्ये नाही. मानवी जीवनाच्या संदर्भात वाढ, विकास आणि बदल यांचा अर्थ कळणे हे तर बेनच्या बाबतीत केवळ अशक्य आहे. याउलट, क्विंटिनला मात्र त्याची जाणीव आहे, आणि क्लेशदायक जाणिवच त्याच्या दु:खाला कारणीभूत आहे. काळ हाच क्विंटिनचा खरा शत्रू आहे व तो थांबवता येत नाही हेच त्याचे खरे दु:ख आहे.

बेनप्रमाणेच क्विंटिनच्या आत्मगत निवेदनाच्या केन्द्रस्थानी कॅंडीच आहे. बेन अर्धवट आहे, तर क्विंटिन अतिशय संवेदनक्षम आहे. अनुभवाच्या घटकांमध्ये तार्किक संबंध प्रस्थापित करून सुसंगती निर्माण करण्याची क्षमता त्याच्यात आहे. पण जे प्रसंग आणि घटना तो निवेदन करतो त्या त्या घटना आणि प्रसंगांमध्ये त्याची भावनिक गुंतवणूक इतकी जास्त आहे की त्याच्या संज्ञाप्रवाही निवेदनातील व्यक्तिगततःच अडचणीची ठरू पाहते. केवळ ' द साऊंड अँड द फ्युरी 'च्याच नव्हे तर फॉकनरच्या एकूणच कल्पनाजन्य विश्वात क्विंटिन ही एक अत्यंत गुंतागुंतीची आणि व्यामिश्र व्यक्तिरेखा आहे. त्याच्या व्यक्तित्वाचे सर्व गहिरे रंग घेऊनच क्विंटिनचे निवेदन आपल्यापुढे साकारते. क्लिष्टतेकडे आणि क्वचित दुर्बोधतेकडे झुकणारी वाक्यरचना, वेगवेगळ्या व्यक्तींचे आणि घटनांचे संदर्भ, त्याच्या मनात सातत्याने चालू असलेले वाद, मानसिक पातळीवरील नैसर्गिक इच्छांचे दमन करण्यासाठी चालू असलेली धडपड यामुळे हे निवेदन साधे सरळ राहत नाही. बेनच्या निवेदनात स्मृती आणि संवेदना वेगळ्या राहतच नाहीत. परंतु क्विंटिनच्या निवेदनात ज्या आठवणी नोंदविल्या जातात त्या त्याच्या जाणिवेच्या चाळणीतून बाहेर पडत असल्यामुळे त्याच्या शब्दांवर पुरेसा भरवसा ठेवता येत नाही.

क्विंटिनचे जग अनेक बाबतीत बेनच्या जगापेक्षा वेगळे आहे. पण एका बाबतीत मात्र त्या दोहोंमध्ये कमालीचे साधर्म्य आहे. बेनप्रमाणेच क्विंटिनदेखील, काळ, वाढ आणि बदल यांच्या पलीकडे असलेल्या जगात नेऊन ठेवण्याचा प्रयत्न करतो. तो प्रयत्न फसतो तेव्हा स्वत:ला नष्ट करण्याशिवाय दुसरा पर्यायच उरत नाही. कॉम्पसन कुटुंबाच्या मानबिंदूचे रक्षण करण्यासाठी प्युरिटॅनिक संप्रदायाचा हा वारकरी काळाच्या अखंड आणि ओढाळ प्रवाहालाच थोपविण्याचा प्रयत्न करतो. कॅंडीची शुद्धता, पावित्र्य आणि कौमार्य याविषयीची त्याची आग्रही भूमिका आणि त्यांचा कॉम्पसन कुटुंबाच्या प्रतिष्ठेशी (honour) त्याने जोडलेला संबंध यातच त्याच्या अपयशी प्रयत्नांची मुळे दडलेली आहेत. अमूर्ततेतच

(abstraction) रममाण होणारे हे रोमँटिक मन काळाच्या प्रवाहातून स्वतःच्या बहिणीला वेगळे काढून थांबत नाही तर एका दृष्टीने व्यापक मानवी जीवनापासून नैतिकतेलाच वेगळे काढण्याचा प्रयत्न करते.

पण क्विंटिनच्या अंतर्मनातील संघर्षाकडे केवळ अमूर्त पातळीवर (abstract level) पाहून चालणार नाही. या संघर्षाला त्याच्या वैयक्तिक समस्येची कडा आहे; किंबहुना अहंच्या पातळीवर स्वतःच्या बहिणीविषयी वाटणारी अनामिक लैंगिक ओढ आणि सुपरइगोच्या पातळीवर या इच्छेवर आणि प्रेरणेवर येणारे नियंत्रण यामुळे क्विंटिनचे व्यक्तित्व फुटलेले आहे. कॅंडीविषयी वाटणारी ही ओढ आणि आकर्षण, तिच्या सान्निध्यात सतत राहता यावं म्हणून कालप्रवाहाच्या पलीकडे असलेल्या विश्वात तिला ठेवण्याचा केलेला प्रयत्न, काळाच्या पलीकडे तिला ठेवता येत नाही म्हणून भोगलेलं अनाकलनीय दुःख, आणि त्या दुःखाची बोच आणि तीव्रता काळाच्या प्रवाहात हळूहळू कमीकमी होत जाणार म्हणून होणारी तगमग आणि तडफड, आपली लाडकी बहिण ज्याच्या प्रेमात पडली तो निग्रो आहे आणि अशा निग्रो प्रियकराबरोबर ती अनैतिक शय्यासोबत करते हे कळल्यामुळे होणारी उलघाल, त्यातून निर्माण झालेला guilt complex, कॉम्पसन कुटुंबाच्या प्रतिष्ठेसाठी जो गुन्हा प्रत्यक्ष घडला नाही—पण जो वैचारिक पातळीवर घडला—त्याची जबाबदारी आपल्यावर ओढवून घेण्यासाठी चालू असलेली धडपड, त्या धडपडीतून आपल्या बहिणीशी आपले संबंध आहेत हे आपल्या 'सिनिकल' बापाला पटवून देण्याचा केलेला वेडा आणि निष्फळ प्रयत्न यातून जे अत्यंत गुंतागुंतीचे आणि व्यामिश्र असे व्यक्तित्व आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. ते आपल्या अनुकंपेचा विषय ठरते.

क्षणाक्षणाला पुढे सरकणाऱ्या काळाविरुद्ध चालू असलेल्या क्विंटिनच्या लढाईची परिणती क्रमाक्रमाने आत्मताडन, आत्मपीडन आणि शेवटी आत्मनाश यातच होणार याची चाहूल त्याच्या निवेदनाच्या पहिल्या काही पानातच लागते. कालप्रवाहाची सतत आठवण करून देणाऱ्या वस्तूंचे उल्लेख आणि सूचक प्रतिमा क्विंटिनच्या निवेदनात जागोजागी सापडतात. या विभागाची सुरुवातच मुळी एक वर्षापूर्वी भेट म्हणून दिलेल्या घराण्यातील घड्याळापासून होते. हे घड्याळ त्याच्या हाती सुपूर्द करताना मि. कॉम्पसन म्हणतो.

'...I give it to you not that you may remember time, but that you might forget it now and then for a moment and not spend all your breath trying to conquer it. Because no battle is ever won he said. They are not even fought. The field only reveals to man his own folly and despair, and victory is an illusion of the philosophers and fools.'

पण पुढे सरकणाऱ्या काळाला क्विंटिन कधीच विसरू शकत नाही. काळाला जिंकता येत नाही तसाच त्याचा प्रवाहही थांबविता येत नाही. घड्याळाचे काटे तोडून टाकले तरी काळाची टिकटिक चालूच राहते. घड्याळाप्रमाणेच काळाची सतत जाणीव करून देणाऱ्या सावल्यांचे सूचक उल्लेख या निवेदनात येतात. सावली टाळण्याचा, तिला चुकवून पुढे जाण्याचा प्रयत्न फसल्यानंतर क्विंटिन प्रत्यक्ष सावली तुडविण्याचा किंवा धूळभरल्या मातीत ती बुडवून टाकण्याचा प्रयत्न करतो. कळतनकळत सावली आणि स्वतःचे, शारीरिक अस्तित्व यात सायुज्य कल्पिल्यामुळे सावली तुडविणे किंवा ती नष्ट करण्याचा यत्न करणे म्हणजेच प्रतिकात्मक पातळीवर तो आत्मताडनाचा प्रकार ठरतो. सावलीचा एक संदर्भ लैंगिक प्रेरणेशी निगडित आहे. कॅंडी आणि तिचा प्रियकर यांना एकत्र पाहताना क्विंटिनला त्या दोघांच्या सावल्या एकमेकात मिसळल्याचे दिसते. सावली नष्ट करण्याच्या प्रयत्नात पुढील आत्महत्येचे स्पष्ट सूचन होते. कॅंडीच्या कौमार्याविषयीच्या विचाराने पछाडलेले त्याचे मन एका बाजूला तिच्याविषयीच्या अहंच्या पातळीवरील आकर्षणाकडे अंगुलीनिर्देश करते तर दुसऱ्या बाजूला वैचारिक पातळीवर घडलेल्या पापाची जिम्मेदारी स्वीकारण्याला उद्युक्त करणाऱ्या आंतरिक compulsion कडे निर्देश करते. क्विंटिनच्या मनाची ही विलक्षण जीवघेणी तडफड ज्या समर्थ निवेदनशैलीत फॉकनरने शब्दबद्ध केली आहे ती

अनुक्रमणिका

पाहिली की प्रतिभेचा वरदहस्त असणे म्हणजे काय चीज असते त्याची मनोमन खात्री पटते.

८

बेन आणि क्विटिन यांच्या व्यक्तित्वाचे कंगोरे काहीसे तपशीलवार पाहिल्यानंतर जेसनकडे वळताना विस्तारभयास्तव मी हात थोडा आखडता घेणार आहे. तसे केल्याने जेसनवर फारसा अन्याय होईल असेही नाही. पहिल्या दोन आत्मगत निवेदनांच्या तुलनेत जेसनचे आत्मगत निवेदन निश्चितच सुलभ आणि सरळ आहे. शिवाय त्याची व्यक्तिरेखाही फारशी गुंतागुंतीची नाही. फॉकनरच्या शब्दात सांगायचे तर जेसन म्हणजे अवघ्या कॉम्पसन कुटुंबातील एकुलता एक "शहाणा "(Sane) माणूस. पण 'शहाणा' म्हणजे 'चांगला' नव्हे ! तो शहाणा आहे हे जितके खरे तितकेच तो निष्ठूर आणि माणुसकीला पारखा झालेला माणूस आहे हे खरे आहे. कॉम्पसन कुटुंबातील मुलांना आईचे प्रेम देणारी डिलसेसारखी निग्रो दाईसुद्धा त्याच्या स्वभावातील क्रौर्याबद्दल त्याचा अधिक्षेप करताना दिसते. जेसन 'शहाणा' आहे याचा अर्थ इतकाच की व्यावहारिक जगात यशस्वी होण्यासाठी कोणत्या नेमक्या गोष्टी आवश्यक आहेत त्यांची त्याला चांगली जाणीव आहे. खरे तर फॉकनरच्या विश्वातील व्यक्तींच्या संदर्भात चांगला आणि वाईट या शब्दांनाही फारसा अर्थ उरत नाही. उघडउघड काळ्यापांढऱ्या रंगात रंगवलेली निखळ चांगली किंवा वाईट अशी व्यक्ती या जगात क्वचितच सापडायची. त्यामुळेच जेसन क्रूर आणि निष्ठूर असला तरी तोही आपल्या सहानुभूतीचा विषय ठरतो. क्रूर वाटणारा, माणुसकीला पारखा झालेला आणि नैतिकतेची किंवा मानवी संबंधात अनुस्यूत असलेल्या कोणत्याही मूल्यांची तमा न बाळगता मिळेल त्या मार्गाने पैसा गाठीला लावण्याच्या ध्यासाने झपाटलेला जेसनसारखा माणूसदेखील आपल्या सहानुभूतीचा विषय ठरावा हीसुद्धा प्रतिभेची करामतच म्हटली पाहिजे.

बेनचे निवेदन वाचताना. हाताच्या मुठीत पैसा दडवून ठेवणाऱ्या जेसनची जी मूर्ती डोळ्यासमोर उभी राहते तिचेच विकसित रूप म्हणजे तिसऱ्या विभागातील जेसनची व्यक्तिरेखा. पैशापुढे सहज स्वाभाविक मानवी संबंधसुद्धा इथे दुय्यम ठरतात. कॉम्पसन कुटुंबात वाढत असलेल्या आपल्या लेकीचे केवळ मुखदर्शन व्हावे म्हणून कॅडी जेसनला विनविते तेव्हा तिच्यापासूनसुद्धा पैसा उकळविण्याची संधी तो दवडत नाही. नैसर्गिक भावभावना व इच्छा इतक्या पूर्णपणे दडपलेल्या आहेत की पैसा घेताना आंतरमनाची टोचणीसुद्धा जेसनला जाणवत नाही.

आपण जेसनकडे वळतो; तत्पूर्वीच कादंबरीत आलेल्या सर्व व्यक्तिरेखा आणि त्यांचे आंतर्संबंध आपल्याला पूर्णपणे कळले असतात. किंबहुना ते सगळे आंतर्संबंध लक्षात घेऊनच आपण जेसनच्या निवेदनाकडे वळतो. त्यामुळे त्याचे निवेदन वाचताना चुकीच्या घटकावर भर देण्याची शक्यता उरत नाही.

जेसनच्या आत्मगत निवेदनाची तारीख आहे ८ एप्रिल १९२८. १९१० ते १९२८ या काळात पुष्कळच घटना घडलेल्या असतात. डाल्टन एमिस प्रकरणानंतर क्विटनच्या मृत्यूपूर्वीच कॅडीचा हर्बर्टशी विवाह होतो आणि थोड्याच काळात घटस्फोटही होतो. कुटुंबाची प्रतिष्ठा धुळीला मिळवू पाहणाऱ्या कॅडीला घराची दारे बंद होतात आणि अधोगतीला लागलेल्या या मुलीला सावरण्याचा निष्फळ प्रयत्न कॉम्पसन कुटुंब करीत राहते. त्याचवेळी तिची लहानशी प्रतिमा–क्विटिन–या घरात लहानाची मोठी होते. मि. कॉम्पसनचा देहांत होऊन बरीच वर्षे उलटली असतात. प्रेमाच्या ज्या रज्जूंनी कुटुंबातील घटक एकत्र बांधले जातात तेच तुटल्यामुळे दिशाहीन झालेल्या जहाजासारखी या कुटुंबाची स्थिती होते. प्रेम या शब्दाचा अर्थही ठाऊक नसलेल्या जेसनसारख्या व्यक्तीच्या करड्या शिस्तीच्या अंमलाखाली व्यावहारिक अर्थाने घर सुरळीत चालल्याचा भास होत असला तरी ते खऱ्या अर्थाने आतून कोलमडलेले असते.

कॅडीचे चारित्र्य, तिचे कौमार्य आणि अधोगती याविषयी कुठली खंत किंवा टोचणी जेसनच्या मनाला नसते, हे तर उघडच आहे. त्याचा तिचा संबंध उरतो तो फक्त पैशापुरता

आणि पैशासाठीच. क्विंटिनच्या संगोपनासाठी कॅंडी पाठवीत असलेला पैसा इतरांना कळू न देता तो गुप्तपणे जमवीत राहतो. कॅंडीच्या नवऱ्याने आश्वासित केलेली नोकरी मिळण्यापूर्वीच गमवावी लागली याची खंत मात्र जेसन कधीही विसरू शकत नाही. आपल्यावर झालेल्या या अन्यायापायी कॅंडीकडून अशा रीतीने पैसा उकळताना त्याला दिक्कत वाटत नाही.

– आणि ८ एप्रिल १९२८ ला कॉम्पसन कुटुंबाला शेवटचा धक्का बसतो. तारुण्याच्या उंबरठ्यावर उभी कॅंडीची मुलगी–क्विंटिन–एका लाल टायवाल्या मुलाबरोबर पळून जाते आणि जाताजाता जेसनने गुप्तपणे जमविलेली मायाही बरोबर घेऊन जाते. पाठोपाठच तिला पकडण्यासाठी–खरं तर तिने पळविलेली पैशाची टिन बॉक्स हस्तगत करण्यासाठी–जेसनची धावपळ आणि पाठलाग सुरू होतो.

कालदृष्टचा जेसन फक्त वर्तमानातच जगतो. झपाट्याने पुढे धावत असलेल्या वर्तमानाला 'पकडण्याची' धमपड करतो. वेळेवर पोचण्यासाठी निघतो आणि नेमका थोडा उशीरा जाऊन पोहोचतो. पुढे धावणाऱ्या काळाशी स्पर्धा करू पाहणारा जेसन काळाकडून ठायीठायी पराभूत होत राहतो. क्विंटिन आणि लाल टायवाल्या अनामिक तरुणाचा पाठलागही असाच निष्फळ ठरतो. नैराश्याने झपाटलेल्या अवस्थेत काळाकडून पुन्हा एकदा पराभूत झालेला जेसन परत फिरतो. पण याहीक्षणी त्याला व्यवहाराशिवाय दुसरे काही सुचत नाही.

'...Of his niece he did not think at all, nor the arbitrary valuation of money. Neither of them had entity or individuality for him for ten years; together they merely symbolized the job in the bank of which he had been deprived before he ever got it.'

९

असे हे कॉम्पसन कुटुंब दारूत बुडलेला 'सिनिकल' बाप, आजाराचे सोंग घेऊन आयुष्यातील समस्या चुकविणारी आई, नुसता वयाने वाढलेला एक अर्धवट मुलगा, बहिणीच्या कौमार्याविषयीच्या विकृत जाणिवेनं पछाडलेला दुसरा मुलगा, पैसा हेच सारसर्वस्व मानून मानवीसंबंधांना हीन लेखणारा तिसरा मुलगा, गावातल्या उनाड तरुणाबरोबर पळून जाणारी मुलगी–मानसिक किंवा शारीरिकदृष्टया अपंग असलेले, काहीसे विकृतीकडे झुकणारे, आजारी माणसांचे हे जग. या जगात दिलासा देणारी एकच व्यक्ती आणि ती म्हणजे डिल्से. स्वतःच्या मानापमानाकडे दुर्लक्ष करून कॉम्पसन कुटुंबाची सेवा करणारी आणि आईचे प्रेम गमावून बसलेल्या मुलांवर प्रेमाचा वर्षाव करणारी निग्रो डिल्से म्हणजे या रुग्णांच्या जगातील सुप्त आश्वासन आहे. डिल्से नसती तर अतार्किकाच्या खडकावर आदळून हे जग केव्हाच फुटून गेले असते. कॉम्पसन कुटुंबात घडलेल्या अनेक नाटयपूर्ण घटनांची ती एकमेव साक्षीदार आहे. छोटया क्विंटिनच्या पलायनानंतर संथ शब्दात 'I seed de beginnin, en now I sees de endin' अशी जी प्रतिक्रिया व्यक्त करते ते फार अर्थपूर्ण आहे.

डिल्सेजवळ कोणतेही तत्त्वज्ञान नाही. तिच्याजवळ आहे प्रेम करण्याची आणि सोशिकपणे सहन करण्याची अद्भूत शक्ती. म्हणूनच, या कादंबरीविषयी बोलताना, वॉलिंगसारखा टीकाकार म्हणतो ते खोटे वाटत नाही. अंतिम विश्लेषणात 'द साऊंड...'चा विषय प्रेम हाच आहे. डिल्से जे शिकते ते सर्व साध्यासरळ जीवन व्यवहारातून. त्यामुळेच काळाला थांप' विण्याचा, त्यावर विजय मिळविण्याचा, किंवा वर्तमानाशी स्पर्धा करण्याचा निरर्थक आणि निष्फळ प्रयत्न ती करीत नाही. त्याचबरोबर काळाकडून पराभूतही होत नाही.

डिल्सेची काळाकडे पाहण्याची निरोगी दृष्टी एक लहानशा सूचक प्रसंगात व्यक्त झालेली आहे. सकाळच्या वेळी स्वयंपाकघरात काम करीत असलेली डिल्से एक काटा तुटलेल्या घडयाळाचे पाच ठोके ऐकते. आणि चटकन् म्हणते "आठ वाजले." भोवतालच्या विसंगत आणि विक्षिप्त जगात वावरताना ती अतिशय स्वस्थ आणि शांत आहे. कालदर्शक काटा वेळ दाखविताना जरी

चुकला तरी चुकीची दुरुस्ती करून परिस्थितीशी योग्य ते समायोजन कसे साधायचे ते तिला चांगले ठाऊक आहे. म्हणूनच कॉम्पसन्सच्या आजारी जगातील एक नैतिक 'नार्म' म्हणून डिल्सेकडे पाहिले तर फारसे चुकणार नाही.

१०

रचना, तंत्र, निवेदनशैली, भाषाशैली, व्यक्तिचित्रण, पोत इ. अनेक दृष्टिकोनातून या कादंबरीकडे पाहता येते आणि कोणत्याही दृष्टिकोनातून केलेला अभ्यास फलदायी ठरण्याच्याच शक्यता अधिक आहेत. एक वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरीकडे पाहताना ज्या मूलभूत स्वरूपाच्या प्रश्नांशी आणि संकल्पनांशी आपला संबंध येतो ते प्रश्न आणि संकल्पना स्पष्ट होण्यासाठी तर 'द साऊंड...' सारख्या कादंबरीचा सूक्ष्म अभ्यास होणे अगत्याचे आहे. एक विलक्षण झपाटून टाकणारा आणि अत्यंत व्यामिश्र स्वरूपाचा आनंद तर ही कलाकृती देतेच, पण वास्तवापेक्षाही अधिक वास्तव वाटणाऱ्या या कल्पनानिर्मित जगात अत्यंत व्यक्तिसंबंध अशी विशिष्ट (particular) वेदना सार्वकालीन आणि सार्वत्रिक पातळीवर कशी जाते त्याचेही उत्तम दिग्दर्शन इथे घडते. प्रतिकाच्या पातळीवर अर्थ ध्वनित करणाऱ्या सूचक प्रतिमा, ख्रिस्ताच्या जीवनातील समांतर प्रसंगाचे सूचन करणारे अर्थगर्भ संदर्भ यामुळे अर्थविस्ताराची प्रक्रिया चालूच रहाते; पण त्याचवेळी अर्थाच्या विलग विलग होणाऱ्या अनेक पदरांमधून एकसमजावच्छेदेकरून जो एकजिनसी आणि एकघन स्वरूपाचा अनुभव आपल्याला येतो त्यामुळे आपण मोहित होतो.

■ ■

अनुक्रमणिका

ना. वा. ठेंगडी

गुरुचरित्रातील सायंदेव

'श्रीगुरुचरित्र' हा सरस्वती गंगाधरांनी पाच-सहा शतकांपूर्वी लिहिलेला ग्रंथ दत्तसांप्रदायिकांचा मान्यग्रंथ समजला जातो. इसवी सनाच्या तेराव्या शतकात जे नृसिंह सरस्वती या नावाचे दुसरे दत्तावतार झाले, त्यांच्या अवतारकार्याचे विवरण करणारा हा ग्रंथ आहे. या ग्रंथासंबंधी ज्यांच्याशी बोलण्याचा प्रसंग आला, त्या सार्‍यांनी माझे या ग्रंथाच्या चौदाव्या अध्यायाकडे लक्ष वेधले. काहींनी चौदाव्या अध्यायाला 'श्रीगुरुचरित्रा'चा कळसाध्याय म्हटले. गुरू आणि शिष्य यांच्या संबंधात वात्सल्याचा जो धागा असतो, तो यात पूर्णपणे दृष्टिगोचर होतो. श्रीनृसिंहसरस्वतीचे सायंदेवाबद्दलचे जे प्रेम या अध्यायातून व्यक्त होते, त्याची तुलना आईच्या मुलावर असणाऱ्या प्रेमाशीच होऊ शकते. शिष्याविषयीचा असा वात्सल्यभाव गुरुचरित्राच्या दुसऱ्या कोणत्याही अध्यायात आढळत नाही, म्हणून हा गुरुचरित्राचा कळसाध्याय ठरतो, असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. काहींचे म्हणणे असे आहे की, यवनांचे राज्य असल्यामुळे हिंदू धर्मावर जी आपत्ती आली होती, तिचे दिग्दर्शन या अध्यायात आहे आणि क्रूर अशा यवनराजापासून आपल्या भक्ताचे रक्षण स्वामींनी येथे केले असल्यामुळे यावनी वृत्तीच्या प्रतिकाराचा संकेत या अध्यायातून मिळतो. हिंदू धर्माच्या ऱ्हासकाळात या धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी स्वामींचा अवतार झालेला असल्यामुळे, मुसलमान राजाच्या संकटापासून हिंदू भक्ताला अभयदान देण्याची कथा सांगणारा हा अध्याय संपूर्ण गुरुचरित्राचा प्रातिनिधिक अध्याय ठरतो. या अर्थाने काही लोक या अध्यायाला कळसाध्याय म्हणतात.

चौदावा अध्याय हा सायंदेवाचा अध्याय असला, तरी सायंदेव प्रथम प्रकट होतात, ते तेराव्या अध्यायात. पोटदुखीने त्रस्त झालेला एक ब्राह्मण, व्याधी असह्य झाल्यामुळे, आत्महत्या करण्यासाठी म्हणून गोदातटाकी येतो. गोदामातेला शरीर अर्पण करणे, हा त्याचा हेतू असतो. पोटदुखीमुळे तो गोदानदीच्या वाळूत अक्षरशः गडबडा लोळत असतो. श्रीनृसिंहसरस्वती स्वामी त्याला पाहतात आणि आजुबाजूच्या शिष्यांजवळ त्याची चौकशी करतात. ते स्वामींना त्या ब्राह्मणाचा वृत्तांत सांगतात. थोडेसे अन्न जरी खाण्यात आले, तरी हा ब्राह्मण पोटशूळाने कसा त्रस्त होतो आणि या अर्थाने अन्न हे त्याच्यासाठी कसे शाप ठरले आहे, हे ते विशद करतात. स्वामी दुरून जात असलेल्या दुसऱ्या एका ब्राह्मणाला बोलावतात आणि या पोटदुखीच्या ब्राह्मणाची जेवणाची व्यवस्था करायला सांगतात. पंचपक्वान्नांनी युक्त असे जेवण तयार करून त्याला वाढा, असे सांगतात. हा ब्राह्मण घाबरतो. ज्याला अन्न हे विषासारखे प्राणघातक असते, त्याला ते खाऊ घातले, तर मस्तकी ब्रह्महत्येचे पातक येईल, अशी त्याला वाटणारी भीती तो व्यक्त करतो. परंतु स्वामी त्याला काहीही होणार नाही, असे सांगतात. अन्न हेच याचे औषध आहे, असे सांगतात. स्वामींचे म्हणणे शिरोधार्य मानून तो आपल्या घरी भोजनाचा थाट करतो, पक्वान्न करतो. जेवणाला त्या ब्राह्मणाच्या पंगतीला स्वतः स्वामी आणि त्यांचे शिष्य असतात. पोटभर जेवण करूनही ब्राह्मणाचे पोट दुखत नाही. थोडक्यात, ब्राह्मणाचा पोटदुखीचा रोग बरा होतो. रस्त्यावरून दुरून जात असलेल्या

ज्या ब्राह्मणाला पाहून स्वामी जवळ बोलावतात व पोटदुखीच्या पंचपक्वान्नयुक्त भोजनाची व्यवस्था करायला सांगतात. तो ब्राह्मण म्हणजेच हा सायंदेव.

चौदाव्या अध्यायात हा सायंदेव स्वामींना अशी विनंती करतो की, त्यांनी आपल्याला शिष्य करून घ्यावे. त्यांनी नुसते आपल्यालाच शिष्य करू नये, तर आपल्या पुत्रपौत्रांनाही करावे, अशी विनंती सायंदेव करतो. 'वंशोवंशी' भक्ती द्यावी, अशी त्याची प्रार्थना असते. ही या सायंदेवाची विनंती स्वामींनी पूर्ण केली, असे आपल्याला दिसते. सायंदेवाच्या वंशातच मुळी गुरुभक्ती रुजून बसते. सायंदेवाचा मुलगा नागनाथ, नागनाथाचा मुलगा गंगाधर आणि गंगाधराचा मुलगा सरस्वती अशी ही वंशोवंशीची भक्तिपरंपरा आहे. नागनाथ हा सायंदेवापेक्षाही काकणभर सरसच ठरावा, असा स्वामींचा भक्त आहे. त्याचे तसे वर्णन आहे. गंगाधरांच्या गुरुभक्तीबद्दल 'गुरुचरित्रा'त माहिती उपलब्ध नाही. त्याचा मुलगा सरस्वती मात्र निस्सीम भक्त आहे. गुरूच्या भेटीची त्याला जी ओढ लागते तिचे गुरुचरित्रात आलेले वर्णन खरोखरीच अंतःकरण हलवून सोडणारे आहे. सरस्वतींनी परोपरीने केलेली आळवणी आपल्या कायमची लक्षात राहते. उत्कट भक्तीचा तो आवेग आहे. सरस्वतींना गुरूंचे दर्शन होते. गुरू त्यांना 'माझे चरित्र लिही,' असे सांगतात. ते गुरूंकडे 'मतिप्रकाशा'ची मागणी करतात. आपल्या हृदयात निवास करावा आणि गुरुचरित्र कथन करावे, अशी विनवणी करतात. पुढे सिद्ध त्यांना भेटतात आणि तेच आपल्या मुखाने गुरुचरित्र कथन करतात. सिद्ध हे गुरूंच्या चार प्रमुख शिष्यांपैकी एक. गुरू शेवटी शैलयात्रेला जायला निघतात, त्यावेळी त्यांना निरोप देण्याकरिता जे चार शिष्य त्यांच्याजवळ असतात, त्यांच्यापैकी हे सिद्ध. सिद्धांच्या मुखातून निघालेले गुरुचरित्र सरस्वती ग्रथित करतात. 'सरस्वती' हे नाव आणि 'नृसिंहसरस्वती' या नावातील 'सरस्वती' हे नाव–या साधर्म्यामुळे सरस्वती स्वतःला नामधारक म्हणतात.

अशा रीतीने, गुरुचरित्राचे लेखक सरस्वती हे सायंदेवाचे पणतू. सायंदेव पुढे आपल्याला एकेचाळीसाव्या अध्यायात भेटतात. एकेचाळीस, बेचाळीस आणि त्रेचाळीस हे अध्याय सायंदेवाचे आहेत. एकेचाळीसाव्या अध्यायात स्वामी सायंदेवाकडून सेवा करवून घेऊन त्याची परीक्षा पाहतात. तो त्या परीक्षेला उतरतो. पुढे बेचाळीसाव्या अध्यायात सायंदेव स्त्रीपुत्रांसहवर्तमान स्वामींच्या सेवेत दाखल होतो. त्रेचाळीसाव्या अध्यायात स्वामींनी सायंदेवाला अनंतव्रताचा महिमा सांगितला आहे. तेरावा, चौदावा, एकेचाळिसावा, बेचाळिसावा आणि त्रेचाळिसावा असे पाच अध्याय सायंदेवाचे आहेत. कुणाची परीक्षा पाहून त्याला शिष्य करून घेतल्याचे उदाहरण फक्त सायंदेवाचेच दिसते. वंशोवंशी भक्ती देण्याचे आश्वासन फक्त सायंदेवालाच दिलेले आहे. वंशोवंशी भक्ती मिळावी, असे वरदान मागणे आणि ते मिळणे, हे फक्त सायंदेवाच्याच वाट्तीत घडले आहे. या अर्थाने सायंदेव इतर शिष्यांहून वेगळे ठरतात. चौदाव्या अध्यायाची कथा अत्यंत मनोवेधक आहे. दरवर्षी एक ब्राह्मण ठार मारण्याची यवन राजाची परिपाठी आहे. त्या वर्षी सायंदेवाची पाळी असते. "प्रतिसंवत्सरी ब्राह्मणासी । घात करितो जीवेसी । याचि कारणे आम्हासी । बोलावितसें मज आजी" ।। असे आपल्यावरील या प्राणसंकटाचे वर्णन सायंदेव स्वामींजवळ करतो. या संकटातून आपले संरक्षण करावे, असे विनवितो. "तू जा. तुला काहीही होणार नाही. उलट तो म्लेंछ राजा तुला सन्मानाने परत पाठवील," असे स्वामी सायंदेवाला सांगतात. ते असेही सांगतात की, "तू त्या म्लेंछ राजाकडून येईपर्यंत मी इथेच थांबतो."

इथे एक गंमत आहे. एक म्लेंछ राजा आपल्या प्राणाचा घात करू पाहतो आहे, हा विषय सायंदेवाच्या डोक्यात एकदम आलेला नाही. सायंदेव हा सामान्य मनुष्य असता, तर चमत्कार करून दाखविणाऱ्या या बुवाजवळ त्याने सर्वात आधी स्वतःच्या प्राणाचे अभयदान मागितले असते. परंतु सायंदेवाने तसे केले नाही. आधी त्याने श्रीचरणांची अखंड भक्ती आणि वंशपरंपरागत भक्ती असे वरदान मागितले. नंतर मग ओघा-

ओघात निघाल्यासारखा यवन राजाच्या बोलावण्याचा विषय निघाला. सायंदेव यवन राजाला भेटावयास जातो. त्या आधीच यवन राजाला निद्रा आलेली असते. अकारणच. या निद्रेतच त्या यवनाला स्वप्न पडते; कोणी एक ब्राह्मण आपल्यावर शस्त्रांचा आघात करून आपले अवयव तोडीत आहे. तसाच तो दचकून उठतो आणि शयनगृहातून बाहेर येतो. बाहेर येताच त्याला सायंदेव दिसतो. "तुला येथे कोणी बोलाविले? तू येथे का आलास?" असे तो यवन सायंदेवाला विचारतो. त्याला वस्त्रे व भूषणे देऊन आणि त्याचा मानसन्मान करून यवन त्याला परत पाठवितो. यामुळे आनंदित झालेला सायंदेव घाईघाईने येऊन स्वामींना भेटतो. स्वामींचे चरण कधीही अंतरू नयेत, अशी करुणा भाकतो. परंतु स्वामींची योजना वेगळी असते. आपल्याला तीर्थयात्रेला जावयाचे आहे, असे स्वामी सांगतात. "तू आता माझ्या मागे न लागता तुझा संसार नीट कर. आजपासून पंधरा वर्षांनी मी तुझ्या गावाजवळ रहायला येईन, तेव्हा तू तेथे कलत्र-पुत्रासहित येऊन मला भेट," असे स्वामी त्याला म्हणतात. बायकोमुलांसहित शिष्याला बोलावण्याचे 'गुरुचरित्रा'तील हे एकमेव उदाहरण आहे.

सायंदेवाने नीट संसार करावा आणि वंशविस्तार साधावा ही स्वामींची इच्छा होती, हे उघड आहे. पंधरा वर्षात सायंदेवाच्या संसाराने चांगलेच बाळसे धरले आणि अशा बाळसे धरलेल्या संसारासह सायंदेव शेवटी स्वामींना शरण गेला. एकेचाळिसाव्या अध्यायात स्वामींनी सायंदेवाची परीक्षा पाहिली, असे आपल्याला दिसते. उघड डोळ्यांना दिसणारी ही परीक्षा आहे. परंतु सायंदेवाची दुसरीही एक परीक्षा त्या आधी होऊन गेली आहे. ती परीक्षा आपल्याला उघडचा डोळ्यांनी दिसली नाही, म्हणून आपण आपल्या मनाशी तिची नोंद केली नाही. ती परीक्षा अशी होती. मधल्या पंधरा वर्षात सायंदेवाला स्वामींचे एकदाही दर्शन झाले नाही. स्वामींच्या कृपेचे फळ वाटावे, अशी कोणती घटना सायंदेवाच्या जीवनात घडल्याची नोंद नाही. स्वामींचा म्हणून एखादा चमत्कार त्याच्या जीवनात या मधल्या काळात घडला, असेही दिसत नाही. असे असताना, केवळ एकदा झालेल्या भेटीचा धागा हाताशी घेऊन पुढे पंधरा वर्षे हा शिष्य त्याच्या मनातील आपल्याविषयीची भक्ती कायम ठेवू शकतो काय पहिल्या भेटीच्या वेळी त्याच्या मनात भक्तीची जी उत्कटता होती, तीच पंधरा वर्षांनंतरही कायम राहू शकते काय, हे स्वामींना पहावयाचे होते. पंधरा वर्षांचा काळ हा काही छोटा काळ नव्हे. त्या काळात अनेक साधू, संत, महात्मे, विभूती भेटून जाऊ शकतात. सायंदेवाच्या धर्माचरणी वृत्तीचे, सद्वर्तनाचे आणि आतिथ्यशीलतेचे जे वर्णन आले आहे, त्यावरून, त्याने मधल्या काळात अनेक साधुसंतांना आपल्या घरी आतिथ्यपूर्वक बोलविले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

परंतु या साधू-संतांपैकी कोणाचाही प्रभाव सायंदेवावर पडलेला नाही. एकदा स्वामींची मूर्ती त्याने जी आपल्या अंतःकरणात ठसविली, ती सतत पंधरा वर्षे तशीच कायम होती. दुसरीही एक परीक्षा सायंदेवाने या काळात दिली, ही सुद्धा गुप्त परीक्षाच होती. आपल्या बायका आणि आपली मुले यांची वृत्तीही आपल्यासारखीच सतत पंधरा वर्षे स्वामींच्या चरणी लीन करून ठेवण्याचे काम सायंदेवाने केले आहे. आपण अठराव्या-घेवड्याच्या शेंगांच्या-अध्यायात असे पाहतो की, स्वामींनी दारीचा घेवड्याचा वेल तोडून टाकल्यानंतरही ब्राह्मणाच्या मनात कुठलाही विकल्प येत नाही, परंतु त्याच्या पत्नीच्या आणि मुलांच्या मनात विकल्प येतो. पुढे अठ्ठेचाळीसाव्या अध्यायात आपल्याला एक कुळवाडी भेटतो. स्वामींनी सांगितल्याबरोबर तो आपले उभे पीक कापून काढतो. त्याच्या मनात कुठलाही किंतू येत नाही, परंतु त्याची बायको-मुले मात्र अक्षरशः आकाशपाताळ एक करतात. ही उदाहरणे आपल्याला माहित असल्यामुळे, सायंदेवाने पंधरा वर्षे आपल्या संपूर्ण कुटुंबातील गुरुभक्ती टिकवून ठेवली, ही त्याच्या कर्तृत्वाचीच एक बाब वाटते. कुटुंब म्हटले की, त्यात अनेक गोष्टी चालणार. रोज घडणाऱ्या घटना वेगवेगळ्या प्रकारच्या असणार. घटनांच्या त्या भिन्नतेतही गुरुभक्तीचा धागा सतत कायम

रहावा, यासाठी सायंदेवाने कुठली तरी एक संस्कारव्यवस्था आपल्या कुटुंबात निर्माण करून ठेवली असली पाहिजे. रोजच्या ठराविक संस्काराशिवाय भक्तीचा भाव सतत टिकवून ठेवणे कठीण आहे. सायंदेवाने आपल्या साऱ्या कुटुंबावर सतत हे संस्कार केले असले पाहिजेत.

सायंदेव गुप्त अशा दोन परीक्षांमधून पार पडला आणि उघड अशा एका परीक्षेतून पार पडला. स्वामींचे इतर जे शिष्य झाले ते आणि सायंदेव यांच्यात एक फार मोठा फरक दिसतो. एखादा चमत्कार घडला आणि शिष्य झाला, असे इतर प्रत्येक बाबतीत घडले आहे. परंतु सायंदेवाच्या मनात स्वामींना पाहताक्षणीच त्यांच्याविषयी भक्ती उत्पन्न झालेली आहे. म्हणूनच, ब्राह्मणाच्या हत्येच्या पातकाचा धोका पत्करूनही तो, स्वामींच्या शब्दाखातर, त्याला जेवू घालायला तयार होतो. गुरुचरित्रात सायंदेवाइतकाच प्रभावी दुसरा एक शिष्य आहे. त्रिविक्रम त्याचे नाव. तेविसाव्या अध्यायापासून एकोणतिसाव्या अध्यायापर्यंत त्रिविक्रम 'गुरुचरित्रा'त वावरला आहे. ज्ञानाच्या गर्वाने उन्मत्त झालेल्या ब्राह्मणांना ब्रह्मराक्षस होण्याचा शाप देणे, पतिताच्या तोंडून वेद वदवून घेणे, विभूतीचे माहात्म्य कथन करणारे वामदेवाचे आख्यान–एवढा मोठा परिसर त्रिविक्रमाच्या कथेने व्यापला आहे. परंतु त्रिविक्रम जो शिष्य झाला आहे, तो स्वामींनी त्याला विश्वरूप दाखविले, म्हणून झाला आहे. तो चमत्कार घडला, म्हणून तो शिष्य झाला. पुढे नंदीनामा आणि नरहरी यांच्याही बाबतीत चमत्कार घडले आहेत. सिद्ध हे एक शिष्य असे दिसतात की, ज्यांच्या बाबतीत कुठलाही चमत्कार घडल्याची नोंद नाही आणि तरीही ते शिष्य बनलेले दिसतात. सिद्धांची गोष्ट फार वेगळी आहे. स्वामींच्याच व्यक्तिमत्त्वातील चैतन्य सिद्धांच्या व्यक्तिमत्त्वात असावे आणि याच कारणामुळे त्यांची स्वामींशी जवळीक असावी. केवळ अशा जवळिकेसाठी लौकिकात कुठले तरी कारण असणे आवश्यक आहे, म्हणून ते शिष्यरूपाने वावरत असावे, असे दिसते. सिद्धांनीच सरस्वती–गंगाधरांना गुरुचरित्र सांगणे, नामधारकाने सिद्धांचे ठायीच गुरुमूर्तींना पाहणे आणि शेवटी गुरुचरित्र ऐकून समाधी अवस्थेत गेलेल्या नामधारकाला सिद्धांनी "देहावरी ये ये" म्हणत पुन्हा सर्वसामान्य स्थितीत आणणे—या घटना स्वामी व सिद्ध यांच्यातील चैतन्य एकच असल्याची साक्ष देतात. म्हणून चमत्काराचा संदर्भ देऊन आपल्याला सिद्धांचा विचार करता येत नाही.

सांगण्याचे तात्पर्य असे की, सायंदेव हा अकारण भक्त बनलेला शिष्य आहे. अठराव्या अध्यायातील तो ब्राह्मण किंवा अठ्ठेचाळीसाव्या अध्यायातील कुळवाडी हेही असेच अकारण भक्त झालेले दिसतात. परंतु हे दोघे अकारण भक्त त्या विभूतीचे शिष्य म्हणून वावरले नाहीत. त्यांच्या शिष्यपरिवारामध्ये त्यांची गणना होत नाही. हा फरक लक्षात घेणे जरूर आहे. अकारण भक्त बनलेल्या या सायंदेवाचे आणखी एक वैशिष्टय आहे. याच्या प्राणरक्षणाची हमी स्वामींनी घेतलेली आहे. यवनराजापासून जसे स्वामींनी त्याचे रक्षण केले आहे, तसेच एक्केचाळीसाव्या अध्यायात जेव्हा त्यांनी त्याच्या भक्तीची कसोटी पाहिली, तेव्हा दोन मोठाले साप त्याच्या दोन बाजूंनी पाठवून त्याचे रक्षण केले. स्वामींनी अनेकांच्या व्याधींचे हरण केले, हे खरे आहे; परंतु व्याधिहरण म्हणजे प्राणरक्षण नव्हे. स्वामींनी एखाद्याची व्याधी नाहीशी केली म्हणजे त्याचे प्राण वाचविले असे होत नाही. फारच दूरच्या अर्थाने व्याधिहरण म्हणजे सरतेशेवटी प्राणरक्षण ठरते. परंतु माणसाला एखादी व्याधी नको असते, ती त्या व्याधीमुळे जिवंतपणी ज्या मरणयातना सोसाव्या लागतात, त्यापासून त्याला सुटका हवी असते म्हणून. त्या व्याधीमुळे प्राण जाण्याचा धोका असतो आणि म्हणून त्याला त्या व्याधीपासून सुटका हवी असते, असे होत नाही. कित्येकदा तर व्याधीपासून सुटका व्हावी म्हणून माणूस मरण इच्छितो. तेव्हा व्याधीचा आणि जगण्याचा संबंध नाही. म्हणून व्याधिहरण म्हणजे प्राणरक्षण नव्हे. म्हणून 'गुरुचारित्रा'तील व्याधिहरणाची उदाहरणे प्राणरक्षणाची उदाहरणे म्हणता येणार नाहीत. सायंदेवाच्या बाबतीत सरळसरळ प्राणरक्षणच घडून आले आहे. सायंदेव हा स्वामींचा एकमेव शिष्य की, ज्याच्या प्राणाचे रक्षण करण्याची

सरळ-सरळ हमी स्वामींनी घेतलेली आहे.

सरतेशेवटी एक प्रश्न उपस्थित होतो. सायंदेवाने आपल्या संपूर्ण वंशात भक्ती कां मागितली ? स्वामींच्या अवतारकार्याचे आपल्या-एकटयाच्या जन्मापुरते आपले एकटयाचे आकलन अपूर्ण आहे, याची सायंदेवाला कल्पना आहे. आपला मुलगा, नातू, पणतू, खापर पणतू अशा परंपरेने जर स्वामींविषयीची भक्ती कायम राहिली, तर पिढीपरत्वे स्वामींसंबंधीच्या आकलनात भर पडत जाईल आणि स्वामींविषयीचे आकलन अधिकाधिक समृद्ध होत जाईल, अशी दृष्टी 'वंशोवंशी भक्ती'चे वरदान मागण्यामागे असावी. सायंदेवाच्या वंशात सरस्वती-गंगाधराच्या पिढीत स्वामींविषयीच्या आकलनाचा उत्कर्ष झालेला आपण पाहतो. दुसरीही एक दृष्टी असावी. प्रत्येक वंशजामध्ये आपण स्वत: अंशरूपाने राहू आणि अंशरूपात कां होईना, आपल्याला आपल्या वंशजाच्या माध्यमातून स्वामींची भक्ती घडेल, असा विचार सायंदेवाच्या मनात आला असावा. या अर्थाने सायंदेवाने चिरंतन काळपर्यंत स्वामींची भक्ती मागितली आहे. वंशाच्या माध्यमातून स्वत:चे सातत्य, हा एक महान सिद्धान्त सायंदेवाच्या कयेत दडलेला आहे.

आळंदीचे स्वामी श्रीनृसिंहसरस्वती यांचे परमशिष्य महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांचे चरित्र नुकतेच वाचण्यात आले. लो. टिळक हे अण्णासाहेबांना गुरुस्थानी मानीत. टिळकांचे समकालीन असलेले अण्णासाहेब स्वत: गुरुचरित्रावर नितांत श्रद्धा असलेले विद्वान पुरुष होते. त्यांनी 'गुरूचरित्रा'तील निवडक ओंव्या एकत्र करून ६५ ओव्यांची 'श्रीगुरू पासष्टी' तयार केली आहे. 'एक सेवक' असे टोपण नाव घेतलेल्या विदर्भातील एका दत्तभक्ताने "श्रीगुरू पासष्टी" पुन:प्रकाशित करून या 'पासष्टी'ला महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांचे संक्षिप्त चरित्र जोडले आहे. या चरित्रातील पुढील भाग ध्यानात घेण्यासारखा आहे.

"एकदा श्रीगुरुचरित्राचा पाठ चालू असता चौदाव्या अध्यायातील

वास सरस्वतीचे तीरी । सायंदेव साचारी
तया गुरुते निर्धारी । वस्त्रे भूषणे दिधली


या ओवीवर श्री. अण्णासाहेब यांचे लक्ष विशेष केंद्रित झाले. यावेळी त्यांना पूर्वजन्माची स्मृती होऊन 'श्रीं'कडून पूर्वी झालेला अनुग्रह व 'श्रीं'चे गुरुत्व निरंतरचे कसे स्थिर झाले, हे सर्व आठवले. जवळ जवळ अर्धा तास या ओवीवर ते बोलत होते. या प्रसंगामुळे आणि त्यांच्या श्रीगुरुचरित्रावरील नितान्त श्रद्धेमुळे श्री. अण्णासाहेब हे श्रीगुरूचरित्रकाराच्या घराण्याचे मूळ पुरुष व श्रीगुरूंचे साक्षात् शिष्य सायंदेव यांचेच अवतार आहेत, अशी त्यांच्या निकट सहवासातील काही लोकांची कल्पना झाली."

एखाद्या गुरूने शिष्यांच्या उद्धाराचे कार्य अपुरे राहिले म्हणून पुन:पुन्हा अवतार घेणे, ही घटना नेहमीची आहे. स्वत: श्रीनृसिंहसरस्वती हे श्रीपादश्रीवल्लभांचे पुढील अवतार आहेत. परंतु गुरूंच्या भक्तीसाठी शिष्याने पुन्हा अवतार घेणे; ही घटना असाधारण आहे. शिष्याने अवतार घेण्याचा प्रकार सायंदेवाच्याच बाबतीत घडलेला दिसतो. निदान 'गुरूचरित्रा'तील इतर शिष्यांच्या बाबतीत तरी हे घडले नाही. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या या उदाहरणावरून आपल्याला असे म्हणण्यास जागा निर्माण झाली आहे की, सायंदेव हा त्याच्या वंशजांमध्ये केवळ अंशरूपाने अवतरला नव्हता, तर पूर्णरूपाने अवतरला होता. त्याने वंशोवंशी स्वत:चे संक्रमण स्वामींच्या भक्तीसाठी करून घेतले होते. किंवा असेही म्हणता येईल की, अण्णासाहेबांप्रमाणेच आणखीही बऱ्याच रूपात सायंदेव वावरला असला पाहिजे. श्रीगुरूंची सेवा चिरंतन घडावी, ही सायंदेवाची इच्छा इतकी प्रबळ होती कीं, त्याने पिढ्यानपिढ्या निरनिराळ्या व्यक्तित्वामध्ये स्वत:ला आविर्भूत करून घेतले. गुरुभक्तीच्या सातत्याचे यासारखे दुसरे उदाहरण सापडणार नाही. 'गुरुचरित्रा'त स्वामींचे जे एकूण शिष्य आहेत, त्यांमध्ये सायंदेवाखेरीज दुसऱ्या कोणीही गुरूभक्तीसाठी एवढी घोर तपश्चर्या केलेली दिसत नाही. अशा अनेक बाजूंनी विचार केला, तर 'गुरुचरित्रा'तील सायंदेव हे पात्र अद्वितीय पात्र ठरते.

■ ■

राम देशमुख

आश्विनीमृग



उत्तरायण सुरू होतंय्. सूर्य उत्तरेकडे अंश-पावलांनी सरकू लागला आहे. सूर्याबरोबर आपलं स्थित्यंतर होऊ दिलं की कोण धन्य धन्य वाटतं ! या विश्वाच्या पालनहार सर्वोच्च शक्तीशी आपला लक्ष्यार्थाने संबंध आहे, ही जाणीव देखील केवढे धुमारे फोडू लागते.

सूर्य आणि सरितांचे ऋण आपल्या डोक्यावरून उतरायचे नाही, असे आता स्पष्ट आहे. कालचा 'मी' आज नाही...उद्याचे मात्र काही सांगता येत नाही. काल आपले पूर्वपश्चिमेशी अस्तित्व–नाते होते. आज उत्तरदक्षिणेचा दुवा म्हणून गढीतल्या माथ्यावरून सूर्यसरितांची दखल घेण्यासाठी आपण दाखल झालेलो !

या दक्षिणोत्तर ध्रुवाचा दुवा झाल्यामुळेच की काय काल हवेबरोबर समग्र उत्तरेकडून धूळ उडवीत भरधाव आलेल्या सैनिकांच्या टापांचे दिगंत आवाज आपण ऐकले. लहान मोठ्या उंचीची, आकाराची झाडे जिवाच्या आकांताने सळसळली ! वारा आणि पावसाच्या धुमश्चक्रीत धुवांधार झाली. त्या कोलाहलात घराघरांची, झोपडपट्टीची कमीअधिक फीट्ट दारे धडाधड बंद झाली. अस्मानसुलतानीत 'सुलतानी' कोण करीत होते याचा निर्णय होत नव्हता. पाऊस वाऱ्याच्या पुढे धावत होता, की वारा पावसाची वर्दी देण्यासाठी सुसाट होत चालला होता कुणास ठाऊक !

मेघांचे पुंजके साखळीने माथा चढून गेले. आणि दक्षिणदिशा त्यांनी एकाच पावलात व्यापून टाकली. उत्तरेकडून दक्षिणेकडे रमतगमत, वळणा-वळणांनी झुळझुळणारी नदी या अकस्मात माऱ्याने बिचकली. काळजीपूर्वक गती घेत धावू लागली. पहाडपाण्याचा लोट तिच्यात झेपावू लागला. शेतमाथ्यावरून गावपाणंदीकडून धावणारे लहान मोठ्या आकाराचे प्रवाह तिच्या कृश शरीराचा घेर वाढवीत चालले !

लक्ष्मणाला 'शक्ती' लागली होती त्या दिशेकडून भान राखूनच आज पाऊस आला ! त्या तसल्याच अटीतटीच्या काळात आला. आज मृगाचा हिशेब चुकला होता. मृगाने डोळा वटारल्यापासून पऱ्हाटीने अंग असे धरलेच नव्हते. भादवा अर्धाअधिक संपल्यासारखाच होता. आणि उभ्या शेतशिवारांना 'शिरव्या'वर वाढवून मेघराजाचे आभाळवास्तव्य संपले होते. त्यामुळं आटून गेलेल्या नदीकाठावर ओणवून उभ्या असलेल्या झाडांची आणि माणसांची दैना उडाली होती. तशी रोजगाराची सरकारकडून हमी मिळाली. दुष्काळाशी दोन हात करण्याची धीरोदात्त भाषाही कानांना रिझवू लागली. तेवढेच बरे वाटे.

...आणि तितक्यात पावसाने हा चमत्कार केला. दशदिशांनी पाऊस आला. कंठशोष पडू लागलेल्या धरित्रीने उभ्या शिवारात चैतन्य आणले. मरूं घातलेले कृषिवलांचे आख्खे संवत्सर 'आनंदाचे डोही' नाचू लागले. पाऊस आता पाठमोरा नि नदी पारोसी. एकूण पावसाचा बोल-बालाच कमी होत चाललाय. पावसाय पोथीशी कार्यकारणभावाने जुळलेले पारंपारिक नाते आता राहत्या भाद्रपदाबरोबरच तुटायचे. म्हणजे 'माँ'जी कडील महानुभावी 'महंतां'चे वास्तव्यही संगा-यचेच. गेला महिनाभर ते रात्री ८ ते ११ पर्यंत पोथी वाचताहेत. 'सुमरण' करीत माळा ओढ-ताहेत. पारोशाने घमेलेभर देवकुळाला दह्यादुधाने न्हाताहेत. भक्त श्रोते श्रद्धेने कृष्णचरित ऐकताहेत. कृष्णाच्या अष्टनायिकांचा शोध घेत ते दत्तायना-पर्यंत पोहोचताहेत.

महंत संध्याकाळचे गच्चीतील पायऱ्यात येऊन बसतात, तेव्हा सूर्य त्यांच्या गोऱ्यापान मुद्रे-वर सारखा झोत फेकत मावळतो. वरपांगी महंत चबुतऱ्यावर माळ जपत असतात. परंतु एखाद-दुसरा शब्द माझ्याशीही बोलतात. गोविंद प्रभू-विषयी चार दिवसांपूर्वी मी त्यांना विचारलं, आणि योगायोग! 'आज गोविंदप्रभूंचा जन्मदिन महंत बोलले—'रात्री जन्माला अवश्य यावे!'

महंतांनी मला निमंत्रिले. देव, नागदेवाचार्य, गोविंदप्रभू, क्षेत्रपाळ यांच्याशी माझे खरे तर नाममात्रच संबंध. महदंबेशीही मी अल्पपरिचित. ढवळे म्हणजे मंगलाष्टके असे समीकरण मांडतांनाच मी 'रिद्धपूर–काशी'चे माझे अनुभव महंतांना सांगतो, तेव्हा महंतांची माझ्याकडे पाहण्याची दृष्टीच बदलून जाते.

उद्या महंत गढीतून जातील. गढी परत सुन्न होईल. वैधव्याचे सुस्कारे देत राहील. सतत वीस वर्षे एकामुखी निवडून आलेल्या 'चक्र-धरवासी' मोतीलाल भाईजींची ही गढी फिरून आपल्या वैधव्याचे हुंदके देत राहील!

विजयादशमीच्या पाडव्याला महंत कुठं जातील? रानशिवारात ते लपूनछपून बसलेले असतील. या नगरातले सारे महानुभाव, भाविणी गांववेसीबाहेर निघून जातील. पाडव्याला रेडा बळी देणाऱ्या संस्कृतीचा निषेध म्हणून! कदा-चित् माझ्याच कवितेच्या ओळी ते नगरवासि-यांच्या मुखांवर भिरकावतील,

"कावळ्यांच्या गांवातून हद्दपार व्हायला मलाही आवडेल!"

आश्विन एव्हाना पाण्यात न् गाण्यातही डोकावू लागलेला. निळ्याभोर पहाडांकडून होडी शरनिरा थेट माझ्या गढीवर चाल करून येईल की काय असे वाटते. उभय पात्रावर ओणवून अठरापगड जातीची झाडे पाण्यात दाटी-वाटीने आपली प्रतिबिंबे न्याहाळीत आहेत. मी दिवस उजाडल्यापासून अस्तापर्यंत अधुनमधून पाणी न्याहाळतो हा प्रवाह उत्तरेकडून पूर्वाभिमुख व पूर्वेकडे उतरल्यावर दक्षिणाभिमुख होतो, घाईघाईने खळखळत! एवढ्यातच आश्विन सुरू झालाय्. नदीचे पाणी असे एकाएकी संथावले कसे?

गच्चीवर येऊन न्याहाळावे, तर पाणी आपले चाललेच आहे. डोहात उघडीनागडी पोरे

धुडाडू उड्या मारताहेत !

मी मात्र गूढकथेतल्या बंदिस्त राजपुत्रा-प्रमाणे पाठीमागे हात बांधून नव्या लेखनाच्या दिशा धुंडाळतो. निर्जिव बुबुळांनी पाणी न्याहाळतो. निरभ्र आकाश डोळ्यात सामावून घेण्याचा प्रयत्न करतो. मला आपले उगाचच वाटत राहते— "I am the Monarch of all that I Survey."

सातेऱ्यातून एकदा तरी माझी पावलं जुन्या घराकडे वळतात. हे 'काल'चे जुने घर शहराच्या ऐन मध्यवस्तीत. नदीकाठच्या पायवाटेवरून ओढीने मी निघतो. भोलटेकजवळ नदीचा कडा उंचावत जातो. वर गुराख्याचा पोर हातात शेंदीची काठी मिरवीत बकऱ्या राखीत बसलेला असतो. शेक्सपिअरच्या कुठल्याशा नाटकात जंगल धावू लागते ना, तसा एक इसम बाभळीच्या पिवळ्या फुलांच्या फांद्या डोक्यावर घेऊन माझ्याच रोखाने येत असतो. गुराख्याचा पोर स्वर्गातून बोलल्यासारखा हाळी देतो—

'बे इसूफ ! क्या लाया ?'

'चारा—बकरीके वास्ते'

'कब लिया बे ? पाठ है क्या ?'

'अभी गये बजार—'

'काहे को बे ?'

'कुर्बानी !'

युसूफ दृष्टीआडच्या सृष्टीत दिसेनासा होतो. गुराख्याचा पोर स्वगत पुटपुटतो—'वा ! वा !! कुर्बानी.' पुन्हा शहारतो. जोरजोराने ओरडू लागतो.

'अल्ला को प्यारी है—कुर्बानी, कुर्बानी !'

कुर्बानी ही आश्विनाची ट्रॅजेडी. म्हणजे विजयादशमीच्या पाडव्याला कुर्बानी द्यायचे दिवस अजून संपले नाहीत तर !

फाटका आश्विन कधीतरी कार्तिकात विरघळून जाईल. पण—कुर्बानीच्या वेदना त्याला पुसून काढता येतील ? कधी ?

दिवसेंदिवस ग्रहणाचा काळ वाढतो आहे. सूर्य—आणि चंद्रग्रहणातील अंतरही कसे कमी कमी होत आहे. या ग्रहणातून आपली मुक्तता नाहीच की काय ?अस्वस्थतेचे हे खंडग्रास कधी सुटायचे? इतकी सारी वर्षे आपण समृद्ध आश्विनाची प्रतीक्षा करताहोत. जुने पराजय विसरून मनभावन आश्विनासाठी प्राण टाकतो आहोत. पुरश्चरणे मांडीत देहकुळी झिजवून मनातला आश्विन पुजतो आहोत. पण आश्विन स्वतःचे भांडवल हरवून फाटक्यात शिरलाय्—तेव्हा साऱ्या इच्छा अनिच्छेने दूर सारून अलेक्झांडर सेलकर्क-प्रमाणे डोक्यावर लादून दिलेल्या एकांताला मी एवढेच विचारतो:

"Oh Solitude ! Where are the charms that Sages have seen in thy face ?"

मला अपेक्षित असलेल्या आश्विनाला कधीतरी हा प्रश्न मी विचारीन म्हणतो.

□ □

इंदुमती शेवडे

जॉन मास्टर्स व त्यांचा भारत

'द मास्टरली जॉन' म्हणून गौरविलेले व भारतावर सर्वांत अधिक कादंबऱ्या लिहिणारे इंग्रज लेखक ले. क. जॉन मास्टर्स यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या बरोबर स्वातंत्र्य-पूर्व भारतावर प्रेम करणाऱ्या व आता अस्तंगत होत चाललेल्या जुन्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या पिढीतला एक फार जुना दुवा नाहीसा झाला. 'द ब्यूगल्स अँड द टायगर', 'रोड पास्ट मंडाले' व 'द पिलग्रिम्स सन' या तीन आत्मवृत्तात्मक ग्रंथांशिवाय मास्टर्सच्या अर्ध्याअधिक कादंबऱ्या भारताबरील आहेत.

दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटनने भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न तडकाफडकी सोडविण्याचे ठरवले. आणि गाशा गुंडाळायला सुरवात केली. त्यावेळी भारत सोडून जाताना ज्या अनेक लष्करी व मुलकी इंग्रज अधिकाऱ्यांवर मानसिक आघात झाला, त्यापैकी जॉन मास्टर्स हे एक होते. भारतीय स्वातंत्र्याचे सत्य मान्य करायला त्यांची मने तयारच होत नव्हती. तो एक वेदनामय अनुभव होता.

—आणि कां नाही? त्यांच्यापैकी अनेक कुटुंबांच्या पिढ्यान् पिढ्या भारतात खपल्या. त्यांनी साम्राज्य उभे केले होते. (स्मिथ, फॉरेस्टर, केज, गार्डनर, डी सिल्व्हा अशी कितीतरी नावे घेता येतील) खुद्द मास्टर्स घराण्याच्या पाच पिढ्या इथे आल्या. जॉन मास्टर्सचा जन्मही इथला. १९१४ सालचा—कलकत्त्यातला. शिक्षण इंग्लंडात, पण चाकरी भारतीय सेनेत. गुरखा रेजिमेंटमध्ये ले. कर्नल असताना १९४७ साली त्यांना भारत सोडून जावे लागले—त्यांचा एक नायक ले. कर्नल रॉडनी सॅव्हेज याच्याप्रमाणेच. त्या प्रसंगी रॉडनी म्हणतो—

'It is time to go. That's the whole sad story! ...But I am not going. Never, see? It is not your country, It is mine. I made it...I, and my great-great grandfather, and my great grandfather,'' ('टु द कॉरल स्ट्रँड')

या नायकाच्या मुखातून मास्टर्स आपलीच मनोव्यथा बोलून दाखवीत होते. जे त्यांच्यासारख्या अनेक पिढ्यांनी खपून उभारले, ते राजकीय पुढाऱ्यांनी चुटकीसरशी कोलमडून टाकले. हा कटु संताप ते एका ठिकाणी बोलून दाखवतात

'That glamorous Dickie (माऊंटबॅटन) and Atlee with about three months knowledge between them, breaking up in half a year what it took us centuries to build!'

भारत त्यागाचे दुःख अनेकांनी गिळून टाकले. प्राप्त, अपरिहार्य परिस्थितीला सोशिकपणे तोंड दिले. पण भारत सोडून इतरत्र जगण्याची सवय करायला मास्टर्सना काही काळ लागला. इथून गेल्यावर त्यांना ब्रिटनमध्ये राहणे भावले नाही. चालून आलेल्या कित्येक नोकऱ्या त्यांनी नाकारल्या. शेवटी अमेरिकेत ते स्थायी झाले. पण मन मात्र भारतातच राहिले. अमेरिकेत जाऊन त्यांनी कादंबरी लेखनाला सुरवात केली. व एका पाठोपाठ भारतातील अनुभवांवर कादंबऱ्या लिहून काढल्या. या कादंबऱ्यांच्या रूपाने जणू ते अप्रत्यक्षपणे-(व्हायकेरियसली) भारतीय

जीवन पुन्हा जगले.

हे लेखन म्हणजे एक मोठेच दिव्य होते. कारण तत्पूर्वी लेखनाचा अनुभव शून्य. सेनाचाकरीत असताना भारतीय पायदळाच्या पोशाखाबद्दल किंवा पर्वतीय युद्धतंत्राबद्दलचे अहवाल लिहिणे हेच काय ते त्यांचे लेखन...पण कादंबऱ्या लिहायचे ठरवल्यावर इ. एम. फारस्टरचे 'आस्पेक्ट्स ऑफ द नॉव्हेल' हे पुस्तक अभ्यासून कादंबरी लिहायला घेतली. हयातीभराचा अनुभव गाठी होताच...पूर्वजांचा इतिहास ठाऊक होता... पहिली कादंबरी लिहिली ती १८५७ च्या बंडावरची. 'द नाईट रनर्स ऑफ बेंगाल.'

त्या पाठोपाठ 'द डिसीव्हर्स', 'लोटस अँड द विंड', 'भवानी जंक्शन', 'कॉरोमांडेल', 'फार फार द माऊंटन पीक', 'टु द कॉरल स्ट्रँड', 'द रावी लान्सर्स', 'थंडर एट सनसेट', 'द व्हीनस ऑफ कोनपारा' अशा कादंबऱ्या लिहिल्या. याच काळात तीन आत्मवृत्तेही लिहिली. हे सारे लेखन त्यांच्या लेखन काळातल्या पूर्वार्धातले. एवढे लिहून झाल्यानंतर पाच पिढ्यांपासून त्यांच्या रक्तात भिनलेला भारत जणु विस्मृतीत गेला—कारण पुढे त्यांचे लक्ष दुसरीकडे वेधले—'द फील्ड मार्शल्स मेमाइर्स', 'द ट्रायल एट मोनोमाय' या त्यांच्या कादंबऱ्या भारतेतर विषयांवरच्या आहेत.

भारतावर कादंबऱ्या लिहिणारे इंग्रज लेखक किपलिंगपासून पॉल स्कॉटपर्यंत अनेक झाले. पैकी किपलिंग हा उघडउघड उद्दाम साम्राज्यवादी... वर्ण श्रेष्ठतेची जाणीव बाळगणारा...ईस्ट इज ईस्ट अँड वेस्ट इज वेस्ट, द ट्वेन शॅल नेव्हर मीट' असे म्हणणारा. यानंतरच्या फॉर्स्टर व ऑटवेल यांची वृत्ती अधिक आत्मनिरीक्षणाची. फॉर्स्टरच्या 'पॅसेज टु इंडिया'त भारतातील इंग्रजांची वर्णजाणिव व सोवळेपणा आणि वसाहतवाद यावर टीका केलेली आहे. दोघांच्या मनात त्याबद्दल अपराधाची व शरमेची जाणीव आहे. पॉल स्कॉटच्या 'The Raj quartet' कादंबरी चतुष्टयात ही जाणीव अधिक तीव्र झालेली दिसते. त्यांची झेपही मोठी, इंग्रजी राजवटीचे विश्लेषणही सखोल. इंग्रज राज्यकर्त्यांच्या वागणुकीतच त्या राजवटीच्या नाशाची बीजे होती असे त्यांना वाटले. मास्टर्स यांचे लेखन त्यामानाने बरेच बेताचे आहे.

त्यांची वृत्ती किपलिंगप्रमाणे नसली तरी सौम्य साम्राज्यवाद्याचीच आहे. याचे कारणही उघड आहे. ते एक सेनाधिकारी होते. जित प्रदेशावर उदक सोडण्याची कल्पनाच जेत्याच्या मनात असंभव. भारतावर मास्टर्सचे प्रेम आहे. पण ते सेनाधिकाऱ्याच्या हृदयाने केलेले प्रेम आहे. किपलिंग प्रमाणे ते 'द ट्वेन शॅल नेव्हर मीट' म्हणत नसले तरी मागासलेल्या नेटिव्ह लोकांना सुधारण्याचे 'व्हाईट मॅन्स बरडन' अंगावर घेण्यात त्यांना अभिमान वाटतो. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ हे एक उपरे थोतांड वाटते. उदा. 'भवानी जंक्शन' मधला त्यांचा नायक रॉडनी सॅव्हेज म्हणतो—

'This was my India...because these people (भारतीय सैनिक) had no desire to become like me; nor I like them... The Ranjits and Surabhais (स्वातंत्र्य चळवळीचे नेते), who were trying to change themselves, read Paine and Burke and spoke in English because the ideas they express did not exist in their own language!'

त्याच कादंबरीत दुसऱ्या ठिकाणी तो म्हणतो : 'My sort of idea was to make Indian wood into better wood, not change it into bakelite.'

—हे उद्गार १९४६ साली काढलेले! मग त्यापूर्वीची गोष्ट सोडाच. या रॉडनीचा बाप पीटर सॅव्हेज आय. सी. एस. अधिकारी आहे. ('फार फार द माऊंटन पीक') त्याचे ध्येय आहे— 'To work to change the face of India we will abolish disease and poverty, make a new India where every Indian is the partner of every Englishman.'

मास्टर्सचा साम्राज्यवाद किपलिंगपेक्षा वेगळा, परस्पर सहकार्याचा आहे. पण त्यात जित-जेते, शासक—शासित यांची स्थाने निश्चित आहेत. त्यांच्या नवभारतात हयून, वेडरबर्न

बेझंट इ. त्यांच्याच देशबांधवांनी चालना दिलेल्या स्वातंत्र्य चळवळीला कुठे स्थान नाही. काँग्रेस व गांधींची अहिंसक चळवळ याबद्दल त्यांच्या मनात तुच्छता आहे. म्हणून रणजीत, सुराभाई इ. काँग्रेसवाल्यांची त्यांची चित्रणे विडंबनात्मक आहेत. सरकारी युद्ध-धोरणा विरुद्ध सुराभाई काँग्रेस स्वयंसेवकासह रेल्वे रुळावर आडवे पडून अहिंसक प्रतिकार करतात, तेव्हा ह्याच रॉडनी सॅव्हेज आपल्या सैनिकांना त्यांच्यावर लघवी करण्याचा हुकूम सोडतो. या प्रसंगातून मास्टर्सनी जणू काँग्रेसवाल्यांबद्दलची आपली तुच्छता रंगविली आहे.

मास्टर्सनी भारत पाहिला तो शास्त्या सेनाधिकाऱ्याच्या नजरेतून. हा अफाट देश त्याचे विविध सौंदर्यउत्तुंग पर्वत, नद्या, दाट जंगले, पशुपक्षी, शिकार, सफरी, पर्वतारोहण यांचे थरारक अनुभव, नेटिव्ह सैनिक, त्यांची निष्ठा व इमान त्यांचे शौर्य व काटकपणा त्यामुळे त्यांच्यासाठी जिवावर उदार होणारे इंग्रज सेनाधिकारी, भारतातील अद्भूत गोष्टी, दंतकथा, राजेरजवाड्यांचे वैभव हे सारे मास्टर्सच्या कादंबऱ्यांतून येते. पण राज्यकर्ते व सामान्य लोकांचा विशाल भारतीय समाज यांच्या दरम्यान खोल दरी असल्यामुळे त्या समाजाचे चित्रण अभावानेच आढळते. पॉल स्काटच्या सुंदर कादंबऱ्यातही तो अभाव जाणवतो. (कारण इंग्रजांचा संबंध आला तो फक्त राजेरजवाडे व त्यांच्या सेवेला हजर असलेल्या असंख्य चाकरवर्गाशी) म्हणून जे येते ते उथळ, अपुरे व विडंबनात्मक आहे. सुराभाई, रणजीत, सरदारनी, घनश्याम (भवानी जंक्शन), सुमित्रादेवी (टु द कॉरल स्ट्रॅंड), हिंदू राजा, देवदासी (कॉरोमांडेल) ही अशी उदाहरणे. त्यातल्या त्यात मुस्लिम पात्रे थोडी वरी उतरतात. उदा. आदम (केंब्रिज शिक्षित), त्याचा बाप, व मुलगा बाबर (सॅंडहर्स्ट शिक्षित) (फार फार द माऊंटन पीक) इश्माएल (कॉरोमांटेल) इ. अपवाद फक्त गोविंद स्वामीचा. तो शहाणा दाखवला आहे. आय. सी. एस. झालेला आहे म्हणून ?

या कादंबऱ्यांत एकसंधपणा व सातत्याचा एक धागा असावा या दृष्टीने मास्टर्सनी त्या सर्वांतून एक इंग्रज कुटुंब "सॅव्हेज" घेऊन त्याच्या सात पिढ्यांचे पुरुष नायक म्हणून निवडले आहेत. 'कॉरोमांडेल' ही मास्टर्स यांची पांचवी कादंबरी-तिच्यातला जेसन सॅव्हेज हा एक शेतकरी. पण स्वनाळू समुद्रापलीकडील अद्भूतप्रदेश पाहण्याची, भ्रमणाची त्याला ओढ एक भटक्याने दिलेले नकाशाचे चिटोरे घेऊन तो मोत्यांचा प्रदेश कॉरोमांडेल व मेरू पर्वत यांच्या शोधार्थ निघतो. त्यांची वृत्ती ग्रीक पुराणकथेतल्या गोल्डन फ्लीस मिळविणाऱ्या जेसनसारखीच. शहाजहानच्या दरबारातील इश्माएल या लायब्ररियनला घेऊन तो मेरू पर्वताच्या शोधार्थ निघतो. हा या सॅव्हेज घराण्याचा भारतात येणारा मूळ पुरूष. जेसन ते भारतीय स्वातंत्र्यानंतर भारत सोडून जाणारा कर्नल रॉडनीपर्यंत-एकंदर ३०० वर्षांचा इंग्रजी वास्तव्याचा कालखंड या कादंबऱ्यांतून येतो-ही सॅव्हेज मंडळी सारीच मनस्वी, जिद्दी, एककल्ली व आकाशातला चंद्र हस्तगत करायला निघणाऱ्यांच्या जातीची बेफाम

घडाडी वृत्तीची. त्यांना अप्राप्य गोष्टींचे वेड. जेसनचा मेरू पर्वतारोहणाचा छंद पिढ्यानुपिढे चालत आलेला. मास्टर्स कुटुंबाच्याही पाच पिढ्या इथे गेल्या. शेवटचा ले. क. रॉडनी खुद्द मास्टर्स प्रमाणेच भारत-प्रेमी व तो देश सोडताना मनोयातना भोगणारा एरवीही या कादंबऱ्या बऱ्याचशा आत्मवृत्तात्मक आहेत.

या कादंबऱ्या म्हणजे सॅव्हेज कुटुंबाचा इतिहास, तसेच भारतात येऊन राहिलेल्या इंग्रजांचा ३०० वर्षांचा इतिहास आहे. 'कॉरोमंडल' मधला जेसन सॅव्हेज शहाजहानच्या काळात १६२७ त प्रथम कॉरोमंडल किनाऱ्यावर येतो. 'नाईट रनर्स ऑफ बेंगाल'मधला क. रॉडनी सॅव्हेज सत्तावनच्या बंडात कामगिरी गाजवून 'जनरल'च्या पदापर्यंत पोचतो. 'डिसीव्हर्स' मधला सॅव्हेज वेषांतर करून ठगांच्या टोळक्यात शिरतो व ठगांचा बंदोबस्त करतो (इतिहासात ते काम स्लीमनने केले) लोटस अँड विंड मधला सॅव्हेजही कर्तबगार आहे. पण त्यालाही अज्ञाताचे व भ्रमणाचे जेसनप्रमाणेच वेड आहे. म्हणून एका रात्री पत्नीला झोपलेली सोडून तो अफगाणिस्तानच्या दिशेने निघून जातो. जेसनचे मेरूपर्वताचे-पर्वतारोहणाचे वेड जनरल सॅव्हेजला आहे. तसेच 'फार फार द माऊंटन पीक'मधल्या आय. सी. एस. पीटर सॅव्हेजलाही आहे. शिवाय तो एक कर्तबगार प्रशासक आहे. पहिल्या महायुद्धात तो फार मोठी कामगिरी बजावतो. तर त्याचा मुलगा कर्नल रॉडनी दुसऱ्या महायुद्धात पूर्व-पश्चिम-दोन्ही आघाड्यांवर कर्तृत्व गाजवितो. अशी सर्वच 'सॅव्हेज' माणसे कर्तृत्ववान, घडाडीची, आगळी व आत्यंतिक स्वभावाची आहेत. त्या साऱ्यांना भारताची ओढ असते. म्हणून ती स्वदेश सोडून इथे येतात. त्या साऱ्यांना भारत म्हणजे एक 'मॅग्निफिसंट कंट्री' वाटतो. इंग्लंड हा त्यांचा मायदेश. पण त्यांना आकर्षण भारताचे. ती त्यांची कर्मभूमी. त्यांचा दत्तक देश. त्याच्या सेवेत त्यांनी उभी आयुष्ये घालवली.

—३०० वर्षे व्यापणाऱ्या या कादंबऱ्यांत मास्टर्स यांनी तत्कालीन ऐतिहासिक घटना वापरून त्यांच्या पार्श्वभूमीवर आपल्या भारतीय कादंबऱ्यांची उभारणी केली आहे. त्यांना इतिहासाचे भान आहे. मास्टर्संना "Intuitive Sense of History" असल्याचा अभिप्राय जॉन रेमंडने दिलेला आहे. सी. पी. स्नो, पीटर क्वेनेल, आर. व्ही. स्मिथ या योगामोठ्यांनी त्यांची प्रशस्ती केली आहे. पण या कादंबऱ्या वाचल्यानंतर त्यांचे इतिहासाचे व तत्कालीन राजकीय घटनांचे भान व ज्ञान ढोबळ स्वरूपाचे असल्याचे जाणवते पॉल स्कॉटची विश्लेषण-शक्ती व आवाका इथे नाही.

अर्थात दोन लेखकांतील काळाचे अंतर त्याला काही अंशी जबाबदार असावे पण दोघांच्या वृत्तीतही फरक आहे. मास्टर्स यांचा पिंड रोमँटिक लेखकाचा आहे ही रोमँटिक वृत्ती कधीकधी ऐतिहासिक सत्यावर कुरघोडी करताना आढळते. इतिहास कोलांटया खातो व ऐतिहासिक विश्वसनीयता बळी पडते. उदा. 'भवानी जंक्शन'मध्ये इंग्रज सरकार कम्युनिस्टांच्या घातपातापासून काँग्रेसचा बचाव करू पाहते व काँग्रेसही त्याच्याशी सलोखा करते. त्यावेळी पंजाब जातीय दंग्यांनी पेटले होते (१९४६). पण त्याचा पुसटसा उल्लेख येतो. कळस म्हणजे गांधींचा खून करण्याचा कम्युनिस्टांचा कट सरकार उलथून पाडते. त्यावेळी गांधीजी पंजाबात आगगाडीने प्रवास करीत असतात. तेही १९४६ साली! 'टु द कॉरल स्ट्रँड' मध्येही अशीच गंमत आहे. नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारताचे हिंदी सरकार एका ठिकाणचा आदिवासींचा उठाव मिटवू शकत नाही. त्यासाठी ते तज्ज्ञ कर्नल रॉडनीची मदत मागते आणि तो तो प्रश्न लीलया सोडवतो. तेव्हा म्हणतो:

'I left you to run the bloody country as best as you could and even then you had to send for me when you come across something you did not understand!'

हे ऐतिहासिक सत्य? की एका साम्राज्यवाद्याचे विशफुल थिंकिंग? की लेखकाचे कल्पनास्वातंत्र्य?

पण या उणिवा असल्या तरी मास्टर्संचे भारतीय भूगोलाचे ज्ञान कच्चे नाही, भारतीय निसर्गाची व स्थळांची वर्णने जिवंत आहे. त्यांचे

इंग्रज, विशेषत: 'सँव्हेज' पात्रे दमदार व वैशिष्टयपूर्ण आहेत तत्कालीन इंग्रज समाजाचे चित्रणही साधले आहे. विशेष म्हणजे वाचकाचे कुतूहल जागते ठेवणारे कथानक व गोष्ट सांगण्याची हातोटी वाखाणण्याजोगी आहे. हिंदुस्थान हा चमत्कृतींचा जादुई देश अशी समजूत असलेल्या व 'ग्रेटेस्ट ज्यूएल ऑफ द ब्रिटिश एम्पायर' म्हणून त्याबद्दल व आपल्या इंग्रज भारतीय प्रशासकांबद्दल अभिमान बाळगणाऱ्या सर्वसाधारण इंग्रज वाचकांना मास्टर्सच्या या कादंबऱ्या आकर्षित करणाऱ्या ठरल्या व लोकप्रिय झाल्या. भारतावर कादंबऱ्या लिहिणारे ते एक तज्ज्ञ कादंबरीकार समजले गेले.

त्यांपैकी त्यांची 'भवानी जंक्शन' ही सर्वोत्कृट कादंबरी म्हणावी लागेल. तिचे फिल्मीकरण झाले आहे. यात त्यांनी अँग्लो–इंडियन समाजाची समस्या हाताळली आहे. हा समाज इंग्रजाळलेला. त्यांची नक्कल करणारा, भारतातील ब्राऊन लोकांना तुच्छ लेखणारा, 'निगर्स' म्हणणारा, इंग्लंडला 'होम' मानणारा. त्यांच्या मुलींची इंग्रज सोजिरांशी कसेबसे लग्न करून इंग्लंडला जायला मिळावे ही धडपड. पण भारतीय स्वातंत्र्य घोषणेनंतर त्यांची स्थिती त्रिशंकूसारखी होते. ना धड भारतीय, ना इंग्रज. वर्णसंकराच्या भीतीने इंग्रज आपल्याला मायदेशी नेत नाहीत, चीची म्हणून ते आपली संभावना करतात. तुच्छ लेखतात आपल्याला इत:पर भारतातच राहायचे. ही जाणीव काहींना होते. त्यांत व्हिक्टोरिया ही एक. आपले स्थान भारतातच, म्हणून ती रणजीतशी लग्न ठरवते. शीख धर्म स्वीकारायला जाते. पण आपण खरेखुरे भारतीय होऊ शकत नाही म्हणून ती तिथून पळून येते व रॉडनीच्या प्रेमात पडते पण आपण धड इंग्रज नाही व हेही लग्न यशस्वी होणार नाही, हे जाणवून ती पुन्हा आपल्या जुन्या प्रियकराकडे धाव घेते. रॉडनीलाही तो भेद जाणवतो. हे बऱ्हंश चित्रण वास्तववादी आहे.

भारत सोडून जाताना बहुतेक इंग्रज अधिकाऱ्यांना काही गोष्टींची खंत वाटत राहिली. अँग्लो–इंडियन जमात ही आपल्यातून निर्माण झाली व तिला आपण इथल्या काळ्या लोकांच्या दयेवर, वाऱ्यावर सोडून जात आहोत ही एक. दुसरी, आपल्यामुळे हिंदुस्थानाची अखंडता व हिंदू–मुसलमानांची एकी राहिली अशी ठाम भूमिका असताना आपण देशाचे विभाजन करून जात आहोत ही जाणीव. तिसरी, या देशाची जबाबदारी आपण अंगावर घेतली, हा देश सोडताना तिच्यापासून आपण विन्मुख तर झालो नाही ना, हा प्रश्नही अनेकांच्या मनाला डाचत होता. मास्टर्सचा नायक कर्नल रॉडनी म्हणतो :

'We'd all go. It wasn't desertion for us, was it? It was the British people deserting their responsibility, wasn't it? Then why didn't I stay?...because I didn't belong to...not as a stone and stream belongs!'

भारतावर पिढ्यानुपिढ्याचे प्रेम असताना व तो सोडून जाण्याची कल्पनाच वेदनामय वाटत असताना, मास्टर्ससारखे इंग्रज अधिकारी (स्वातंत्र्यानंतर) हा देश आपला समजून इथे स्थायी का झाले नाहीत? या प्रश्नाचे उत्तर रॉडनीच्या वरील स्वगतात मास्टर्सनी दिले आहे.

मास्टर्स यांच्या भारतावरील कादंबऱ्या एकूण अशा आहेत. फार मोठा आवाका नसलेल्या पण इंग्रजांचा ३०० वर्षांचा विविध भारतीय अनुभव गोवणाऱ्या, मनोरंजक कथानके असलेल्या व म्हणून वाचनीय. त्यामानाने त्यांचे आत्मचरित्रात्मक लेखन अधिक पकड घेते. त्यातून त्यांची कथनशैली व ऐतिहासिक वास्तवता प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या निधनाने भारतावर इतके समरसून लिहिणारा एक लोकप्रिय कादंबरीकार भारताने गमावला आहे.

□ □

वि. भि. कोलते

डॉ. डोळके आणि 'चक्रधरांचे शेवटचे प्रकरण'

प्रास्ताविक

'युगवाणी' मासिकाच्या १९८१ च्या दिवाळी अंकात डॉ. सुरेश म. डोळके यांनी 'चक्रधरांचा वध झाला काय?' या शीर्षकाखाली एक लेख लिहून 'संशोधनात्मक व वैचारिक अशा निरनिराळ्या दृष्टींनी विचार केला तर चक्रधरस्वामींचा वध झाला नाही, असेच सिद्ध होते' असा त्यात त्यांनी निष्कर्ष काढला आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा विचार करून "चक्रधरांचा मृत्यू झाला होता, तोही त्यांच्या वधाने झाला होता, इतकेच नाही तर शिरच्छेदाने झाला होता, असेच महानुभाव चरित्रकार, कवी, भाष्यकार इत्यादी प्राचीन महानुभाव आचार्यांचे मत होते" असे माझे मत 'युगवाणी'च्या नोव्हेंबर–डिसेंबर १९८१ च्या अंकात 'श्रीचक्रधर-स्वामींचा वध' या मथळ्याचा लेख लिहून मी मांडले. या माझ्या लेखाला प्रत्युत्तर देण्यासाठी डॉ. डोळके यांनी नुकताच 'युगवाणी'–फेब्रुवारी-मार्च १९८३ च्या अंकात '"चक्रधरांचे शेवटचे प्रकरण"' या शीर्षकाखाली एक लेख प्रसिद्ध केला आहे. त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी प्रस्तुत लेखाचे प्रयोजन.

अवांतर विधाने

डॉ. डोळके यांनी आपल्या पहिल्या लेखातील १२ व्या परिच्छेदात चक्रधरांच्या वधाचा 'समाजेतिहासात्मक दृष्टी'तून विचार केला आहे. त्याला उत्तर देताना तत्कालीन समाजेतिहासिक दृष्टीचे सर्वसामान्य विवेचन करणे मला क्रमप्राप्त होते. ते करताना, चक्रधरांच्या वधाकडे समाजेतिहासिक दृष्टीने पाहताना डॉ. डोळके यांनी जे प्रश्न उपस्थित केले, नेमके तेच प्रश्न काही वर्षांपूर्वी प्रा. सावळापूरकर यांनी उपस्थित करून चक्रधरांच्या 'पुरस्वी-कारा'चा समाजेतिहासिक दृष्टीने विचार केला होता. माझ्या लेखात त्याचा निर्देश करून काही प्रतिप्रश्न मी विचारले. यावर डॉ. डोळके यांचे म्हणणे असे की, त्यांच्या विवेचनाचा विषय 'चक्रधरांचा वध झाला काय' एवढाच होता आणि म्हणून माझी ही विधाने व प्रश्न अवांतर आहेत. मला एवढेच सांगायचे आहे की; हे प्रश्न अवांतर नाहीत. ते 'समाजेतिहासिक दृष्टी'च्या विचाराशी पूर्णपणे सुसंगत आहेत. चक्रधरासारख्या थोर समाजपुरुषाच्या झालेल्या वधाच्या वृत्तांताचे प्रतिबिंब तत्कालीन साहित्यात नाही असे डॉ. डोळके यांनी प्रतिपादन केल्यावर या थोर समाजपुरुषाने प्रधानपुत्राच्या प्रेतात प्रवेश करून ते जिवंत केले (अवतार धारण केला) या अपूर्व चमत्काराचा उल्लेख तत्कालीन गुजराथी वाङ्मय, आख्यायिका, गाणी, पोथ्या इत्यादिकात का असू नये? असा प्रा. सावळापूरकर यांनी विचारलेल्या प्रश्नाचा निर्देश करणे व त्याच्या आधारे काही प्रश्न विचारणे यात गैर काय आहे? 'अवांतर विधाने' म्हणून त्याची वासलात लावणे योग्य नाही.

केवळ कोलते यांच्यावर रोख

'अनेक पंथीय व पंथीयेतरांनी चक्रधरांचा वध झाला असे मत मांडलेले असताही त्यांचा नामनिर्देशही न करता डॉ. डोळके यांनी त्यांच्या टीकेचे लक्ष्य केवळ मलाच केले आहे. यामागे त्यांचा कोणताही हेतू असला तरी त्याचे उत्तर

अनुक्रमणिका

मलाच देणे आवश्यक आहे' असे मी म्हटले होते. त्यावर डॉ. डोळके यांचे म्हणणे असे की, 'इतर अभ्यासकांनी चक्रधरांचा वध झाला असे मत मांडले असतानाही त्यांचा मी उल्लेख केला नाही याचे कारण असे की, डॉ. कोलते यांनीच ते पहिल्यांदा मांडले आहे...इतर अभ्यासकांनी या मताचा उल्लेख वा पाठपुरावा केलेला असला तरी पहिल्यांदा आणि विस्तारानेही हे मत मांडणारे डॉ. कोलतेच ठरतात. म्हणून त्यांचा उल्लेख माझ्या लेखात येणे अपरिहार्य होते...... त्यांच्या मताचा समाचार घेण्यात इतरही अभ्यासकांच्या एतत्सदृश मतांचा विचार आपोआपच येऊन जातो.'

वरकरणी हे समर्थन योग्य भासत असले तरी ते पटत नाही, म्हणून मान्यही करता येत नाही. कारण सर्वांनीच केवळ माझ्या मताचा पाठपुरावा केलेला नाही, तर त्यांना मिळालेल्या पोथ्यांच्या आधारे त्यांनी आपले मत स्वतंत्रपणे मांडलेले आहे. माझे 'श्री चक्रधर-चरित्र' प्रसिद्ध झाल्यावर डॉ. डोळके यांनी मध्यप्रदेश संशोधन मंडळाच्या १९५४ च्या वार्षिकोत्सवप्रसंगी 'चक्रधरांचा वध झाला काय ?' हा आपला निबंध वाचला. त्याचा परामर्ष घेऊन डॉ अ. ना. देशपांडे यांनी चक्रधराचा शिरच्छेद ही संभाव्य वस्तुस्थिती कशी आहे ते दाखवले आहे; हा वृत्तांत 'जुन्या पिढीपाठात सापडत नाही, तो अलीकडच्या थोड्या पाठांतच आढळतो' या आक्षेपाचे खंडन केले आहे; वधाची लीळा का गाळण्यात आली असावी याची स्वतंत्रपणे समर्पक चर्चा केली आहे; 'आइकिले ते साच की देखिले ते साच' या वाक्याच्या आधारे शिरच्छेद झाला नव्हता या आक्षेपाचीही आपल्या प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात (भाग १ पूर्वार्ध) चर्चा केली आहे. या चर्चेला उत्तर देणे डॉ. डोळके यांचे संशोधनदृष्ट्या कर्तव्य होते. पण त्यांचा व इतर कोणाचाही उल्लेख न करता त्यांनी आपल्या टीकेचे लक्ष्य मलाच केले आहे असे मी म्हटले तर त्यात चूक काही नाही.

डॉ. कोलते यांचे अज्ञान

माझ्या या विधानाबद्दल इतराजी व्यक्त करताकरता डॉ. डोळके यांनी आपल्या अज्ञानाचे माप माझ्या पदरात घालण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे म्हणणे असे की, '–आणि त्यांचा नामनिर्देशही न केल्याचा आरोप माझ्यावर करताकरता, आपण स्वतःही या आरोपात सापडू याचे भान मात्र डॉक्टरसाहेबांना राहिलेले दिसत नाही. कारण, अशा एका लेखकाचे नाव तर त्यांनी स्वतःही सोडून दिले आहे.' असे म्हणून प्रा. विश्वंभरप्रसाद उपाध्याय यांच्या 'हिंदी साहित्य की दार्शनिक पृष्ठभूमी' या ग्रंथातील '...चक्रधरने महानुभाव पंथ का प्रवर्तन किया, ब्राह्मण पुरोहितोंने षडयंत्र कर उनकी हत्या कर डाली' हा उतारा 'माझ्या तोंडावर फेकला' आहे.

या बाबतीत मला एवढेच म्हणायचे आहे की, चक्रधरांचा वध झाला असे मत मांडणाऱ्या सर्वांची नोंद करणे हा माझा हेतू नव्हता. काही उदाहरणे दिल्यावर मी स्वतःच म्हटले आहे की, 'इतर अनेक आधुनिक विद्वानांनी या मतांचा

पाठपुरावा केला आहे. त्यांची मते उद्धृत करून जागा अडवीत नाही?' यातील 'इतर' शब्द काय दाखवितो? मी निर्दिष्ट केलेल्या नावांशिवाय 'इतरांचा' समावेश त्यात होतो की नाही? आणि हे 'इतर' एक नाही तर अनेक आहेत. पण माझे अज्ञान प्रगट करताना डॉ. डोळके यांना स्वत:लाच त्याचे भान राहिलेले दिसत नाही. मी केवळ काही मराठी लेखकांचा उल्लेख केला आहे. त्यांव्यतिरिक्तही इतर काही मराठी लेखकांनी माझ्या मताचा पाठपुरावा केला आहे. पण डॉ. डोळके यांनी आपले बहुश्रुतत्व दाखविण्यासाठी एका हिंदी लेखकाचा नामनिर्देश करून त्याच्या ग्रंथातील वाक्य उद्धृत केले आहे. त्यांना हिंदी लेखकांचीच नावे पाहिजे असतील तर त्यांनी एक उदाहरण दिले आहे म्हणून मीही सध्या आणखी एकच उदाहरण देतो. प्रो. भी. गो. देशपांडे (वाराणसी) यांनी 'मराठीका भक्तिसाहित्य' (१९५९) या आपल्या ग्रंथात लिहिले आहे की, 'किंवदन्ती है कि महात्मा चक्रधरजीकी हत्या इन लोगों द्वारा की गई सन १२७४ में, परंतु महानुभाव संप्रदायके अनुयायियोंका विश्वास है कि हत्याके पश्चात चक्रधर जीवित होकर उत्तर की ओर चले गये।' हिंदीच काय पण इंग्रजी ग्रंथांतही असे उल्लेख आहेत, हेही येथे नमूद करणे अप्रासंगिक होणार नाही.

नागार्जुन आणि आदि महादेवी

वधोत्तर, विशेषत: शस्त्राने धड व शिर वेगळे झाल्यावर मनुष्य जिवंत होऊच शकत नाही, असे डॉ. डोळके यांचे प्रतिपादन होते. त्याला उत्तर देण्यासाठी 'नागार्जुनीं अवस्थान' (उत. ४५२ नेने प्रत) या लीळेतील नागार्जुन, आणि 'अर्णग्रामीं अवस्थान : उपासनीया लाठि घालणें' या लीळेतील (पूर्वार्ध ३५३ कोलते प्रत) आदि महादेवी, ही दोन उदाहरणे देऊन मी दाखविले की, चक्रधरांच्याच मते हे होऊ शकते. आपल्या लेखात डॉ. डोळके यांनी वधोत्तर पुनरुज्जीवनाच्या बाबतीत तीन प्रश्न विचारले होते. (१) शिर व धड अलग अलग झाल्यानंतर त्यांच्यात पुन्हा जीव फुटू शकतो काय? (२) विच्छिन्न शरीरातून प्राणोत्क्रमण झाल्यास ते शरीर पुन्हा पूर्ववत अविच्छिन्न व एकसंध होऊ शकते काय? आणि (३) प्राणोत्क्रमण झाल्यानंतर तोच प्राण त्याच शरीरात प्रवेश करून ते शरीर पुन्हा जिवंत करू शकते काय? मला वाटते वरील दोन लीळांवरून या तिन्ही प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मिळू शकते. नागार्जुनाचे अलग अलग पडलेले शिर व धड यांच्यात पुन्हा जीव फुटू शकेल, इतकेच नाही तर प्राणोत्क्रमण होऊन निघून गेलेला त्याचा तोच प्राण त्या शरीरात प्रवेश करून तो ते जिवंत करू शकेल असे चक्रधरांनी सांगितले आहे. शस्त्राने विच्छिन्न झालेल्या आदि महादेवीच्या शरीरातूनही प्राण निघून गेले होते. ते पुन्हा पूर्ववत अविच्छिन्न व एकसंध झाल्याचे त्याच्या उदाहरणात आहे. त्याचप्रमाणे, आदि महादेवीचे प्राणोत्क्रमण झाल्यानंतर त्याचा तोच प्राण त्याच शरीरात प्रवेश करून त्याने तेच शरीर पुन्हा जिवंत केल्याचेही उदाहरण त्याच कथेत आहे.

डॉ. डोळके यांचे यावर आता असे म्हणणे आहे की, 'या दोन्ही कथांत धड व शिर, तसेच विच्छिन्न शरीरावयव आणखी कुणी तरी एकत्रित आणण्याची अपेक्षा आहे. ते इतरांनी एकत्रित आणले तरच हा विस्मयकारक प्रकार घडेल.' पण ही अपेक्षा त्यांनी आपल्या मूळ लेखात व्यक्त केली नव्हती. 'आपोआप' किंवा 'आपणहून' असे शब्द त्यांनी त्या शंका व्यक्त करताना त्यात कुठेही योजले नाहीत. मी ही उदाहरणे दिल्यावर आता त्यांच्या आधारे त्यांनी ही अपेक्षा व्यक्त केली आहे. ही पश्चात् बुद्धी होय. वस्तुत: याचेही उत्तर त्यांना माझ्या लेखातच सापडले असते. आपल्या मूळ लेखात यक्षदेव आम्नायाच्या 'अन्वयस्थळा'तील चांगदेवाचा वृत्तांत उत्तरकालीन लीळाचरित्राच्या पोथ्यांत शिरला असावा असे प्रतिपादन डॉ. डोळके यांनी केले आहे. या यक्षदेव आम्नायाच्या 'अन्वयस्थळा'वर त्यांचा विश्वास दिसतो. त्याचाच आधार देऊन मी लिहिले होते की, "यक्षदेव आम्नायाच्या 'अन्वयस्थळा'तील ज्या चांगदेवाच्या कथेचा पुरावा डॉ. डोळके यांनी आपल्या लेखात दिला आहे त्याच्या बाबतीत तरी काय घडले होते? 'शीर उसळौनि पैन्हा गेले : ते

पडीले : घड एकीकडे पडीले... [कंथडीनाथाने मंत्र प्रहरिला] तव ते शीर घडाजवळ चालत आले...आन तो नाथ नाथ म्हणौनि उठिला :' (युगवाणी, नोव्हे-डिसें. ८१; पृ. ४७७) हा त्यांनीच आधाराला घेतलेला वृत्तांत काय दाखवितो? यात चांगदेवाचे शिर धडावेगळे पडले होते. नंतर ते शिर, मंत्रसामर्थ्यामुळे का होईना पण, धडाजवळ चालत आले, असेच म्हटले आहे. यावर डॉ. ढोळके पुन्हा असे म्हणणार काय की, 'ते शिर मंत्रसामर्थ्यामुळे चालत आले, आपोआप आले असे नाही.' त्यांनी असे म्हणावे पाहिजे तर, पण ते शिर धडाजवळ कोणी इतराने आणून एकत्रित मेळविण्याची क्रिया केली नाही, ते आपोआप चालत आले, असेच त्या कथेत स्पष्टपणे वर्णन केले आहे, हे त्यांना नाकारता येणार नाही.

दोन्ही घडे तैसीचि मागौती मीळाली :

'लीळाचरित्र' पूर्वार्ध १९८ (कोलते प्रत) 'अदंडीनाथ सामर्थ्य कथन' ही लीळा पाहावी. या लीळेच्या पूर्वार्धात चक्रधरांनी अदंडीनाथ व गोरक्षनाथ यांच्या कथेतून गोरक्षनाथाच्या सामर्थ्याचे वर्णन केलेले आहे. अदंडीनाथ डाक्रामाहून सोरटी सोमनाथाकडे जात असताना त्यांना 'वाटेसि गोरक्ष भेटले : तवं गोरक्षेन पुसिलें : 'काहांथी आव्यो ? काहां जाव्यो ?' तवं तेणें म्हणीतलें : 'डांक्रामु भेदीया : अब सोरठी सोमनाथू भेदन जाओं :' तवं गोरक्षीं म्हणीतलें : 'आपु नाहीं भेन्द्रिा : ऐसें कैसेनि जाणिजे ?' तवं गोरखीं म्हणीतलें : 'देहावरि खर्ग घालिजे आणि पाणीयांतौनि नीगौनि जाए ऐसें जाए : दोनीं धडें तैसींचि : यातें आपुभेदीया ऐसें म्हणिजे : मग अदंडिनाथें म्हणीतलें : 'हो कां ।' मग गोरखीन स्वर्गुनि खर्ग इंद्राचें अव्हानिलें : तें खळखळीत घगघगीत ऐसें आलें : गोरखीं हातीं घेतलें : अदंडीतें पुसिलें : 'हाणसी कीं हाणों ?' तो उगाचि : मग गोरखीं म्हणीतलें : 'घे खांडें' मग अदंडिनाथें खांडें घेतलें गोरखीवरि घातलें : तें पाणीयांआंतौनि वाहुनि जाए तैसें गेलें : दोन्हीं धडें तैसींचि मागौतीं मीळालीं : गोरखीं म्हणीतलें : 'पुता : देह जालें तें ऐसें जाणिजे ...'

या कथेत 'दोन्ही धडें तैसींचि मागौतीं मीळालीं' असे म्हटले आहे. अर्थात, त्यापूर्वी अदंडिनाथाने केलेल्या शस्त्राघाताने ती वेगवेगळी झाली होती. एरवीं, 'मागौतीं मीळालीं' असे वर्णन करण्याचे कारण नव्हते. 'अदंडिनाथें खांडें घेतलें : गोरखीवरि घातलें : तें पाणीयाआंतौनि वाहुनि जाए तैसें गेलें :' या वाक्यात दिलेल्या पाण्याच्या उदाहरणावरून तर ते स्पष्टच दिसते. पाण्यात शस्त्र घातल्यानंतर जेथे ते शस्त्र असते त्या ठिकाणी पाण्याचे दोन भाग होतात. शस्त्र काढून घेतल्यानंतर मात्र ते दोन्ही भाग 'आपोआप' एकत्रित होतात. त्याप्रमाणेच गोरक्षनाथाच्या शरीरावर जेथे शस्त्र घातले असेल तेथे त्या शरीराचे दोन भाग झाले असणार. शरीरातून ते शस्त्र पलीकडे निघून गेल्यानंतर मात्र ते दोन्ही भाग, पाण्याप्रमाणेच, 'आपोआप' पुन्हा एकत्रित झाले असणार. येथे अदंडिनाथाने केलेल्या शस्त्राघाताने गोरक्षनाथाच्या शरीराची वेगवेगळी झालेली धडे इतर कुणी दुसऱ्याने 'मागौतीं' लावली, एकत्रित आणली व मग ती 'मीळालीं' असे नाही तर ती आपोआपच 'मीळालीं'= एकत्रित आली, असे वर्णन आहे. म्हणजे शस्त्राघाताने वेगवेगळे झालेले दोन शरीरावयव विद्यासामर्थ्याने आपोआप एकत्र येऊ शकतात, याचे हे उदाहरण आहे.

तिन्ही कथांचा एकत्रित विचार

चक्रधरांनी सांगितलेल्या या तिन्ही कथांचा एकत्रित विचार केला तर विछिन्न शरीरावयव इतरांच्या साह्याशिवाय एकत्रित मिळवण्याचे सामर्थ्य जसे विद्यावंत किंवा सिद्धांच्या ठिकाणी असते, त्याप्रमाणे त्या विच्छिन्न शरीरातून निघून गेलेला प्राण त्या शरीरात पुन्हा प्रवेश करून ते शरीर पुन्हा जिवंतही होऊ शकते असे दिसून येईल. नागार्जुनाचे धड व शरीर वेगवेगळी पडली होती. ती एकत्रित आणून व त्यात प्रवेश करून पुन: जिवंत होण्याची नागार्जुनाची स्वत:ची इच्छाच नसेल कदाचित. म्हणून त्याने आपल्या कोणत्याच विद्यासामर्थ्याचा उपयोग केला नसावा. आदि महादेवीच्या बाबतील देखील असे असण्याचा संभव आहे की, त्याच्या पत्नीने त्याचे शरीर विच्छिन्न केल्यावर आपणहून ते अवयव एकत्रित करून पुन्हा जिवंत होण्याची त्याची स्वत:ची

इच्छा नसेल. आपल्या पत्नीची खरोखरीच तशी इच्छा आहे की नाही हे पाहाण्यासाठी त्याने म्हटले असावे की, 'आतां अवघे अवेव जेथिचे तेथ मेळवि मग मी स्वीकरीन:' तिची अंतःकरणपूर्वक तशी इच्छा आहे की नाही हे पाहाण्यासाठी 'मग' या शब्दाने आपली अट त्याने सांगितली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशी अट घालण्याचे कारणही तेथे स्पष्ट आहे. आदि महादेवीने आपल्या पत्नीला विद्या सांगण्याचे वारंवार नाकारले असताही त्याचे न ऐकता ती आपला हट्ट धरून बसली होती. हे लक्षात घेऊनच त्याने नंतर हा आग्रह धरला असावा. याचा अर्थ असा नव्हे की त्याला आपले विच्छिन्न अवयव एकत्रित करण्याचे विद्यासामर्थ्य नव्हते. ज्यांच्या ठिकाणी विच्छिन्न शरीरात प्रवेश करून पुन्हा जिवंत होण्याचे सामर्थ्य असते त्यांच्या ठिकाणी ते अवयव एकत्रित करण्याचे सामर्थ्य नसते अशी कल्पना करून घेण्याचे कारण नाही.

असे सामर्थ्य विद्यावंताच्या ठिकाणी निश्चित असते. 'ब्रह्मांडीं मूर्ता देवता : पिंडीं मेदमांसरूपा देवता' (विचार ६६) या वचनावरील भाष्यात तुटलेल्या अवयवातील पिंडस्थांचे विवेचन करताना 'विचारबंद'कार सांगतात : 'अवयव तुटलेया जाइल : सांदलेया मागुती येइल : तर देह सांदी तो कवण ? ना विद्यावंत म्हणजे आगमिक : तो चौरंगीचेनि न्यायें तथा आदि महादेवाचेनि न्यायें : तो विद्यावंत देह सांदेल : म्हणौनि देह सांदलेया येती :' यावरून विद्यावंताच्या ठिकाणीच आपले तुटलेले अवयव सांधण्याचे सामर्थ्य असते हे दिसून येईल.

असे विस्मयकारक प्रकार जर विद्यावंत व सिद्ध करू शकतात तर 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्' समर्थ असलेल्या परमेश्वराला ते अशक्य आहे असे समजण्याचे कारण नाही.

अब्लूर शिलालेखातील एकांत रामय्या

विच्छिन्न शिर आणि धड एकत्रित येऊन मनुष्य पूर्ववत होऊ शकतो याचे उदाहरण म्हणून कन्नड प्रांतातील धारवाड जवळच्या अब्लूर गावी घडलेली एकांत रामय्याची कथा येथे देणे अप्रस्तुत होणार नाही. ही कथा सुमारे इ. स. १२ व्या शतकाच्या शेवटच्या चरणात म्हणजे साधारणतः चक्रधरांच्या उत्तरार्ध काळात घडलेली असून तिची नोंदही लागलीच सुमारे शके १२०० मध्ये कोरण्यात आलेल्या अब्लूर येथील एका कन्नड शिलालेखात आलेली आहे. या शिलालेखाचे इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध पुराभिलेखतज्ञ जे. एफ. फ्लीट याने केलेले आहे. (एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. ५; पृष्ठे २३७-३६०) त्यातील आवश्यक कथाभाग असा.

अब्लूर येथे शिवमंदिरात शिवाचा परम भक्त एकान्त रामय्या जैन अनुयायांशी अर्हताहूनही शिवाच्या श्रेष्ठत्वासंबंधी वाद करीत असताना, 'the Jains said '...why dost thou simply talk of former worthies ? Cut off thine head under such conditions that all people may know of it, and offer it to him and get it back from him (and then we will admit that) thou art indeed a pious man and he is indeed the god.' यात एकांत रामय्या जिंकला तर आपण आपली जिनमूर्ती काढून तेथे शिवमूर्तीची स्थापना करू असे प्रतिज्ञावचन जैनांनी लिहून दिल्यावर 'Rama, that man of ability, quickly and instantly cut through his own neck with as little difficulty as if he were shearnig through a bundle of grass, and placed (his head) at the feet of Īsha (Śiva) and caused joy to the attendants of Śaṁkara (Śiva). After the severed head had been exhibited in public during seven days, Hara kindly gave it back, the head became sound again without any scar; and Rama received it back to the knowledge of all people...' (ओळी ४० ते ४३)

या कथेतील शेवटच्या भागात (एकान्त) रामाने खड्गाने आपला शिरच्छेद करून शिवाला अर्पण केलेले त्याचे शिर सात दिवसानंतर शिवाने याला कृपा करून परत दिले (Hara kindly gave it back), ते शिर पुन्हा दृढ झाले; त्यावर ओरखडा सुद्धा राहिला नाही, असे वर्णन केलेले आहे. यावरून शिव तेथे प्रगट झाला व त्याने रामाचे शिर त्याच्या धडावर ठेवले आणि मग ते

तेथे दृढ झाले असा अर्थ काढण्याचा प्रयत्न होणे संभवनीय आहे. पण तसा तेथे अर्थ मुळीच नाही. शिव प्रत्यक्ष प्रगट झाले असते तर तो विशेष साक्षात्कार असल्यामुळे त्याचे वर्णन शिलालेखात निश्चित आले असते. पण तसे वर्णन नाही. तेव्हा शिवाने रामाला त्याचे मस्तक परत दिले याचा अर्थ असा की, शिव रामावर प्रसन्न झाला, त्याने आपल्या भक्ताला त्याचे शिर परत केले म्हणजे शिवकृपेने ते शिर रामाच्या धडावर जाऊन मिळाले आणि तेथे ते इतके दृढ झाले की पूर्वी शस्त्राने ते कापले गेले होते याची एकही खूण तेथे राहिली नाही. शिवकृपेने (परमेश्वरकृपेने) का होईना पण धडापासून वेगळे झालेले शिर सात दिवसानंतर आपोआप एकत्रित येऊन रामय्याचे शरीर पूर्ववत एकसंध झाले. कन्नड संशोधकांनी तसाच त्याचा अर्थ केला आहे. त्याचा सारांश सांगताना प्रा. माणिक धनपलवार (उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद) हे आपल्या 'वीरदैवत श्रीविठ्ठल' या लेखात लिहितात : 'एकांत रामय्याने जैनांशी एक चमत्कारिक पैज लावली होती. त्याने तलवारीने स्वत:चे मस्तक धडापासून वेगळे केले होते व नंतर ते धडावर पूर्वीप्रमाणेच बसविण्याची किमया केली व तो परत जिवंत झाला.' (नवभारत. नोव्हें. १९८२, पृ. २८).

यावरून धडापासून वेगळे झालेले शिर, इतर कोणी एकत्रित न आणताही, आपोआप एकत्रित येऊन मनुष्य पुन्हा पूर्ववत एकसंध व सजीव होऊ शकतो हे दिसून येईल.

चक्रधरांचा शिरच्छेद झाल्यानंतर त्यांचे धड एकीकडे पडले व शिर एकीकडे पडले. नंतर 'श्रीकमळ एकीकडुनि चालीलें : श्रीमूर्ति एकीकडुनि चालीली आणि दोन्ही जडलीं : मिळालीं : आणि उठूनि आसन जालें :' (उत्त. ६५१) ही विस्मयकारक घटना घडू शकते. त्यासाठी वेगवेगळे होऊन पडलेले शरीरावयव किंवा धड आणि शिर इतर कुणी एकत्रित आणण्याची आवश्यकता नाही. 'विदीर्ण अवयव आपोआप एकत्र येऊ शकत नाहीत' हे म्हणणे बरोबर नाही. हे अवयव आपोआप, आपणहून एकत्रित येऊ शकतात व संपूर्ण शरीर पुन्हा पूर्ववत एकसंध आणि सजीव होऊ शकते हे गोरक्षनाथ व एकांत रामय्या यांच्या उपरोक्त कथांवरून स्पष्ट दिसून येईल. चक्रधरांचा शिरच्छेद झाल्यावर 'श्रीकमळ एकीकडुनि चालीलें श्रीमूर्ति एकीकडुनि चालिली :' आणि अशा रीतीने धड व शिर आपोआप एकत्रित येऊन चक्रधरांनी त्यात पुन्हा प्रवेश केला व नवा अवतार स्वीकारला आणि नंतर सारंगपंडिताला भेट देऊन त्यांनी उत्तरापंथे बीजे केले, ही वस्तुस्थिती होय.

अवतार-स्वीकाराच्या शरीराचे युक्तत्व

या अवतार-स्वीकाराच्या बाबतीत, ज्या शरीरात ईश्वराला अवतार घ्यायचा असतो ते शरीर 'युक्त' असले पाहिजे, असे डॉ. डोळके वारंवार सांगतात. 'महानुभाव तत्त्वज्ञानातही ईश्वर अवतार घेताना 'युक्त' शरीरातच प्रवेश करतो, असे सांगितले आहे.' 'ईश्वर अवतार धारण करताना अयुक्त शरीरात प्रवेशच करीत नाही' असे ते पुन:पुन्हा म्हणतात. त्यांच्या या विधानांचा आता विचार करू.

महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणे युक्तत्वाची कल्पना देवताधिष्ठानाशी निगडित आहे. जीवाच्या

ज्या देहात सर्व देवतांच्या पिंडस्था विद्यमान असतात तो 'युक्त' देह, आणि ज्या ईश्वरावताराजवळ सर्व देवतांच्या ओळगण्या सेवेला असतात तो 'युक्त' अवतार. एकूण ८१ कोटी सव्वालक्ष दहा देवता आहेत. जीवाने धारण केलेल्या देहात या सर्व देवतांच्या पिंडस्था असल्या पाहिजेत (जेचि मान ब्रम्हांडीं तेंचि पिंडीं-विचार ६४) शरीरावयवातील या पिंडस्थांची स्थानेही निश्चित आहेत. त्या त्या अवयवात त्या त्या देवतांची अधिष्ठाने असल्यावाचून त्यांची कार्ये चालत नाहीत. म्हणून देवताधिष्ठानावाचून असलेला पिंड अयुक्त ठरतो. एखाद्या पिंडात एखाददुसऱ्या अवयवाच्या अभावी सर्व देवतांचे अधिष्ठान नसेल तर तो पिंड 'अयुक्त' ठरतो. याच अर्थाने सर्वावयवांनी युक्त असलेल्या मनुष्य देहाला 'युक्त' देह म्हणवात. कारण, अवयवावाचून पिंडस्था राहू शकत नाहीत.

ईश्वराने धारण केलेल्या अवताराच्या पिंडात (=शरीरात) मात्र या अर्थाने सर्व देवतांच्या अधिष्ठानांची आवशकता नसते. कारण, त्या अवताराच्या संपूर्ण देहात सर्वश्रेष्ठ देवता मायाच व्यापून असते. (उद्धरण. १-७) त्यामुळे त्या देहाचा एखादा अवयव तुटला तरी हरकत नाही. पण हे देवताधिष्ठानाचे 'युक्तत्व' ईश्वरावताराच्या बाबतीत निराळ्या प्रकारे अपेक्षित असते. ईश्वराने अवतार घेतल्यानंतर त्याच्या सेवेसाठी मायेसहित सर्व देवतांच्या ओळगण्या येतात. असा सर्व देवतांच्या ओळगण्यांनी युक्त (= सर्वशक्तियुक्त) तो 'युक्त' अवतार होय. (महावाक्य. १) ईश्वराचा हा अवतार नेहमीच युक्त असतो असेही नाही. भोगभूमीतील ईश्वरावताराजवळ सर्व देवतांच्या ओळगण्या असू शकत नाहीत. कारण भोगभूमी ही कर्मभूमीबाहेर आहे, आणि म्हणून तेथे कर्मभूमीच्या देवता ओळगण्यांच्या रूपाने जाऊ शकत नाहीत. हा अवतार 'अयुक्त' अवतार होय.

पण ईश्वरावताराचे हे युक्तत्व किंवा अयुक्तत्व अवतार घेतल्यानंतर. अवतार घेण्यापूर्वी असे युक्तत्व त्या अवताराच्या ठिकाणी मुळीच नसते. आणि ज्या देहात ईश्वराला अवतार घ्यायचा असतो तो देह सर्वावयवांनी म्हणजेच सर्व देवतांच्या पिंडस्थांच्या अधिष्ठानांनी 'युक्त' असलाच पाहिजे असे चक्रधरस्वामींनी कोठेही सांगितलेले नाही. 'मायापुरधारिये होती :' (उद्ध. ४) या वचनावरील 'मायापुर म्हणजे अवघे पुरतें : तेथ काहीं उणें नाहीं' या पक्षावर भाष्य करताना 'मायापुर म्हणजे त्रिप्रकारकः छतीस विभागासहित युक्त मनुष्यत्वांगीकार' असे 'लक्षणवृंद'कारांनी म्हटले असले तरी त्यांनीच त्यापूर्वी दुसऱ्या वचनाच्या टीकेत 'मग मनुष्यवेषाचां वचनीं सर्वावयवीं संपूर्ण : चातुष्टययुक्त : बत्तीस लक्षणवंत... तो उत्तम मनुष्य वेष : मग उत्तरोत्तर सेवट : वेडे : पिसे : मुके : ऐसे चार भेद जाणावे :' असे स्पष्टीकरण करून ठेवले आहे. 'सूत्रपाठा'च्या 'विचार' प्रकरणातील 'परमेश्वर त्रिविधापरी मायापुरातें स्वीकरीती :' या वचनावरील 'मायापुर हे उचित नाम' या पक्षाचे स्पष्टीकरण 'विचारवंद'कार 'एवं वपुचें पुरतेपण म्हणजे छत्तीसा विभागीं युक्त तो मनुष्यवेष : तयाचां ठाइं :' असे करतात. येथे 'युक्त' हा शब्द 'युक्तत्वा'च्या अर्थी योजलेला नाही. दुसरे असे की, हेही वर्णन 'पुरतेपण' असलल्या उत्तम मनुष्यवेषाचे आहे. इतके असूनही, अवतार धारण करण्यासाठी अवताराचे शरीर सर्वावयवांनी युक्त असलेच पाहिजे असे आग्रहपूर्वक म्हणायचे असेल तर ते चक्रधरोक्तीला धरून नाही, हे पुढील विवेचनावरून दिसून येईल.

कच्छावतार : मच्छावतार

'देवो कच्छ होति : मच्छ होति : देवामध्यें अवतरति : नरामध्यें अवतरति : तिर्यंचामध्यें अवतरति नरामध्यें अवतरला सातां देवो वेडा होए : पीसा होए : मूका होए : परि चालता बोलता देवो तो दुर्लभु कीं गा :' (विचार. १०६) निरनिराळ्या योनीतील परमेश्वराच्या अवतारांचे असे वर्णन चक्रधरांनीच सांगितले आहे. ईश्वर कासवात किंवा माशात अवतार घेतो तेव्हा या कासवाचा किंवा माशाचा पिंड डॉ. डोळके मानतात त्या प्रमाणे 'सर्वावयवांनी' युक्त नसतो. हस्तपादादिक कर्मेंद्रिये त्यांच्या ठिकाणी नसतात. मग सर्व देवतांच्या पिंडस्था त्यांच्या शरीरात कुठून असणार आणि म्हणून त्यांचा पिंड 'युक्त' कसा म्हणता येईल? तसा तो नसतो तरीही त्या 'अयुक्त' शरीरात ईश्वर अवतार घेतोच ना?

मनुष्यातील गर्भावतार

'कच्छ आणि मच्छ' यांचे देह सृष्टिव्यवस्थेमुळे जसे निर्माण झाले आहेत त्याच स्वरूपात ते 'युक्त' मानले पाहिजेत असे यावर म्हणता येईल. म्हणून त्यांचा अधिक विचार न करता ईश्वर मनुष्यावतार घेतो त्यावेळी त्या शरीराचा पिंड 'सर्वावयवांनी' युक्त असतो काय, हे पाहू. ईश्वराला गर्भावतार धारण करायचा असल्यास मातेच्या गर्भात ज्या वेळी जीव येतो त्याच वेळी त्या गर्भात ईश्वरस्वरूप प्रवेश करून ईश्वर मनुष्यावतार धारण करतो. ही अवस्था कोणती ? 'ईश्वरीं संपूर्ण शक्ति' (उद्ध. ११) या वचनावर भाष्य करताना 'लक्षणस्थळा'त सांगितले आहे की, 'कलीलावस्थे शक्ती येती' याचे स्पष्टीकरण 'लक्षणबंद'कार पुढीलप्रमाणे करतात : 'तरी कलीलावस्था ते कैसी ?ना प्रथम शुक्र शोणित रुधिर धातु सलीला असति : तिया कलीला म्हणजे खोटबद्ध होती : तिये अवस्थे एवं तिये समयीं जीव ये तथा ईश्वरही तियेचि काळी येती आन परश्मेवर येताचि शक्ती म्हणजे समग्र ओळगण्या ओळगावयासि येती : आन पिंडस्था तिया जवंजवं पिंड वाढे तवंतवं अवयवीं येती' याचा अर्थ स्पष्ट आहे. मातेच्या गर्भातील शुक्रशोणिताची सलीलावस्था संपून कलीलावस्था येते म्हणजे त्या खोटबद्ध होतात, त्यांचा गोळा होतो त्याचवेळी ईश्वर त्याठिकाणी प्रवेश करून गर्भावतार घेतो. यावेळी त्या गोळ्यात कोणतेही शरीरावयव निर्माण झालेले नसतात, म्हणजेच तो गोळा 'सर्वावयवांनी युक्त' असतो असे नाही. तरीही त्याठिकाणी ईश्वर अवतार घेतो, म्हणजेच अवयवांच्या दृष्टीने 'अयुक्त' अवस्थेतच ईश्वर अवतार घेतो. सामान्य जीवाच्या बाबतीत मात्र त्याच्या मातापित्याच्या गर्भातील शुक्रशोणिताच्या गोळ्याला पुढे जसजसे अवयव येतात तसतशा त्याठिकाणी 'पिंडस्था' येतात. सर्व अवयव निर्माण होऊन तेथे सर्व देवतांच्या पिंडस्था आल्या म्हणजेच तो मनुष्य देह 'युक्त' होतो. त्यापूर्वीचा त्याचा देह अयुक्त असतो. गर्भाच्या त्या अवयवहीन स्थितीत ईश्वर अवतार घेत असल्यामुळे तो अयुक्त देहातच अवतार घेतो हे स्पष्ट दिसते.

'देवो कच्छ होति : मच्छ होति......' या उपरोक्त वचनावर टीका लिहिताना 'विचारबंद'कार प्रथम याचा वचनसंबंध पक्षहेतू स्पष्ट करताना लिहितात '......मा तर ये वचनीं आधी कच्छ : मच्छ : मग देव : नर : तयापाठी तिर्यंच कां पां उच्चारिले ? ना गर्भी देह स्वीकरीती ते मनुष्यही तीर्यंचाचि सारीखे : मग प्रौढ जालेया हस्तपादादिकांची व्यक्तता होय : मग युक्तता होय...' यावरून ईश्वर गर्भात अवतार स्वीकारतात त्यावेळी अवताराचा देह 'अयुक्त' असतो हेच दिसून येते.

दवडण्याचा अवतार

या दृष्टीने विचार केला असता श्रीकृष्ण, श्रीचक्रपाणी हे गर्भीचे अवतार असल्यामुळे त्यांनी कलिलावस्थेत असलेल्या अयुक्त शरीरात अवतार घेतला होता असे दिसते. श्रीप्रभूंचा अवतार हा जसा गर्भीचा तसा दवडण्याचाही अवतार मानतात. 'गर्भी स्वीकरीती : कां पतितातें उठवीति : कां जीवातें दवडीति' (विचार १०५) या वचनावरील 'गर्भी दवडणें आति' या पक्षाचे स्पष्टीकरण करताना 'विचारबंद'कार लिहितात : 'तें कैसें ? ना जीव जेव्हेळी ये तेव्हेळी तया जीवातें दवडौनि आपण स्वीकरीति : तें दडवणें' हे लक्षात घेता श्रीप्रभूंनी अयुक्त शरीरातच अवतार घेतला होता असे दिसते.

पतितावतार

पतितावतार घेताना कोणती परिस्थिती असते ? चक्रधरांचा अवतार हा पतितावतार होता. त्यांनी हरिपाळदेवाचे पतित उठविले होते. ते पतित सर्वावयवांनी युक्त होते. म्हणजे त्याला सर्व अवयव होते खरे. पण महानुभाव तत्वज्ञानाच्या दृष्टीने ते 'युक्त' शरीर नव्हते. कारण, हरिपाळदेव मृत झाल्यावर त्याच्या शरीरातील सर्व पिंडस्था आणि इंद्रियाधिष्ठानसामर्थ्ये निघून गेली होती, म्हणूनच त्याच्या सर्व इंद्रियांची कार्ये बंद पडली होती. त्यामुळे ते शरीर 'अयुक्त' झाले होते. तरीही चांगदेवराउळांनी त्यात प्रवेश करून अवतार घेतला, म्हणजे त्यांनीही अयुक्त शरीरातच अवतार घेतला. काही महानुभावांच्या मते देहातून जीवाला काढण्यात आल्यानंतर सुद्धा

अंतिकाचे संचारी दुःख भोगविण्यासाठी जीवाला काही परमाणूंत एक प्रहरभर ठेवण्यात येते. त्यानंतर जीव व त्याच्याबरोबर पिंडस्था निघून जातात. हे लक्षात घेतले तरी चांगदेवराउळांनी हरिपाळाचे पतित उठवले त्यावेळी त्याचा देह अयुक्तच होता. कारण, हरिपाळदेवाचा मृत्यू झाल्यावर, घरातील रडणे, एकमेकांचे सांत्वन करणे, प्रेताच्या दर्शनासाठी अनेक नातेवाइकांचे व अधिकाऱ्यांचे येणे, तिरडीचे सामान गोळा करणे, प्रेताला स्नान वगैरे घालून ते तिरडीवर बांधणे, नंतर स्मशानापर्यंत नेणे या सर्व गोष्टींना एका प्रहरापेक्षा (३ तासापेक्षा) किती तरी अधिक काळ लागला असणार ! तोपर्यंत ते 'पतित' निश्चित 'अयुक्त' झाले असणार तेव्हा, 'ईश्वर अवतार धारण करताना अयुक्त शरीरात प्रवेशच करीत नाही' असे म्हणणे महानुभाव तत्त्वज्ञानाला धरून नाही.

सारांश, अवतार घेताना ज्या मनुष्यदेहामध्ये अवतार घ्यायचा असेल तो देह सर्वावयवांनी युक्त असला पाहिजे असे महानुभाव तत्त्वज्ञानात कोठेही सांगितलेले नाही. चक्रधरांच्या कोणत्याही वचनातून तसे दूरान्वयानेसुद्धा सूचित होत नाही. मी माझ्या लेखात नागार्जुनाचे आणि आदि महादेवी विद्यावंताचे, अशी दोन उदाहरणे दिलेली होती. त्यांची चर्चा करून डॉ. डोळके म्हणतात की, 'सर्व अवयवांनी युक्त शरीर असण्याची आवश्यकता चक्रधरांनी एका सूत्राद्वारेही व्यक्त केली आहे.' असे म्हणून 'विचार मालिके'तील ५४ व्या सूत्राचा उल्लेख त्यांनी केला आहे. त्यावरून पुन्हा त्यांनी म्हटले आहे की, 'कोणतीही विद्या इंद्रियांद्वाराच शरीरात संचारू शकते. म्हणून, शरीर युक्त असणे अवश्य आहे.' आणि त्यानंतर ते पुन्हा प्रतिपादन करतात की, 'आणि वरील दोन लीळांतच केवळ नव्हे तर महानुभाव तत्त्वज्ञानातही ईश्वर अवतार घेताना 'युक्त' शरीरातच प्रवेश करतो असे सांगितले आहे.'

विद्यावंत आणि ईश्वरावतार

डॉ. डोळके यांचे हे सर्वच प्रतिपादन दिशाभूल करणारे आहे. यातील त्यांच्या शेवटच्या वाक्यावरून असे वाटते की, त्यांच्या मते नागार्जुन व आदि महादेवी या संबंधीच्या या दोन्ही लीळांत 'ईश्वर अवतार घेताना युक्त शरीरातच प्रवेश करतो असे सांगितले आहे.' ही त्यांची समजून पूर्णपणे चुकीची आहे. धड व शिर एकत्रित आल्यावर नागार्जुन उठणार होता, त्यात ईश्वर अवतार घेणार नव्हता. आदि महादेवी विद्येच्या अवस्थेत, पत्नीने छिन्नविच्छिन्न केलेले शरीरावयव एकत्रित केल्यावर शरीर स्वीकारणार होता तो आदि महादेवी विद्यावंतच. येथेही ईश्वरस्वरूप त्यात प्रवेश करून अवतार घेणार नव्हते. मग 'वरील दोन लीळांत...ईश्वर अवतार घेताना युक्त शरीरातच प्रवेश करतो असे सांगितले आहे' असा निष्कर्ष डॉ. डोळके काढतात हे चुकीचे आहे. इतकेच नाही तर त्यांना या लीळा नीट समजल्या नाहीत याचेच ते द्योतक आहे. वस्तुतः या दोन्ही लीळांचा ईश्वराने अवतार घेण्याच्या प्रश्नाशी दूरान्वयानेदेखील संबंध नाही.

इंद्रियद्वारक शक्तिसंचार

या दोन लीळांतून असा अर्थ काढण्यात डॉ. डोळके यांनी जशी चूक केली आहे तशीच त्यांनी 'सर्व अवयवांनी शरीर युक्त असण्याची आवश्यकता चक्रधरांनी एका सूत्राद्वारेही व्यक्त केली आहे' असे म्हणून 'विचारमालिके'तील ५४ व्या सूत्राचे प्रमाण देतानाही केली आहे. पहिली गोष्ट अशी की, 'विचारमालिके'तील हे वचन 'इंद्रियद्वारक शक्तिसंचार' असे आहे. डॉ. डोळके ('निरुक्तशेषाच्या' आधारे) 'इद्रियेंद्वारक : एथौनि संचार' असे ते वचन असल्याचे सांगतात ते बरोबर नाही. सूत्रपाठातील या वचनाचा असा पाठ कोठेही नाही. ज्या अर्थी 'निरुक्तशेषा'चा आधार डॉ. डोळके देतात त्यावरून 'निरुक्तशेष'कर्ता पंडित भीष्माचार्य वाइंदेशकर यानेच तयार केलेल्या वाइंदेशकराच्या सूत्रपाठात ते असावे, असे वाटते. पण हा पाठ पंथात मान्य नाही. कारण, या वाइंदेशकरांनी आपल्या या पाठात (निरुक्तशेषातील लीळांतही) 'स्वोक्ती' पुष्कळच केलेली आहे. मूळ वचनातील 'शक्तिसंचार' या ऐवजी 'एथौनि संचार' ही अशीच स्वोक्ती होय. 'एथौनि' शब्दाचा 'आमच्याकडून' (म्हणजे परमेश्वरावताराकडून) असा अर्थ होतो. तो सोयीचा वाटला म्हणून डॉ. डोळके यांनी उद्धृत केलेला दिसतो.

अनुक्रमणिका

विद्यासंचार करताना विद्या देणारा विद्यावंत किंवा परमेश्वर आणि विद्या स्वीकारणारा विद्याधिकारी हे दोघेही 'युक्त' पाहिजेत यात शंका नाही. पण त्यासाठी इतर प्रमाणे आहेत. या वचनावरूनही तसा अर्थ काढता येईल, नाही असे नाही. पण 'सर्व अवयवांनी शरीर युक्त असण्याची आवश्यकता' प्रतिपादन करणे हा या सूत्राचा मुख्य हेतू नाही. 'विद्या कवणे द्वारे संचरे' हे सांगणे हा मुख्य हेतू आहे. पण हा प्रश्न बाजूला ठेवला तरी मुख्य प्रश्न असा की, या वचनाचा ईश्वराने अवतार घेण्याच्या प्रश्नाशी काय संबंध आहे? अवतार घेतल्यावर त्या 'युक्त' अवतारालाच शक्तिसंचार करता येतो एवढेच फार तर त्यावरून दिसेल. पण ईश्वराने अवतार घेताना, 'युक्त' शरीरातच तो घेतला पाहिजे असे या वचनाच्या आधारे प्रतिपादन करणे हे अन्यथाज्ञान होय. सारांश, अवतार घेताना, ज्या शरीरात अवतार घ्यायचा आहे ते शरीर 'सर्वावयवांनी' युक्त असलेच पाहिजे असे महानुभाव तत्त्वज्ञानात कोठेही सांगितले नाही.

पोथ्याधिक्याचा पोकळ दावा

पोथ्याधिक्याचा प्रश्न का व कोणत्या संदर्भात निघाला? आपल्या पहिल्या लेखात डॉ. डोळके यांनी 'लीळाचरित्राची हस्तलिखिते' या दुसऱ्या भागात 'डॉ. कोलते यांनी 'चक्रधर चरित्र' लिहिताना २४ हस्तलिखितांचा उपयोग केलेला आहे. पण, त्यांपैकी फक्त ३ पोथ्यांतच वधासंबंधीचा वृत्तांत आहे' असे विधान केले होते. त्याला उत्तर देताना मी असे दाखवून दिले की, या २४ हस्तलिखितांपैकी उत्तरार्ध चरित्राच्या फक्त ११ पोथ्या होत्या आणि त्यांतील ६ पोथ्यांत म्हणजे निम्याहून अधिक पोथ्यांत वधाची लीळा आढळते.

डॉ. डोळके यांनाही हे मान्य आहे. कारण त्यांनी स्पष्टच म्हटले आहे की, 'तसेच २४ हस्तलिखितांतील उत्तरार्धाच्या ११ पोथ्यांपैकी ६ पोथ्यांत वधासंबंधीचा वृत्तांत आहे, असे म्हणून मीही माझी चूक मान्य करतो.' यावरून 'पोथ्याधिक्या'चा प्रश्न केवळ मी लिहिलेल्या 'श्री चक्रधरचरित्रा'च्या वेळी मला मिळालेल्या हस्तलिखितांपुरताच मर्यादित आहे हे लक्षात घ्यावे.

त्यावेळी मला मिळालेल्या, वधाचा वृत्तांत देणाऱ्या पोथ्यांची संख्या ११ वरून ८ पर्यंत आणण्याचा डॉ. डोळके यांनी प्रयत्न केला आहे. त्यांचे म्हणणे असे की, व. भ. म. या तीन पोथ्या तळेगावकर पाठाच्या असून हा तळेगावकर पाठ मी अप्रमाण मानत असल्यामुळे त्या विचारात घेण्याचे कारण नाही. त्यासंबंधी माझे म्हणणे असे की, तळेगावकर पाठ मी अप्रमाण मानतो ते महानुभावांनीच जे प्रमाण पाठ म्हणून निर्देशिलेले आहेत त्यांत त्याचा अंतर्भाव नाही म्हणून. दुसरे असे की, अप्रमाण म्हणून मानण्यात आलेल्या या पाठातील जो मजकूर प्रमाण पिढीपाठातील मजकुरासारखाच आहे तो विचारात घेण्यास काय हरकत आहे? या पोथ्यांतील वधाच्या वृत्तांतात शब्दशः एकवाक्यता नसेलही, पण मूळ घटना तर तीच आहे ना? लीळाचरित्राच्या भिन्नभिन्न पाठांत एकच घटना प्रत्येक पाठकार आपल्या शब्दांत वर्णन करीत असतो. त्यामुळे शाब्दिक फरक नेहमीच संभवतात. पण म्हणून मूळ घटना नाकारण्याचे कारण नाही. त्या पाठकारांना ती घटना मान्य असते फक्त ती त्यांनी आपल्या शब्दांत वर्णन केलेली असते, इतकेच म्हणून ती विचारात घेण्यास काहीही हरकत नाही. या बाबी तारतम्याने ठरवायच्या असतात. 'चक्रधरचरित्रा'च्या परिशिष्टात त्यावेळी ज्या पोथीतून वधाची लीळा मी उद्धृत केली त्या पोथीत आरंभीची 'खर्ग घातलें : श्रीकमळ एरीकडे पडिलें : श्रीमूर्ती एरीकडे पडिली' ही वाक्ये नसतीलही. पण त्यानंतर आलेल्या 'श्रीकमळ एकीकडुनि चालीलें : श्रीमूर्ती एकीकडुनि चालीली : आणि दोन्ही जडली : मिळाली' या वाक्यावरून त्यापूर्वी 'श्रीकमळ एरीकडे पडिलें श्रीमूर्ती एरीकडे पडिली'–हे घडले असले पाहिजे हे स्पष्टपणे दिसून येते. त्याशिवाय ती जडणार व मिळणार कशी? अशा फरकामुळे मूळ वृत्तांत अस्वीकार्य ठरत नाही. 'पूर्वार्धाच्या पोथ्यांच्या यादीतील म प्रतीत पूर्वार्धाप्रमाणेच उत्तरार्धही आहे' असे माझ्या लेखात छापले गेले हे खरे. तेथे म ऐवजी व् हे अक्षर पाहिजे, हे माझ्या लेखातील

पूर्वसंदर्भावरूनही दिसून येईल. या माझ्या लेखन वा मुद्रण–दोषाबद्दलची जबाबदारी माझी आहे. हा दोष लक्षात आणून दिल्याबद्दल डॉ. डोळके यांचा मी आभारी आहे. ३० वर्षांपूर्वी मला मिळालेली म पोथी ही, डॉ. डोळके यांना म. तपस्वीन्द्र शास्त्री यांनी दिलेली तळेगावकर पाठाची पोथी असावी अशी शंका त्यांनी त्यातील समाप्ति-लेखावरून व्यक्त केली आहे. तथापी, मला ३० वर्षांपूर्वी मिळालेल्या म पोथीत चक्रधरांच्या वधाची लीळा होती हे निश्चित. आजचा वाद निर्माण होण्यापूर्वी ३० वर्षे अगोदर मी तिचा उपयोग केला आहे. पण म. तपस्वीन्द्रशास्त्री यांनी डॉ. डोळके यांना दिलेल्या पोथीत म प्रती-प्रमाणे समाप्तिलेख असूनही तीत वधाची लीळा मात्र नाही. तेव्हा हे गौडबंगाल कसे निर्माण झाले असावे हा प्रश्न सोडविणे कठीण नाही. 'यक्षसृष्टी' सारख्या या चमत्काराचे गूढ ती पोथी पाहाण्याला मिळाली तर सहज सुटू शकेल.

श्रीचक्रधरचरित्र–लेखनानंतर

'श्रीचक्रधरचरित्र' लिहिताना मला मिळाले-ल्या उत्तरार्धाच्या सहा पोथ्यांत वधाची लीळा होती. त्याशिवाय, त्यानंतर मला पाहावयास मिळालेल्या, ज्यात वधाची लीळा आहे अशा आणखी ११ पोथ्यांची माहिती मी माझ्या लेखात नमूद केली आहे. ती अशी : माहूर मठ २; औरंगाबाद आश्रम ४; वा. ना. देशपांडे १; म. श्रीमुरलीधरशास्त्री १ व सध्या माझ्या जवळ असलेल्या ३; एकूण ११. त्यापूर्वीच्या ६ व ह्या ११ अशा एकूण १७ पोथ्यांत वधाचा वृत्तांत आहे. त्यावरून 'हा वृत्तांत देणाऱ्या पोथ्या 'तुरळक' नाहीत, 'पुष्कळ आहेत' 'असे मी म्हटले होते.

यावर उत्तर देताना आता डॉ. डोळके म्हणतात की, 'लीळाचरित्राच्या ज्या पोथ्या उपलब्ध आहेत त्यांपैकी 'फारच थोड्या' प्रतीत वधाचा वृत्तांत आहे' असे म्हणून त्यांनी काही पोथ्यांचा निर्देश केला आहे. त्यांचीही संख्या १७ च आहे. ती अशी : श्री. पंजाबी ६; डॉ. जोशी १; मुरारीमल्ल-बासांच्या शोधनीच्या ३; त्यांच्या लेखातील (४) या पोटकलमात नमूद केलेल्या ३; म. ऋषिराज १; रणाईचे आश्रम १; आणि सध्या त्यांच्या जवळ असलेल्या २; एकूण १७. म्हणजे मी पाहिलेल्या पोथ्यांपैकी वधाची लीळा असलेल्या पोथ्या १७; आणि डॉ. डोळके यांनी निर्देशिलेल्या पोथ्यांपैकी वधाच्या लीळा नसलेल्या पोथ्याही १७ च. !

डॉ. डोळके यांनी निर्देशिलेल्या १७ पोथ्यांच्या यादीतील ४ पोथ्या मुरारीमल्लबासांच्या पाठाच्या आहेत. आपल्या पाठात आपण विक्षेपी लीळा गाळल्याचे मुरारीमल्लबास स्वतःच सांगतात. तेव्हा त्यांच्या पाठात वधाची लीळा नाही यात आश्चर्य नाही. वधाचीच नव्हे तर अवयवछेदाचीही लीळा त्यांनी गाळली आहे. इतकेच नाही तर इतर पाठांत आढळणाऱ्या अवयवछेद व वध या घटनांच्या सूचक लीळाही त्यांनी जाणूनबुजून गाळल्या आहेत. या ४ पोथ्या वगळल्या तर इतर १३ पोथ्यांत वधाची लीळा नाही.

वधाच्या सूचक लीळा

पण त्यांत वधाची लीळा नाही हे आवर्जून सांगतानाच त्यांनी त्यात 'भटां विरहें रुदन निषेधु' किंवा 'भटां लग्नघडी अनुवादु : तया रुदन निषेधु'; 'राजेया आव्हानीं आउप्रति उत्तर देणें'; 'म्लेंछामध्यें अवतरण'; 'माहादेओ-पुरवाटीं पाल्हाडांगिया भेटि' ह्या वधाच्या सूचक लीळा आहेत की नाहीत हेही आवर्जून सांगितले असते तर बरे झाले असते. कारण, मुरारीमल्लबासांचा पाठ सोडून इतर सर्व पाठांत या लीळा आढळतात आणि त्या सर्व चक्रधरांच्या वधाच्या सूचक आहेत. 'म्लेंछामध्यें अवतरण' या लीळेत चक्रधराला वधस्थानाजवळ नेण्यात आले व तेथे त्यांचा वध करण्यासाठी चांडाळ उपस्थित होते, हे वर्णन केले आहे; तर 'महादेओ-पुरघाटी–' या लीळेत वधाची सूचक वाक्ये आहेत. काही प्रतीत 'आइकिलें तें साच की देखिलें तें साच : जी जी देखिलें तें साच :' असे वर्णन असले तरी तेही वधाचे सूचक कसे आहे याचे विवेचन मी माझ्या पूर्वीच्या लेखात केले आहे. इतर काही प्रतीत तर 'आइकिलें तें साच आणि

देखिलें तेंही साच :' म्हणौनि श्रीकंठाकडे रेघ दाखविली : रांवयाचीये चांचुसारखी ' असे स्पष्ट वर्णन आहे. काही प्रतींत हा दुःखद उल्लेख कोमळबोधवंताच्या वाचनात येऊ नये म्हणून लीळेतील मजकूर गाळला असला तरी तिची 'आदि' नमूद केली आहे. वर्णन गाळून नुसती आदि नमूद केली आहे यावरूनच त्या वर्णनात वधाचा उल्लेख निश्चित असला पाहिजे, हे स्पष्ट दिसते. डॉ. डोळके यांनी निर्देशिलेल्या वरील १३ पोथ्यांत या लीळा आहेत की नाहीत ते त्यांनी नमूद करावयास पाहिजे होते. संशोधक या नात्याने त्यांचे ते कर्तव्य होते. त्यांनी ते नमूद करण्याचे टाळले, याचा अर्थ वधाच्या सूचक लीळा त्या पोथ्यांत निश्चित असल्या पाहिजेत. वधाच्या सूचक अशा उपरोक्त लीळाही ज्यांत नाहीत अशा पोथ्या किती आहेत, हे त्यांनी स्पष्ट करायला पाहिजे होते.

अलीकडील उपलब्धी

मी पूर्वी पाहिलेल्या, ज्यांत वधाची लीळा आहे अशा उपरोक्त १७ पोथ्यांशिवाय मला अलीकडे अशा आणखी ३ पोथ्या मिळाल्या आहेत. त्यांपैकी एक संवत्सर येथील महानुभाव आश्रमातील असून तिचा लेखनशक १५३९ आहे. दुसरी पोथी म. कोल्हेकरबावा महानुभाव यांची असून तिचा लेखन–शक १४७९ आहे. आणि तिसरी पोथी रिद्धपूर येथील श्री गोपीराज ग्रंथसंग्रहालयातील असून तिचा लेखन–शक १४४४ आहे. याखेरीज पुणे येथील श्रीकृष्ण–मंदिरात अशा दोन पोथ्या असल्याची माहिती मिळाली आहे. तेव्हा, वधाच्या लीळा असलेल्या पोथ्या 'तुरळक' आहेत की 'पुष्कळ' आहेत याचा, आणि पोथ्यांच्या संख्याधिक्याचा कुणाचा दावा पोकळ आहे याचा अभ्यासकांनीच विचार करावा. आपल्या लेखात (युगवाणी. फेब्रु–मार्च ८३) डॉ. डोळके यांनी असेही म्हटले आहे की, 'चक्रधरांच्या वधाची लीळा सुमारे शके १५०० पर्यंत निर्माण झाली नव्हती.' मला अलीकडे मिळालेल्या पोथ्यांपैकी एक शके १४७९ ची, तर दुसरी शके १४४४ ची आहे. आणि या दोहोंतही वधाची लीळा आहे. तेव्हा डॉ. डोळके यांचे हेही म्हणणे टिकू शकत नाही हे सांगणे नलगे !

मूर्तिप्रकाशातील उल्लेख

डॉ. डोळके यांचे या बाबतीतील मूळ प्रतिपादन असे की, 'चक्रधरावर करण्यात आलेल्या विषप्रयोगाचा वृत्तांत ज्या मूर्तिप्रकाशात आढळतो त्या मूर्तिप्रकाशात देखील चक्रधराच्या वधाचा उल्लेख नाही.' या काव्यात वधाचा स्पष्ट उल्लेख आहे हे दाखविण्यासाठी

> भणौनि वृद्धासंगमीचें महिमान
> प्रसंगु नए अती गहन
> भक्ता इश्वरा उभयां हनन
> जेथ जालें ।। (३०३)

ही 'वृद्धासंगमव्यावृत्ती'तील ओवी उद्धृत करून 'या ओवीत भक्त=बाइसा आणि ईश्वर =श्रीचक्रधर या दोघांचेही हनन=वध झाल्याचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे' असे मी दाखविले. हा उल्लेख वृद्धासंगमाच्या व्यावृत्तीत असण्याचे तात्विक कारण 'या दोघाच्याही हननाला कारणीभूत होणारे प्रसंग वृद्धासंगम येथे घडले होते' म्हणून मी स्पष्टीकरण केले आहे.

हे स्पष्टीकरण म्हणजे 'सारवासारव' आहे असे डॉ. डोळके म्हणतात. त्यांचे म्हणणे असे की (झाला असल्यास) बाइसाचा मृत्यू आणि चक्रधरांचा वध प्रत्यक्ष वृद्धासंगम येथे झालाच नाही. मी तरी असे कोठे म्हटले ? या हननाच्या घटनांना कारणीभूत झालेले प्रसंग वृद्धासंगम येथे घडले असे माझे म्हणणे आहे. त्यात चूक काही नाही.

या ओवीतील 'हनन' शब्दाचा वध हा अर्थ येथे लागू पडत नाही, तर येथे बाइसाचे हनन म्हणजे 'दुष्ट दुर्वार्ता ऐकून बाइसाने आपला मृत्यू स्वतः ओढवून घेतल्यामुळे तिचे एक प्रकारचे हननच झाले' हे तर त्यांनी मान्य केलेच आहे. पण पुढे चक्रधरांच्या बाबतीत 'हनन' शब्दाचा त्यांना जो निराळा अर्थ करून दाखवायचा आहे त्याची भूमिका तयार व्हावी म्हणून 'दुष्ट दुर्वार्तेने त्या 'सप्रेमळा भक्ता'ला 'घेतले' म्हणजे तिच्या अंतःकरणाचा घात केला असा अर्थ ते करून दाखवितात. ही कसरत करूनही शेवटी "दुःखहत अवस्थेत तिने 'देहत्याग केला'. 'त्यामुळे तिचा मृत्यू म्हणजे दुष्ट दुर्वार्तेने केलेले तिचे 'हनन'

असे दूरान्वयाने मानता तरी येते" असे त्यांनी म्हटले आहे दूरान्वयाने का होईना या ओवीतील 'हनन' शब्दाचा 'मृत्यू' हा अर्थ त्यांनी मान्य केलेला आहे.

'मूर्तिप्रकाशा'तील 'ईश्वर हनना'चा अर्थ

पण त्याच ओवीतील त्याच 'हनन' शब्दाचा 'मृत्यू' हा अर्थ चक्रधरांच्या बाबतीत मात्र ते मान्य करीत नाहीत, हे आश्चर्य आहे! त्यांचे म्हणणे असे की, चक्रधरांच्या बाबतीत असा अर्थ आहे की, "बाइसांच्या मृत्युवार्तेने चक्रधरांच्या अंत:करणावर दु:खाचा आघात झाला. त्यांचे अंत:करण दु:खहत झाले." हा निव्वळ शब्दच्छल आहे. 'मूर्तिप्रकाशा'त हनन हा शब्द 'मृत्यू, वध' या अर्थानेच वापरला आहे. प्रतिष्ठान नगराची व्यावृत्ती करताना तेथील लोकांचे कवी वर्णन करतो :

> एकाची वोखटी वासना
> एक पात्र जाले उत्तम साधना
> एक प्रवर्तले ईश्वरहनना
> तयाचें नाव नेघिजे ॥ (२६९)

या ओवीत पूर्वोक्त 'ईश्वरहनन' हा शब्द आलेला आहे. येथे पैठणातील काही लोक 'ईश्वरहनना' प्रवर्तले होते म्हणजे काय ते चक्रधराच्या केवळ अंत:करण दुखवण्याला प्रवृत्त झाले होते असा अर्थ आहे? की 'ईश्वराचा (चक्रधराचा) वध करण्याला ते प्रवृत्त झाले असा अर्थ आहे? वृधासंगम—व्यावृत्तीत सुद्धा

> जे चांडाळ दुष्ट दुराचारी दुष्ट दुर्जन
> पापीये करूं आले ईश्वरहनन
> तया नीत्यनर्कावांचौन
> दुजें आनु साध्य नाही ॥ (२८६)

असा ईश्वरहननाचा उल्लेख आहे तो ईश्वराचा वध याच अर्थाने आहे. 'अंत:करण दुखवणे' हा अर्थ तेथे मुळीच नाही. अंत:करण दुखवणे ही हिंसाच होय व तिच्यामुळे 'नरक' होतात, हे डॉ डोळके यांना महानुभावांच्या भाष्यग्रंथात आढळले ही आनंदाची गोष्ट आहे. आता 'नित्यनरक' कोणत्या हिंसेने होतात याचा धांडोळा त्यांनी भाष्यग्रंथात घ्यावा. म्हणजे वरील ओवीत जे पापी 'ईश्वरहनन करूं आले' होते त्यांना 'नित्यनर्कावांचौन दुजें आनु साध्य' का नाही याचा उलगडा त्यांना होऊ शकेल. नित्यनिरक ईश्वरहननाने म्हणजे ईश्वराच्या वधानेच होतात, असे महानुभाव तत्वज्ञान सांगते. (विचारमालिका १२१-१२२) ते लक्षात घेता वरील ओवीतही ईश्वरहनन हा शब्द ईश्वराचा (चक्रधरांचा) वध याच अर्थाने आलेला आहे हे दिसून येईल. 'परी पापियाचें ओखटें मन : करूं आले ईश्वरहनन' (२९८) याही ओवीत तोच अर्थ आहे.

या तिन्ही ठिकाणी 'ईश्वरहनन' म्हणजे ईश्वराचा (चक्रधरांचा) वध हा अर्थ स्पष्ट आहे. तोच अर्थ 'भवता इश्वरा उभयां हनन' (३०३) या ओवीतील 'ईश्वरहनन' या शब्दाचा आहे, हे आणखी निराळे सांगण्याची गरज नाही. 'मूर्तिप्रकाशा'तील हे उल्लेख चक्रधरांच्या वधाचेच आहेत यात काहीही शंका नाही.

पेणोवेणा बीजें केलें

"चक्रधरांचा वध झाला असे 'मूर्तिप्रकाशा'वरून दिसत तर नाहीच; उलट चक्रधरांनी उत्तरापंथे बीजे केले आणि तेही 'पेणोवेणा' म्हणजे मुक्काम करीत करीत वीजें (प्रयाण) केले, असे मूर्तिप्रकाशकार स्पष्ट शब्दात सांगतात" असे डॉ. डोळके आणखी म्हणतात. यातील पूर्वार्धातील त्यांचे म्हणणे कसे चुकीचे आहे ते आतापर्यंत दाखविले. आता 'पेणोवेणा' वीजें केलें— या विधानावरील त्यांच्या भाष्याचा विचार करू. 'मूर्तिप्रकाशा'-तील त्यांनी उद्धृत केलेली ओवी अशी :

> अवधारीं जीवोद्धरणा
> तुं मानु देसी म्हाइयां ब्राह्मणां
> तरी तयातें न पुसत पेणोवेणा :
> कां वीजें केलें ॥ २८६३ ॥

यावरचे डॉ डोळके यांचे भाष्य असे : "म्हणजे चक्रधरांनी उत्तरापंथे बीजे केले ते 'पेणोवेणा' म्हणजे मुक्काम करीत करीत. 'बीजे करणे म्हणजे मृत्यू स्वीकारणे' हा एक अर्थ डॉ. कोलते यांनी सुचविला आहे, तो येथे लागू पडत नाही. कारण, तो अर्थ स्वीकारला तर काय असे म्हणायचे की चक्रधरांनी पेणोवेणा मृत्यू स्वीकारीत प्रयाण केले? किंवा पेणोवेणा मृत्यू स्वीकारला? 'अर्थु तो प्रकरणवशें' हे मी सांगायला पाहिजे असे

नाही, चक्रधरांनीच ते सांगून ठेवले आहे."

हे सर्व भाष्य 'पेणोवेणा' म्हणजे 'मुक्काम करीत करीत' या त्यांनी केलेल्या अर्थावर आधारलेले आहे. पण हा अर्थ चुकीचा आहे. त्याचा खरा अर्थ 'सरळ, तडक, मध्ये मुक्काम (वस्ती) न करता' असा आहे; आणि तो मी शिशुपाळवध काव्यातील 'वीरचूडु पेणोवेणा : एता जाला' (२३५); पेनोवेनां दळ बहु मिनलें' (५७७) या ओव्यांच्या संदर्भात त्या काव्याच्या शब्दकोशात दिला आहे. 'मूर्तिप्रकाश' काव्यातील उपरोक्त ओवीच्या संदर्भात 'या मुक्कामापासून त्या मुक्कामापर्यंत' असा अर्थ नोंदलेला आहे. या मुक्कामापासून (जेथून निघायचे तेथून) तो त्या मुक्कामापर्यंत (जेथे पोचायचे तेथील) मुक्कामापर्यंत' असाच त्याचा अर्थ आहे. कारण 'पेणोवेणा' जाणारी व्यक्ती एका ठिकाणाहून निघून जेथे पोचायचे त्या मुक्कामाच्या स्थानापर्यंत सरळ, मध्ये न थांबता, म्हणजे मुक्काम किंवा वस्ती न करता जात असते. मी दिलेल्या अर्थाचा तोच स्पष्टार्थ आहे. 'लीळा-चरित्रा'च्या शब्दकोशातही 'मुक्कामाच्या मार्गाने' 'मजल दरमजल' असे अर्थ नोंदले आहेत. कारण, 'पेणोवेणा' जायचे असले तरी, मुक्कामाच्या मार्गाने, मजल दरमजल' करीतच जायचे असते. पण मुक्कामाच्या कोणत्याही स्थळावर किंवा 'पेण्या'वर मुक्काम म्हणजे वस्ती मात्र करायची नसते. याचा अर्थ, एखाद्या 'पेण्या'वर पाणी पिण्यासाठी, भोजनासाठी किंवा निद्रेसाठीही थांबू नये असा नाही. कारण तो मुक्काम, म्हणजे वस्ती किंवा राहावा नव्हे.

डॉ. ढोळके यांच्या मताने मात्र 'पेणोवेणा= मुक्काम करीत करीत' असा त्याचा अर्थ आहे. तो त्यांनी याच लेखात केलेला आहे असे नाही तर त्यांनी संपादिलेल्या 'संपूर्ण ऋक्मिणी स्वयंवर' काव्यातील 'तो पेनोवेना टाकीतु आला : मुळमहादेवापासि पातला' (२६०३) या ओवीच्या संदर्भात, शब्दकोशातही 'मुक्काम करीत करीत' असाच नोंदलेला आहे या ओवीचे या काव्यातील 'प्रकरण' नीट लक्षात घेतले म्हणजे हा अर्थ चुकीचा आहे हेच दिसून येते. कारण, २६०२ व २६०३ या ओव्यांवरून भीमक राजा आपल्या परिवारासहित कुंडिनपुराहून मूळमहादेवापर्यंत सरळ, मध्ये मुक्काम किंवा वस्ती न करता तातडीने आला असेच दिसते. या शब्दाचा अर्थ ज्यावरून स्पष्ट होईल अशी लीळाचरित्रातील 'प्रकरणे' तपासून पाहू. तेथे पू. २०४, ४१५ आणि उत्त. २०२ या लीळांत हा शब्द आलेला आहे. पू. २०४ या लीळेत डखले व चांगदेवभट पैठणहून मातापुराला दत्तात्रयप्रभूच्या दर्शनासाठी निघाले तेव्हा चक्रधरांनी त्यांना उपदेश केला की, 'आतां ऐसेंचि नीगा पेणेवेणा जावें : मार्गी उपेणें न करावें : संबंधीयांचिया गावां न वचावें :' इत्यादी. यात 'मार्गी उपेणें न करावें' म्हणजे रस्त्यात मुक्काम करून राहू नका' असा स्पष्ट आदेश दिला आहे. 'उपेणें' म्हणजे मुक्काम, वस्ती, राहावा. 'स्वर्गि करूनि उपेणें' (शिशु. ८५७); 'म्हणौनि काळिंदिया केलें उपेणें' (नरुस्व. ११३; शिवाय ४६७, ७२२) इत्यादीतील 'उपेणें' शब्दाचा अर्थ 'राहावा' असाच सर्व टीपकारांनी दिला आहे. तेव्हा 'उपेणें न करावें' म्हणजे मुक्काम (वस्ती) करू नये, हा अर्थ स्पष्ट होईल. तो लक्षात घेऊन 'पेणोवेणा जावे' म्हणजे दरमजल, पण कोठेही वस्ती न करता जावे, हाही अर्थ स्पष्ट होईल. पूर्वार्ध ४१५ या लीळेत उपाध्ये आणि प्रसनाएक श्रीप्रभूच्या दर्शनासाठी रिद्धपूरला जाण्यास निघाले. त्यांच्या मनात मध्ये लोणार, मेहेकर या गावी थांबून कमळजेचे व सारंगधराचे दर्शन घ्यायचे होते. त्या विचारापासून त्यांना परावृत्त करून चक्रधरांनी त्यांना 'विधि विहिला' की, 'ऐसेंयांचि नीगावें : पेणोवेणां जावें : उपेणें न करावें...' उत्तरार्धातील २०२ (भुतानंदा कोल्हापुरा पाठविणें) या लीळेतही भूतानंदाला त्यांनी 'पेणो-वेणां जावें : उपेणें न करावें' असेच सांगितले. ही सर्व 'प्रकरणे' पाहून 'अर्थु तो प्रकरणवशे' करून, 'पेणोवेणा' म्हणजे मुक्काम न करता, वस्ती करून न राहता, सरळ, तडक, असाच या शब्दाचा अर्थ स्पष्ट होतो. तो लक्षात घेतला म्हणजे 'मूर्तिप्रकाशा'तील 'पेणोवेणा कां बीजें केलें' या चरणाच्या आधारे डॉ. ढोळके यांनी केलेले भाष्य चुकीचे आहे हे दिसून येईल. खास त्या ओवीतही 'म्हाइंयाला तू नेहमी मान देतोस,

पण यावेळी त्याला न विचारताच तू 'एकदम' का बीजे केले?' असाच अर्थ आहे. 'मुक्काम करीत करीत' या अर्थाचा तेथे दुरूनही संबंध नाही.

'पेणोवेणा' (पेणें + विना) = मध्ये वस्ती न करता, हा अर्थ डॉ. डोळके यांना मान्य नसेल आणि 'मुक्काम करीत करीत' या अर्थाचाच ते आग्रह धरीत असतील तर त्यावर उत्तर असे की, हे वर्णन शिरच्छेदानंतर पुन्हा नवीन अवतार धारण करून चक्रधर उज्जयिनीच्या मार्गाने निघून गेले या घटनेला उद्देशून आहे असे म्हणता येईल. वधाच्या लीळेनंतर 'लीळाचरित्रा'त आलेल्या लीळांवरून देखील हेच दिसून येत असल्याचे कुणीच नाकारीत नाही.

'बीजें करणें' म्हणजे मृत्यू स्वीकारणे

'बीजे करणे' म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे, येणे, हा अर्थ आहेच. पण 'मृत्यू स्वीकारणे' हाही त्याचा लाक्षणिक अर्थ आहे, हे मी लीळाचरित्र, श्रीगोविंदप्रभुचरित्र, श्रीकृष्णचरित्र इत्यादी ग्रंथांतील अनेक उदाहरणे देऊन दाखविले आहे. त्याला डॉ. डोळके यांनी काही उत्तर न देता सोयीस्करपणे मौन बाळगले आहे, ते का? 'जी जी : आतां गोसावी बीजें करितात तरि आमतें कवणासि नीरोविलें?' (गोप्रच. ३२२); 'तैसेचि वय संवत्सरीं...गोसावीं बीजें केलें :' (गोप्रच. ३२२); 'काइ भटो : वोखटें जालें होतें : पणियें दीवा पाजळला होता : गोसांवी बीजें करिते तरि काइ करीतों?'(गोप्रच. १६९); 'जी जी : श्रीकृष्णचक्रवर्तीन बीजें केलेयां अनंतरें पांडवीं बाइ केलें?'(श्रीच. ४१); 'सर्वज्ञें म्हणीतलें : नाइ : श्रीकृष्णचक्रवर्तीन बीजें केलेयावरि उधवदेव वृंदावनासि आले :' (श्रीच. ३७); 'श्रीचांगदेवराउळीं गोसावीं कोणी परी बीजें केलें?' (लीचपू. १६); 'तीसरां दीसीं भटीं निचळ ऐसें देखिलें : भटां ऐसें जालें : गोसावीं काइ बीजें केलें :' (लीच. उत्त. ५६१). या सर्व ठिकाणी बीजे करणे=मृत्यू स्वीकारणे हाच अर्थ आहे. 'एथौनि एकांतें नीमीत्य करूनि : मग एथौनि बीजें कीजैल :' (लीचपू. २०३ कोलते प्रत) या वाक्यात चक्रधरांची बीजे करण्याची प्रवृत्ती स्पष्ट झाली आहे. तेथे बीजे करणे = मृत्यू स्वीकारणे हाच अर्थ आहे. या वाक्याचे संपूर्ण प्रकरण लक्षात घेऊन मी तो स्पष्ट केला आहे. त्याचे खंडन न करता, तेथे हा अर्थ नसून केवळ गमन करणे, स्थलांतर करणे हा अर्थ कसा आहे ते न दाखविता, चक्रधरांची बीजे करण्याची प्रवृत्ती मृत्यूस्वीकाराची नसून उत्तरापंथे गमन करण्याची–निघून जाण्याची होती असे नुसते वारंवार म्हणून काय उपयोग?

आपल्या उत्तरात डॉ. डोळके आता म्हणतात की, "लीळाचरित्र गोविंदप्रभुचरित्र, स्मृतिस्थळ इत्यादि चरित्रग्रंथांत 'बीजे करणे' हा शब्दप्रयोग जाणे, गमन करणे या अर्थीच प्रामुख्याने वापरलेला आहे. महानुभावांच्या भाष्य–ग्रंथांतही बीजे करणे म्हणजे जाणे, गमन करणे याच अर्थी मुख्यतः योजलेला आढळतो." 'प्रामुख्याने', 'मुख्यतः' अशा शब्दांचा प्रयोग करून मूळ प्रश्नाला बगल देण्याचा हा प्रयत्न आहे. मी दिलेल्या उदाहरणांत 'मृत्यू स्वीकारणे' हा अर्थ नसून 'जाणे, गमन करणे' हा अर्थ कसा आहे हे त्यांनी दाखवून देणे अधिक उपयुक्त होईल.

मूर्तिप्रकाशातील आणखी काही उल्लेख

'मूर्तिप्रकाशा'तील 'पेणोवेणा'सारख्या एखाद्या शब्दाचा आधार घेऊन चक्रधरांचा मृत्यू झाला नाही, तर त्यांनी 'उत्तरापंथे बीजे केले' हे सिद्ध करण्याचा त्यांचा हा प्रयत्न पाहून गंमत वाटते. त्यांना त्यांच्याच पद्धतीने उत्तर देणे आवश्यक आहे. 'मूर्तिप्रकाशा'तीलच उल्लेख त्यांना पाहिजे आहेत ना? तर त्यांचे पुढील ओव्यांकडे लक्ष वेधतो.

> आजि अवर हारपलें : परब्रह्मीं लया गेलें
> नीऱ्हां नीःह्याळ ओडवलें : लोकत्रया ॥ (२८३३)

चक्रधरांनी बीजे केल्यामुळे 'अवर हारपलें' इतकेच नाही तर ते 'परब्रह्मीं लया गेलें' याचा अर्थ काय? चक्रधराबरोबरच अवर 'परब्रह्मीं लया गेलें' म्हणजे परब्रह्मात विलीन झाले. याचा अर्थ चक्रधर परब्रह्मात विलीन झाले, अर्थात त्यांचा मृत्यू झाला असा होतो. केसोबास एवढेच म्हणून थांबत नाहीत. उत्तरार्धात ते सांगतात की, चक्रधरांनी बीजे केल्यामुळे 'लोकत्रया'वर 'नीःह्याळ ओडवलें' 'नीःह्याळ ओडवणे'

म्हणजे अवर्षण पडणे, जीवनरहित होणे. (मूप्र. ३९; शिशु ३३, ३९; उद्ध. ८६ पाहा.) चक्रधर जर केवळ उत्तरेकडे निघून गेले असतील तर 'लोकत्रया'वर अवर्षण पडण्याचे कारण काय ? तेव्हा याचा अर्थ ते 'लोकत्रया'तून निघून गेले होते, त्रैलोक्यातील त्यांचे लौकिक जीवन संपले होते, म्हणजेच त्यांना मृत्यू आला होता.

त्यापुढील २८३५ व्या ओवीत, चक्रधरांनी बीजे केल्यामुळे 'नीराधार पडीले जीवजात :' म्हणजे केवळ महाराष्ट्रातील नव्हेत तर जन्माला आलेले सर्व जीव, सर्व जीवांचा समूह (जीवजात) निराधार झाला असे म्हटले आहे, ते का ? 'आतां जीवाचें आत्महित कवणें करावें' (२८४१); 'जीउ कासे लावुनि पैलपारू : कवण उत्तरीऌ ?' (२८४४). या अवतरणांतील 'जीव' शब्द सर्व जीवांना अनुलक्षून आहे. त्यांचे आत्महित करणारा आणि त्यांना भवसागराच्या पैलपार उतरविणारा कोणी राहिला नाही, असे केसोबास का म्हणतात ?

धैर्या दीधला देशवटा ।
कां मृत्युलोकु केला हींपुटा ।
महाराष्ट्रीं जाला राज्यलोटा ।
सुखसाम्राज्याचा ।। (२८५१)

ही ओवी पाहावी. चक्रधरांनी बीजे केल्यामुळे 'महाराष्ट्रात सुखसाम्राज्याचे राज्य नाहीसे झाले, (राज्यलोटा = राज्याचा नाश, पाण्याच्या प्रवाहात ज्याप्रमाणे गावे वाहून जाऊन नष्ट होतात त्याप्रमाणे राज्य नष्ट होणे. पाहा : 'झालिया राज्यलोट। चोराकुळित होईल वाट । कोणी नवजावे एकवट । अवघी एकवाट करावी ।। एकनाथी भागवत. अ. ३०-३५८) असे म्हणणे एकवेळ ठीक मानता येईल. पण त्यामुळे (चक्रधरांनी बीजे केल्यामुळे) 'मृत्युलोक' (जेथील सर्व प्राण्यांना केव्हा तरी मृत्यू अवश्यमेव येतोच असा हा पृथ्वीलोक) म्हणजे सगळे जग 'हिंपुटा केला' = दुःखी, कष्टी केला, असे केसोबासांनी का म्हणावे ? चक्रधर जर केवळ स्थलांतर करून उत्तरेकडे गेले असते तर संपूर्ण 'मृत्युलोका'ला दुःखी-कष्टी होण्याचे कारण नव्हते. पण तो दुःखी-कष्टी झाला, याचाच अर्थ चक्रधर मृत्युलोक = जग सोडून गेले होते, त्यांनी मृत्यू स्वीकारला होता.

'वयस्तंबनी सांडुनि कां गेलासि'

याशिवाय 'मूर्तिप्रकाशा'त चक्रधरांच्या मृत्यूचा अधिक स्पष्ट उल्लेख पाहिजे असेल तर पुढील ओवी पाहावी :

तुझां अंगीकरुनि कैवल्यदांनी ।
परिपूर्ण केली वयस्तंबनी ।।
ते एकली सांडुनि नीरांजनी ।
कां गेलासी ? ।। (२८२८)

चक्रधरांनी आपल्या एकाकी भ्रमणात कांती येथे असताना उद्धळीनाथ नावाच्या विद्यावंतापासून वयस्तंबनी विद्या स्वीकारली होती. या विद्येमुळे 'वळीतपळीत नैए : तीएसि सहस्रु वरीखें आउक्ष :' (पूर्वार्ध २५) 'अंगीकरूनि परिपूर्ण केलेल्या' त्या वयस्तंबनी विद्येला चक्रधर 'एकली सांडुनि' गेले, म्हणजे आतापर्यंत त्यांच्या जवळ असलेल्या, त्यांनी स्वीकारलेल्या या वयस्तंबनी विद्येचा त्यांनी त्याग केला व ते 'निरांजनी गेले.' त्यांनी वयस्तंबनी विद्येचा त्याग केला म्हणजे त्या विद्येमुळे प्राप्त होणाऱ्या 'वळीतपळीत' धरण्याच्या (म्हणजेच म्हातारपण येऊ न देण्याच्या) आणि सहस्र वर्षे आयुष्याच्या फळाचा त्याग केला आणि ते 'निरांजनी गेले'. 'निरांजन' हा शब्द येथे 'निरंजन' शब्दासाठी आलेला आहे. निरंजन म्हणजे ज्ञानरूप-प्रकाशरूप असे ईश्वरस्वरूप. चक्रधर 'निरंजनी गेले' म्हणजे निर्मळ, प्रकाशमय अशा ईश्वरस्वरूपात विलीन झाले.

मराठीत निरंजन किंवा निरांजन शब्द ओसाड जागा, अरण्य या अर्थानेही वापरला जातो. हा शब्द संस्कृत 'निर्जन' या शब्दाचे विकसित रूप होय. (सं. निर्जन > म. निरजन. > निरंजन) हा अर्थ प्रस्तुत ओवीत अभिप्रेत नाही. कारण, एक तर प्रतिपक्षाच्या म्हणण्यानुसार सुद्धा चक्रधर निरंजनी = ओसाड जागेत किंवा अरण्यात निघून गेले नव्हते, म्हणजे त्यांनी अरण्यवास पत्करला होता असे नाही. त्यांच्या मते ते उत्तरेकडे गेले होते, इतकेच नाही तर उज्जयिनी येथे

त्यांनी 'अवस्थान' केले. दुसरे असे की, अरण्य-वास पत्करण्यासाठी काय किंवा उत्तरेकडे जाऊन उज्जयिनी येथे अवस्थान करण्यासाठी काय, सहस्र वर्षांचे आयुष्य प्राप्त करून देणाऱ्या वयस्तंबनी विद्येचा त्याग करण्याची आवश्यकता नव्हती. पण ज्या अर्थी 'वयस्तंबनी विद्येला एकटी सोडून, तिचा त्याग करून ते 'निरंजनी गेले' असे ओवीत म्हटले आहे त्या अर्थी निरंजन = ओसाड जागा, अरण्य हा अर्थ तेथे कवीला अभिप्रेत नाही हे निश्चित. वस्तुत: तो त्या मूळ संस्कृत शब्दाचा अर्थही नाही. निर् + अंजन = अंजनरहित, काळिमा नसलेले, निर्मळ, विशुद्ध असे ईश्वरस्वरूप, हाच त्याचा अर्थ आहे. याच अर्थाने शिव, दुर्गा इत्यादी देवतांसाठी-ही तो शब्द वापरला जातो, सर्वश्रेष्ठ असे ईश्वर-स्वरूप हाही त्या संस्कृत शब्दाचा अर्थ आहे. आणि त्या अर्थाने मराठीत तो वापरलाही जातो. 'पाहा पां निरंजनीं निदेला । तो निर्विवाद एकला । परी चेता चेवविता जाला । दोन्ही तोचि' (अमृतानुभव २–६६); 'निरंजनीं आम्ही बांधियेलें घर । निराकारी निरंतर राहिलों आम्ही' (तुकाराम. ४३२६. सरकारी प्रत) 'निरंजनीं समाधी निरंतर तुम्हासी । व्यर्थ कासावीसी होऊं नये ॥' (नामदेव गाथा. सरकारी प्रत. १०८२); या ठिकाणी ईश्वरस्वरूप हाच अर्थ आहे. 'वछाहरणा'तील 'कर्मेंद्रियां लो पवनि । ज्ञानइंद्रिया लो मनि । मनपवना निरंजनी । आत्मस्वरूपीं' (११७) येथेही मुळात तोच अर्थ आहे. हाच शब्द 'लीळाचरित्रा'-तील गीतात 'अखे निरांजनीं लो करो हो : भाव अभाव ना होइ' (उत्त. ४२६) असा लिहिला आहे. 'मूर्तिप्रकाशा'तील उपरोक्त ओवीतही त्याच अर्थाने तो शब्द आलेला आहे. आणि त्यावरून वयस्तंबनी विद्येचा त्याग करून आपल्या विशुद्ध ईश्वरस्वरूपात = मूळ स्वरूपात चक्रधर विलीन झाले. म्हणजे, आजच्या परिभाषेत सांगायचे झाल्यास त्यांनी मृत्यू स्वीकारला असेच या ओवीच्या द्वारे 'मूर्तिप्रकाश'कार केसोबासांनी स्पष्ट म्हटले आहे.

ज्ञानप्रबोध : सह्याद्रिवर्णन

चक्रधरांनी उत्तरा पंथें बीजें केले म्हणजे स्थानांतर करून ते उत्तरेकडे निघून गेले हे दाख-विण्यासाठी डॉ. कोळके यांनी ज्ञानप्रबोध (शके-१३३५); सह्याद्रिवर्णन (शके १२७५) या काव्यां-तील काही ओव्या उद्धृत केल्या आहेत. चक्रधरांनी उत्तरापंथे बीजे केले हे 'लीळाचरित्रा'वरूनच स्पष्ट दिसते. ते कोणी नाकारीत नाही; आणि म्हणून त्यासाठी अन्य ग्रंथांतील या अवतरणांची आवश्यकता नाही. पण हे सर्व उल्लेख चक्रधरांचा वध झाल्यावर ते पुनरुज्जीवित झाले आणि मग त्यांनी उत्तरापंथे बीजे केले या घटनेसंबंधीचे आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. 'मूर्तिप्रकाश' काव्य या दोन्ही काव्यांपूर्वीचे असून त्यात यापूर्वीच्या परि-च्छेदात दाखविल्याप्रमाणे चक्रधरांच्या मृत्यूचे सूचक असे उल्लेख आहेत, तसेच 'भक्ता इश्वरा उभयां हनन : जेथ जालें' असा केवळ मृत्यूचाच नव्हे तर हननाचाही स्पष्ट उल्लेख आहे, याचे येथे पुन्हा स्मरण करून देणे अवश्य आहे. त्यावरील आक्षेपांना यापूर्वीच उत्तर दिलेले आहे.

लक्ष्मींद्रभट आणि भास्करभट्ट बोरीकर

ओघानेच आले म्हणून चक्रधरांच्या मृत्यू-संबंधीचे आणखी काही महत्त्वाचे उल्लेख येथे सादर करतो. नागदेवाचार्यांचे, केसोबासांना सम-कालीन असे एक शिष्य भास्करभट बोरीकर यांनी 'नरविलाप' या नावाचे एक संस्कृत स्तोत्र लिहिले आहे. त्यातील पुढील श्लोक पाहा :

लीलायितैः सुललितैः परचक्रपाणिः
कीर्त्तिः कलौ कुमुदकंदकदंबकांतिः ।
कृत्वेच्छया परमधामनिजं प्रयातः
श्रुत्वेति कोऽपि विललापममुमानपश्यत् ॥५५॥

या श्लोकावरील लक्ष्मीधर सेवलीकर यांची टीका (भावार्थ) पुढीलप्रमाणे : 'तो कलियुगीं अवत-रौनि : सुललिते लीळाचरित्रें करूनी : कुमुदकांति श्रीचक्रपाणी : करूनि कीर्तीतें पै ॥१०९॥ मग स्वेच्छावशें देवराजें : एथौनि केलें बीजें : तयातें ने-दखौनि विलापु कीजे : तो सांघेन आता ॥११०॥' मूळ संस्कृत श्लोकात भास्करभट्टांनी 'परचक्रपाणि (श्रीचक्रधर) 'इच्छया' (स्वेच्छेने, आपल्या प्रवृत्तीने) 'परमधाम निजं प्रयातः' (आपल्या प्रमुख निवासस्थानात = निजधामाला निघून गेले) असे स्पष्ट म्हटले आहे. 'परमधाम निजं' हे शब्द

अनुक्रमणिका

'निजधामा 'साठीच आले आहेत. भास्करभट्टांच्या या स्तोत्रातील पुढील श्लोकावरून हे अधिक स्पष्ट होईल. ते म्हणतात

निजधामगते त्वयीश्वरे
विफला सृष्टिरियं भविष्यति ।
इति देव सदाप्रमादिनो
मम शोचामितरां मुहुर्मुहुः ॥१०७॥

यावरील लक्ष्मीधर सेवलीकर यांची मराठी टीका (भावार्थ) पुढीलप्रमाणे : 'आणिक एक अवधारिजे देवराजें मातें एथ सांडौनि केलें बीजें आतां हेही श्रृष्टि विफळ गेली जाणिजे भरवसेनि पैं ॥ २१३ ॥ जी जी परमात्मया स्नेहवछळा : मज प्रमादिया समळा : ऐसी श्रृष्टि जाती विफळा : म्हणौनि शोकु करी ॥२१४॥' या मूळ संस्कृत श्लोकातही ईश्वर (श्रीचक्रधर) निजधामाला गेल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. 'निजधामाला जाणे' म्हणजे मृत्यू होणे, मरणे, दिवंगत होणे, हे सांगायलाच पाहिजे असे नाही. उद्धवगीतेच्या ५२, ६४ व ६७ या ओव्यांत हा शब्दप्रयोग आलेला आहे; तो पाहावा. त्यातील शेवटची ओवी संदर्भासह येथे उद्धृत करणे इष्ट होईल. त्या ओव्या अशा : श्रीकृष्ण उद्धवाला सांगतात.

ठाकौनि अंतराळीं :
ब्रह्मेनि हेचि विनवणी केली :
जें आयुष्य–सीमा अतिक्रमली :
मर्त्य लोकीची ॥६६॥

तेव्हळी तेयापुढें :
मिया दीन्हली सातां दीसांची गडे :
म्हणौनि निजधामा फुडें
जाइजैल आतां ॥६७॥

यावरून 'निजधामाला जाणे' म्हणजे मर्त्यलोकीच्या आयुष्याचा त्याग करून आपल्या मूळ स्थानी जाणे, म्हणजेच मृत्यू स्वीकारणे, हे स्पष्ट होईल. भास्करभट्टांनी आपल्या 'नरविलाप-स्तोत्रा 'तील उपरोक्त दोन्ही श्लोकांत श्रीचक्रपाणी =श्रीचक्रधर निजधामाला गेले, म्हणजेच त्यांनी मृत्यू स्वीकारला असे स्पष्ट म्हटले आहे. त्याचे भाषांतर करताना लक्ष्मीधर सेवलीकरांनी ईश्वराने 'बीजे केले' हा शब्दप्रयोग वापरला आहे. त्यावरून 'बीजे करणे'= मृत्यू स्वीकारणे, हाही अर्थ स्पष्ट होईल.

याच काव्यातील आणखी एक महत्त्वाचा उल्लेख पुढीलप्रमाणे :

तव नाथ कथीकृतं वपु:
परमाकर्ण्यभवैकभेषजं ।
न मदन्यजनस्य कस्य सं–
स्फुटतीदं हृदयं सचेतस: ॥५९॥

या श्लोकावरील लक्ष्मीधर सेवलीकर यांची टीका (भावार्थ) अशी : 'तुझी मूर्ति आइकौनि सहज : जें भवरोगासि एका भेषज ऐसी आइकौनि देवराजा वांचला असें ॥११७॥ ऐसें आइकौनि नाहीं सुखविशेषु : तो श्रृष्टीआंतु अधमु मीचि एकु हृदय न फुटे ऐसा नाहीं आणिकु मजवांचौनि ॥११८॥' या टीकेत 'कथीकृतं' या महत्त्वाच्या शब्दाचे भाषांतर आले नाही, किंवा टीकाकाराने ते मुद्दामच टाळले आहे. 'कथीकृतं वपु:' या शब्दांचा अर्थ काय ? हा श्लोक वाचला म्हणजे कालिदासाच्या कुमार-संभव काव्यातील रतिविलापातील पुढील श्लोकार्ध आठवतो. 'अवगम्य कथीकृतं वपु: प्रियबन्धोस्तव निष्फलोदय: ।' (कुमार. ४–१३) या चरणांचेच स्पष्ट प्रतिबिंब 'नरविलापा 'तील उपरोक्त श्लोकाच्या पूर्वार्धात पडले आहे. 'रतिविलापा '-तील पूर्वोक्त श्लोकावरील मल्लिनाथाचे भाष्य असे 'प्रिय बन्धो: प्रियसखस्य तव वपु: शरीरं कथीकृतं अकथा कथा संपद्यमानं कृतं शब्दमात्रा-वशिष्टं अवगम्य ज्ञात्वा–' म्हणजे, तुझ्या प्रिय बंधूचे (अनंगाचे) शरीर केवळ शब्दमात्र शिल्लक राहिलेले ऐकून–' हाच अर्थ नरविलापाच्या उप-रोक्त श्लोकात आहे. 'हे नाथ, परं भवैकभेषजं तव वपु: कथीकृतं आकर्ण्य' म्हणजे भवरोगा-वरील एकमेव श्रेष्ठ भेषज = औषध असे 'तव वपु:' तुझे शरीर 'कथीकृतं आकर्ण्य '=केवळ शब्दमात्राविशिष्ट केलेले म्हणजे शब्दात तेवढे शिल्लक राहिलेले–म्हणजेच मृत झालेले ऐकून–असा त्याचा अर्थ आहे. 'कथीकृतं ' या शब्दाचा 'शब्द-मात्रावशिष्ट ' म्हणजे मृत असाच अर्थ आहे. आपटे यांच्या संस्कृत–इंग्रजी शब्दकोशात 'कथीकृतं =Remaining in narration (only).

dead, deceased:' असा अर्थ दिला आहे. ओकांच्या गीर्वाणलघुकोशातही 'कथीकृत=मृत' असाच अर्थ दिला आहे. यावरून चक्रधर मृत झाले होते, इतकेच नाही तर 'कथीकृत' या शब्दावरून इतरांनी त्यांना मृत केले होते–मारले होते असेच स्पष्ट दिसून येते.

भास्करभट्ट बोरीकरांनी चक्रधरांच्या मृत्यूचा उल्लेख 'परमधामनिजं प्रयात:' 'निजधामगते त्वयीश्वरे' 'कथीकृतं वपु:' अशा गौरवपूर्ण वाक्प्रचारांनी केला आहे. पण याहूनही 'वास्तव' उल्लेख पाहिजे असेल तर तोही देतो. श्रीगोविंदप्रभूंचे शिष्य लक्ष्मींद्रभट देउळवाडेकर हे तर भास्करभट्टांनाही वडील होते. त्यांनी लिहिलेल्या 'ज्ञानभास्कर' स्तोत्रात त्यांना झालेल्या चक्रधरांच्या विरहाचे दु:ख अत्यंत आर्ततेने वर्णन केले आहे. त्यातील पुढील श्लोक पाहा :

> नाद्यंतमध्योऽपि सलीलया धृतां
> तत्याज भर्तो निमिषान्निशम्य तत् ।
> दृष्टचात्यसह्यं विरहं न सेहिरे
> ते चक्रपाणि परमेश्वरं ययु: ।। ८६ ।।

भावार्थ : ज्याला आदि, मध्य व अंत नाही अशा निराकार परमेश्वराने आपल्या लीलेने (प्रवृत्तीने, इच्छेने साकार होऊन) धारण केलेल्या मूर्तीचा, क्षणार्धात त्याग केला, ते ऐकताच, दृष्टीने पाहाण्यासही अत्यंत असह्य असा तो विरह जे सहन करू शकले नाहीत ते त्या चक्रपाणी (चक्रधर) परमेश्वराप्रत गेले; किंवा विरह-दु:खाने चक्रधरांच्या चिंतनात त्याच्याशी एकरूप झाले, तल्लीन झाले.

या श्लोकात चक्रपाणी, अर्थात चक्रधर यांनी अवतार घेताना स्वेच्छेने जे शरीर धारण केले होते त्याचा, निमिषार्धात त्याग केला, म्हणजेच 'पुरत्याग केला' असे स्पष्ट म्हटले आहे. त्यामुळे झालेला विरह हा 'दृष्टीने पाहाण्यासही अत्यंत असह्य होता.' हे वर्णन वाचताच 'म्लेंसामध्यें अवतरण' या लीळेतील (लीच. उत्त. ५०४. नेने प्रत) 'भटीं म्हणीतलें : ना जी : हें मज पाहावेना' या वाक्याची आठवण होते. हा विरह सहन करू न शकल्यामुळे जे चक्रधर–परमेश्वराप्रत गेले ते म्हणजे भटोबास किंवा नागदेवाचार्य चक्रधरांच्या मृत्यूची ही बातमी ऐकताच नागदेवाचार्य जवळजवळ मृत झाले होते. पण चक्रधरांच्या कृपेने ते वाचले. 'लक्षणस्थळा'तील 'भटाचे तीन प्रस्तावे चुकले : एक वृद्धातंगमीं : दुसरा वेलोपुरीं : तीसरा आवस्था : ऐसांही उरले ते माहादाइसाचीया कणवा' या पक्षातील 'तीसरा आवस्था' या पक्षात त्याचाच उल्लेख आहे. त्यावर भाष्य करताना लक्षणवंदकारांनी लिहिले आहे की '......एवं गोसावीं प्रवृत्तिवशें ठेविलें.'

'मूर्तिप्रकाश' काव्याप्रमाणेच भास्करभट्ट बोरीकर व लक्ष्मींद्रभट देउळवाडेकर यांच्या स्तोत्रकाव्यातील हे उल्लेख चक्रधरांनी मृत्यू स्वीकारला होता हेच स्पष्ट दाखवितात.

(क्रमश:)

□ □

बीजग्रंथांचा अभ्यास / द. भि. कुळकर्णी

मराठीतील अनेक मान्यवर साहित्यशास्त्रीय ग्रंथ वाचताना एक उणीव निरंतर जाणवत असते. या ग्रंथकारांनी साहित्यशास्त्रीय बीजग्रंथ वाचले आहेत पण त्यांचा सूक्ष्म अभ्यास केलेला नाही; असे जाणवते. असे म्हणतात की काही ग्रंथ चाळायचे असतात, काही वाचायचे असतात, काही पुन:पुन्हा वाचायचे असतात तर काहींचा सूक्ष्म अभ्यास करायचा असतो. बीजग्रंथ हे या अखेरच्या प्रकारचे ग्रंथ होत; पण मराठी अभ्यासकांना याचे भान नाही.

भरतमुनींचे 'नाटयशास्त्र' व ॲरिस्टॉटलचे 'पोएटिक्स' हे जागतिक कीर्तीचे बीजग्रंथ होत. मराठीच्या संदर्भात बोलायचे तर 'सौंदर्य आणि साहित्य', 'भारतीय साहित्यशास्त्र' व 'पोत' हे मराठी ग्रंथही बीजग्रंथच होत. हे ग्रंथ एकदा वाचून किंवा कोश-ग्रंथासारखे गरजेपुरते वाचून त्यांचे यथार्थ आकलन होऊ शकत नाही.

बीजग्रंथांत साहित्यशास्त्रीय प्रमेये व सिद्धांत सूत्ररूपाने सांगितलेले असतात, हे लक्षात घेतले म्हणजे त्यातील विवेचन यांत्रिक आहे, स्थूल आहे, अपुरे आहे, एकांगी आणि आग्रही आहे असे आक्षेप अभ्यासक त्यांवर घेणार नाहीत. अशा ग्रंथांतील प्रमेये व सिद्धांत मूलभूत, मौलिक व विकसनक्षम आहेत किंवा नाहीत हे अभ्यासकाने पाहिले पाहिजे. हे गुण त्या ग्रंथांत असतील तर उत्तरकालीन अभ्यासकांनी त्या त्या प्रमेयाचा/सिद्धांताचा विकास केला पाहिजे व असा परिपूर्ण विकास झाल्यानंतरच त्या त्या प्रमेयावर /सिद्धांतावर आक्षेप घेतला पाहिजे; आणि आक्षेप घ्यावयाचा नसेल तर त्या त्या सिद्धांतांचे / प्रमेयाचे विविध कलाकृतींना उपयोजन करून दाखविले पाहिजे.

ही प्रक्रियाच मराठी साहित्यशास्त्रीय लेखनात अनुपस्थित आहे. या प्रक्रियेच्या अभावी मराठी ग्रंथकार बीजग्रंथांतील मूलभूत प्रमेयांवर / सिद्धांतांवर सुटे आक्षेप घेतात आणि सुटेपणानेच आपल्या परिचयपर ग्रंथांत वेगळे प्रमेय व वेगळे सिद्धांत मांडावयाचा प्रयत्न करतात. यामुळे मराठीतील साहित्यशास्त्रीय विचारांचा विकासच कुंठित झाला आहे. हे टाळावयाचा एक मार्ग म्हणजे विद्यापीठांतील मराठीच्या उच्च अभ्यासक्रमात 'नाटयशास्त्र', 'पोएटिक्स', 'सौंदर्य आणि साहित्य', 'भारतीय साहित्यशास्त्र', 'पोत' इत्यादी ग्रंथ सूक्ष्म अभ्यासासाठी लावणे, हा होय; एम्. ए. मराठीला 'विशेष ग्रंथकार' अशी एक प्रश्नपत्रिका असते त्याप्रमाणे 'विशेष ग्रंथ' अशी एक प्रश्नपत्रिका ठेवणे, हा होय.

'नाटयशास्त्र' व 'पोएटिक्स' यांची मराठी भाषांतरे झाली आहेतच; अशा पत्रिकेमुळे या ग्रंथांची नवी आणि विपुल भाषांतरे कालांतराने उपलब्ध होतील; या ग्रंथांवर जे भाष्यग्रंथ लिहिले गेले आहेत त्यांचाही सूक्ष्म अभ्यास होऊन त्यांचीही मराठी भाषांतरे उपलब्ध होतील व मराठी साहित्यशास्त्रीय ग्रंथदालन बीजग्रंथ आणि भाष्यग्रंथ यांनी अधिक समृद्ध होईल; एवढेच नव्हे तर मराठी अभ्यासकांमध्ये साहित्यशास्त्रीय अभ्यासाची जी शिस्त आज अभावानेच दिसते ती वाढीस लागेल व मराठी साहित्यशास्त्रीय लेखनाचा व मराठी समीक्षेचाही कस वाढेल.

□ □

अनुक्रमणिका

शुद्धलेखनाविषयी आणखी थोडे / दिवाकर मोहनी

युगवाणी मे / जून १९८३ च्या अंकात सत्त्वशीला वि. सामंत यांचे डॉ. द. भि. कुळकर्णी यांना लिहिलेले एक पत्र प्रकाशित झाले आहे.

त्या पत्रात डॉ. द. भि. यांनी मराठीच्या शुद्धलेखनासाठी संस्कृत भाषेचे ज्ञान आवश्यक असू नये असे मत मांडल्याचा उल्लेख आहे.

माझ्या मते मराठीच्या शुद्धलेखनाच्या संदर्भात संस्कृतच्या ज्ञानाची आवश्यकता अनेक कारणांनी आहे. कशी ते पुढे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

देश्य मराठी भाषा ही फक्त बोली राहिलेली आहे. किंबहुना तिच्या अनेक बोल्या राहिल्या आहेत. ती लिखित भाषा झाली ती संस्कृतच्या कुबड्या घेऊनच. केवळ मराठीच नव्हे तर सर्वच भारतीय भाषा संस्कृतच्या आधारानेच उभ्या आहेत. त्या देश्य भाषा (निखळ मराठी केवळ हिंदी वगैरे) लेखनामध्ये फार थोड्या प्रमाणात प्रतिबिंबित झाल्या आहेत.

संस्कृत ही अत्यंत संपन्न भाषा. ज्या काळात ती निर्माण झाली, वाढली, त्या काळात तिला कोणी प्रतिस्पर्धीच नव्हता. प्रमाणीकरणाचा आदर्श तिच्या ठिकाणी वसत आहे. एका वर्णासाठी एकच अक्षर वापरण्याचा तिचा आग्रह, तिची छंदोबद्धता, तिच्यामधील कोशवाङ्मय हे सारे तिचे गुण पाहता तिच्या ठिकाणी शुद्धलेखनविचाराचा पूर्ण परिपोष झाला आहे हे स्पष्ट आहे. शुद्धलेखनाचा हेतू भाषेमध्ये स्थलकालातीत निःसंदिग्धता आणणे हा आहे. त्यासाठी जे जे आवश्यक ते सर्वकाही तिच्या ठिकाणी आहे.

व्याकरण हे विश्लेषणात्मक शास्त्र मानले तर शुद्धलेखन हे त्यांचेच उपयोजित अंग आहे. संस्कृतभाषेने शुद्धलेखनविचार व्याकरणातच समाविष्ट करून घेतला आहे.

शुद्धलेखनाचा विचार करणारी महामंडळातील मंडळी निरनिराळ्या ठिकाणी उच्चारभेद आहेत हे एकीकडे मान्य करतात आणि दुसरीकडे लिखित शब्द हा उच्चारानुसारी असावा असेही मानतात. या विचारात फार मोठी विसंगति आहे. लिखित शब्द हा फार क्वचित् आपण तो जसा उच्चारतो तसा असतो. तो त्याच्या भिन्न-भिन्न उच्चारांचे प्रतिनिधित्व करीत असतो. उदाहरणादाखल एक साधे 'तो' हे तृतीयपुरुषी सर्वनाम घेऊ या. त्याचा उच्चार स्थानपरत्वे 'त्यो' 'थो', 'तो' असा होत असतो. त्यातला 'तो' बाकीच्या दोन उच्चारांचे प्रतिनिधित्व लेखनात करीत असतो असे समजावयाचे असते. दुसऱ्या उच्चारांना हीन किंवा अशिष्ट मानावयाचे नसते.

लिखित शब्द असे निरनिराळ्या उच्चारांचे प्रतिनिधित्व करीत असतात हे ज्या वैयाकरणांना समजले नाही त्यांनी प्रमाणभाषा ही शिष्ट लोकांची समोचितभाषा अशी पळवाट काढली आहे. वास्तविक अशी पळवाट काढण्याचे काही एक कारण नाही. भाषेमध्ये शिष्टाशिष्ट, सभ्यासभ्य असे काही नाही. तटस्थपणे व विकारवश न होता वापरलेली कोणतीही बोली अथवा भाषा समोचित किंवा शिष्ट असते. आणि प्रमाण भाषा ही जास्तीत जास्त मोठ्या प्रदेशात आणि जास्तीत जास्त मोठ्या कालावधीमध्ये सहज समजावी अशी बनलेली व मुद्दाम बनविलेली असते.

पूर्वीच्या काळी संस्कृत ही प्रगल्भ आणि समृद्धभाषा होती. तिच्यापुढे हिंदी मराठी सारख्या भाषा अत्यंत मर्यादित अशा बोली भाषा ! शिवाय संस्कृत ही सर्व विद्वानांना व सुशिक्षितांना येणारी भाषा. अशा परिस्थितीत त्या विद्वानांनी आपापल्या बोलीभाषेत लिहितांना संस्कृत भाषेच्या प्रचंड शब्दसंग्रहाचा अपरिहार्यपणे वापर केला, इतकेच नव्हे तर तिचीच लिपी, तिचेच व्याकरण त्यांनी आपापल्या बोलींच्या प्रमाणीकरणासाठी वापरले. म्हणून संस्कृत भाषेचे आपल्यावरील ऋण मान्यच करावयाला हवे. संस्कृत अजिबात न जाणणाऱ्या लोकांनी आपल्या उत्तरभारतीय भाषांचे व्याकरण घडविले असते तरच मराठीसारख्या भाषा लिहितांना शुद्धलेखनासाठी संस्कृत भाषेच्या ज्ञानाची आवश्यकता राहिली नसती !

आज तत्समशब्दबहुलता असल्याखेरीज प्रगल्भ व प्रौढ मराठी किंवा हिंदी लिहिताच येत नाही असा अनुभव आहे. पारिभाषिक शब्द देण्याची क्षमता फक्त संस्कृतमध्येच आहे. (संस्कृतभाषेच्या व्याकरणाचा फार मोठा भाग शब्दसिद्धीला–म्हणजे पूर्वी वापरात नसलेले शब्द निर्माण करावयाला–वाहिलेला आहे.) म्हणून ज्यांना ह्या पारिभाषिक शब्दांचा वापर करावयाचा आहे, त्यांनी संस्कृत भाषेचे शब्दकोश हाताशी ठेवून आपल्याला अभिप्रेत असलेल्या शब्दांचे प्रमाण रूप कोशात पाहून तेच लिहिणे योग्य होणार नाही काय ?

संस्कृत ही बोलून चालून वेगळी भाषा; पण तिच्या शब्दसंपत्तीशिवाय आपला निर्वाह होत नाही हे सिद्ध झाल्यानंतर त्या शब्दांची घडण न शिकण्याचा अट्टाहास का ? हा मराठीचा अभिमान की शब्दकोश पाहण्याचा आळस ?

परक्या भाषेतले शब्द आपल्या उच्चार-प्रकृतीप्रमाणे लिहिणे हा सर्वथैव चुकीचा विचार आहे. ते तसे लिहिल्याने त्यांच्यातील अर्थसातत्य नष्ट होत असते. प्रमाणीकरणच नाहीसे होते. म्हणून कोणत्याही भाषेतले असोत, तत्समशब्द तत्समसारखेच–मुळासारखेच–लिहावयास पाहिजेत. त्यामध्ये कोठलीही तडजोड चालणार नाही.

तत्समशब्दप्रचुरभाषा हीच प्रमाण भाषा हा एक चुकीचा समज दृढ होऊन बसल्यामुळे संस्कृतभाषा न जाणणाऱ्यांशी जवळीक साधण्यासाठी उच्चारानुसारी लेखनाचा आग्रह काहींकडून धरण्यात येतो. त्यांनी हे लक्षात घ्यावे की स्थानिक बोली भाषेतले अथवा कोठलेही अर्थवाही देश्य शब्द स्वीकारण्यास प्रमाणभाषेची कधीच ना नसते. असण्याचे कारण नाही. नवीन शब्द कोशात आला की तो प्रमाण ! फक्त त्याला तेथे घेताना त्याला होणारा लिंगविकार, त्यांचे होणारे सामान्यरूप, त्यामधले ऱ्हस्वदीर्घत्व वगैरे सर्व ठरवावयाचे विरोध असतो व असावयास पाहिजे तो एकाच शब्दाच्या निरनिराळ्या उच्चारांना लेखनात हुबेहूब दाखविण्याच्या खटाटोपाला, 'माश्या चे 'माशा' 'तो' ला 'थो' 'होय' ला 'व्हय' ऋजुला 'रुग,' 'गुरूला' गुरू, लक्ष्य ला लक्ष, पक्षापुढे ऐवजी पक्षांपुढे किंवा सदसद्विवेकबुद्धीला सदसदविवेक किंवा सद्सद्विवेक करावयाला तसेच मूळच्या ऱ्हस्वान्त शब्दाना दीर्घान्त करावयाला व हलन्त शब्दांना अनन्त (स्वरान्त) करावयाला.

शब्दांचे उच्चार माणसागणिक बदलत असतात तेव्हा प्रमाणभाषेत इतके सारे उच्चार दाखविणे शक्य नसते. त्या सर्व वेगवेगळ्या उच्चारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एका उच्चाराला किंवा शब्दाला प्रमाणित करून घ्यावे लागत असते. असे केल्याशिवाय लिखित भाषेत निःसंदिग्धता येत नाही.

जे जुने व एका ठराविक प्रदेशांतले उच्चार लिखित रूपांत पहिल्याने येऊन गेले त्यांना प्रामाण्य मिळून गेले. असे झाल्यामुळे बाकीच्या प्रदेशांतील उच्चारांवर अन्याय झाला खरा पण आता त्याबाबतींत काहीच करता येण्यासारखे नाही ! आणि पुस्तकात छापण्यासारखी इंग्रजी भाषा इंग्रजी मातृभाषा असणाऱ्यांनाही मुद्दाम शिकावी लागते, तशीच पुस्तकांत छापण्यासारखी मराठी भाषाही मराठी भाषिकांत मुद्दाम शिकावी लागल्यास त्यांनी वाईट वाटून घेऊ नये. तशी ती लिहिता येईपर्यंत आपले लिखाण छापण्यापूर्वी दुसऱ्याकडून दुरुस्त करून घ्यावे.

□ □

अनुक्रमणिका

बाबाराव गं. मुसळे

तिफन

वऱ्हाडी लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. मधुकर वाकोडे ह्यांच्या मते प्रा. विठ्ठल वाघांची कविता वऱ्हाडी लोकसाहित्याचा ब्लॉटींग पेपर आहे. बोलीभाषेत काव्य करणाऱ्यांच्या बाबतीत ही सरमेसळ काही प्रमाणात शक्यही आहे. यातून अगदी बहीणाबाई चौधरीही सुटू शकल्या नाहीत. म्हणून प्रा. विठ्ठल वाघांची कविताही कळत नकळत असला प्रमाद करीत असेल हे नकारता येत नाही. असे असले तरी प्रा. वाघांच्या कवितेची जी चांगली बाजू आहे तिची उपेक्षा होऊ शकत नाही.

ठिकठिकाणच्या कार्यक्रमातूनच प्रा. वाघांची 'तिफन' काव्यरसिकांच्या हृदयात 'हासऱ्या चांगण्यागत' 'बिजवाई' करून गेली. नंतर 'अरे संसार संसार' ह्या चित्रपटात ही 'तिफन' पडद्यावर रसिकांना प्रत्यक्ष भेटली. (मूळ 'तिफन' कविता व या चित्रपटातील गाण्याच्या रूपातील 'तिफन' यांच्यातील रचनेत काही कडव्यात बदल आहे हा भाग वेगळा.) लोकगीताची मूळचीच चाल कायम ठेवून अनुराधा व सुरेश वाडकर ह्या गुणी गायकांनी तिला मूर्त रूप दिले. परिणामी, 'तिफन'ला पारितोषिकही प्राप्त झाले. ज्यांनी तो चित्रपट पहिला नाही त्यांच्यासाठी ही 'तिफन' 'आपली आवड' किंवा इतर कार्यक्रमातून रेडीओतून घरीच भेटायला येते. आणि आता तर 'तिफन'चा समावेश ९ व्या वर्गाच्या मराठीच्या नव्या अभ्यासक्रमात केला गेला आहे.

पाठ्यपुस्तकात कवितेची पार्श्वभूमी वर्णन करतांना "तिफन" या कवितेत शेतकऱ्याच्या पेरणीचे दृश्य व पेरणीतुन फुलणारे उद्याचे 'हिरवे स्वप्न' वर्णिलेले आहे असे म्हटले आहे. नवव्या वर्गाच्या मुलांच्या बौद्धिक पातळीचा विचार करता उपरोक्त परिचय पुरेसा वाटणे साहजिकच आहे. पण प्रत्यक्षात ही कविता येथेच संपत नाही. तिच्यातील 'सदाशिव', 'पारावती' हे शेतकऱ्याचं सामान्य कुटुंब राहात नाही किंवा त्याची पेरणी ही केवळ शेतातील 'बिजवाई' राहात नाही. तिची व्यापकता लक्षात घेतली की पाठ्यपुस्तकातील ही पार्श्वभूमी अतिशय तोकडी, खुजी, थिटी वाट लागते.

'तिफन' मधील विचारात घेण्याजोगी महत्त्वाची प्रतिके धरती, तिफन, सदाशिव, पारावती, नंदीबैल ही आहेत. नव्या विश्वरचनेच्या निर्मितीसाठी शिव–पार्वतीने आरंभिलेला मदनोत्सव या कवितेत स्पष्टपणे दिसून येतो. शिव–पार्वती हीच या प्रतीकांची अधिष्ठाने आहेत हेही जाणवते,

हा मदनोत्सव अतिशय संयमितपणे 'तिफन'-मध्ये वर्णिलेला आहे. यातील तिफन ही बीजारोपणाचे साधे लाकडी साधन उरत नाही. तर तिचे फन लिंगसूचक बनते. आणि काळी माती ही केवळ माती नसून गर्भस्थळ ठरते. दोघांच्यातील हा स्खलनसंघर्ष अतिशय समर्पक शब्दात कवीने वर्णिलेला आहे. तिफन 'वला टाकते' यातूनच ही स्खलनशीलता स्पष्ट होते.

समागमोत्सुक काळी माती कसदार पर्यायाने बीजधारणेस अति उपयुक्त आहे. तिला 'प्रथम वयसाकाल' प्राप्त झाला आहे. ती रजस्वला आहे. पावसाच्या 'सरीवर सरी' पडल्याने ती 'न्हाती धुती' झाली आहे. तिच्या शरीरातून कस्तुरीचा वास' बाहेर पडतो. तो वास साधासुधा नव्हे तर रजोगंध आहे. त्याच्या वासाने केवळ जिवालाच 'भूल' पडत नाही तर अवघ्या सृष्टीलाच भूल पडते. विजा समागमोत्सुक

मोराप्रमाणेच थयथय' नाचतात, तर ढग शंभूच्या तांडवनृत्याच्या वेळी वाजणाऱ्या डमरूचीआठवण करून देणारे ढोल वाजवितात.

तिफनीच्या फनाच्या स्खलनशीलतेतून जी बीजधारणा होते ती सहज सोपी नाही. त्याचवेळी कुठेतरी पायात काटा रुतून तो रक्ताळतो. त्यातून वाहणारं 'लाल रंगत' हे तर पहिल्या-वाहिल्या न्हाळीचं सूचक, त्याच्या वेदना ह्या "लाल रंगत" सांडल्याशिवाय 'हिरवं सपन' फुलणार नाही हा परंपरागत दृढविश्वास हाच नवनिर्मितीला ध्यास पूर्ण करणारा क्षण...हव्या-हव्याशा वेदनेतून फुलणारं हे आनंदपर्यवसायी विश्व-नाट्य.

प्रा. विठ्ठल वाघ या कतितेत दोन बाबींचे स्पष्टीकरण करीत नाहीत. दुसऱ्या कडव्याच्या शेवटी.

'भूल जिवाले पाळते, वाट सांजीले पाहेते.

मैना वाटुली पाहते, राघू तिफन हानते या ओळीत सांजेची वाट पाहणारी मैना कोण? तिफन हाणणारा 'राघू' जर सदाशिव असेल तर पाराबती ही 'मैना असूच शकत नाही. कारण पाराबती ही सदाशिव बरोबरच उनारण्याचं काम करीत आहे. जेव्हा तिफन बंद होईल तेव्हाच तिचं उनारण्याचं काम बंद. मग ती वाट कोणाची, कुठे, कशी पाहा-णार? मग ही मैना कोण? दुसरी बाब आहे तिसऱ्या कडव्यातील. या कडव्यात शेवटी 'काटा पायात रुतते, लाल रगत सांडते' असे ते म्हणतात. पण काटा नेमका कोणाच्या पायात रुततो? कोणाच्या पायातून 'लाल रगत' सांडते? मला वाटते गर्भधारणक्षमता असलेली स्त्री म्हणून पाराबती-च्याच पायात काटा रुतत असेल, सदाशिवच्या नव्हे. कारण त्याच्या पायात काटा रुतणे सयु-क्तिकही नाही आणि समर्थनीयही नाही.

अशा या वेगळ्या अर्थाने नितांत सुंदर कवितेचा वापर पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने नवव्या वर्गाच्या मराठीच्या श्रमिक पुस्तकात केला तो काही घोटाळ्यांसह-कुठेकुठे मुद्रणदोष तर कुठे जाणिवपूर्वक चुका. 'भूल'च्या ऐवजी 'मूल' (हा शब्द दोनदा वापरला, मग मुद्रणदोष कसा म्हणावा?), 'वला टाकती'च्या ऐवजी 'बला टाकती' (हाही शब्द दोनदा. एकदा कवितेत तर दुसऱ्यांदा शब्दार्थ व टीपांमध्ये) 'फुलते' च्या ऐवजी 'फलते' (संदर्भासाठी पहा : त्रिमूर्ती-दिवाळी अंक ८२ पुणे) हे दोष कवितेच्या आशयाला फारसा बाधा आणणारे नसले तरी दुर्लक्षणीय नाहीत. याहीपेक्षा कहर झाला 'शितू' या शब्दाच्या बाबतीत. 'शितू' या शब्दाचा अर्थ 'वखर हाणणाऱ्या व्यक्तीचे नाव' असा शब्दार्थ टीपामध्ये दिला. वास्तविक 'शितू' हे व्यक्तिवाचक नाम नसून 'शित' या अपभ्रषित धातुपासून बनलेले धातु-साधित आहे. 'शितू वखर पाहेते' या विधानात ते कर्त्याच्या ठिकाणी आल्यासारखे वाटते व 'पाहेते' हे पूर्ण क्रियापद वाटते. त्यामुळे असा घोटाळा झाला असावा. पण प्रत्यक्षात 'पाहेते' हे पूर्ण क्रियापद नसून ते 'शितू' सोबत आलेले सहायक क्रियापद आहे. 'शितू पाहेते' हे अशा प्रकारे संयुक्त क्रियापद आहे. काव्यरचनेतील वाक्य-रचनेच्या नियमांच्या लवचिकतेमुळे त्यांची फोड झाली, एकमेकापासून फारकत झाली. 'वखर शितू पाहते' असे गद्यमय विधान केले म्हणजे त्याचा सरळ अर्थ लक्षात येतो. पुढे पुढे 'वला टाकत' जाणाऱ्या तिफनीला मागे पडलेला वखर शितू पाहतो, गाठू पाहतो. पाठ्यपुस्तकानुसार या पुस्तकावर तयार झालेल्या मार्गदर्शिकामध्येही 'शितू वखरावर लक्ष ठेवतो' असे म्हटले आहे. वास्तविक 'शितू' हे निदान वऱ्हाडात तरी एखाद्या व्यक्तीचे नाव असेल असे वाटत नाही. भलेही मग ते पश्चिम महाराष्ट्रात किंवा कोकणात असेलही. ह्या घोटाळ्यामुळे तिफन व वखर यांच्या-तील गतिमानता, वेग या गोष्टीच नाहीशा झाल्या. त्यामुळेच पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने हा घोटाळा करून कवितेच्या आशयावरच कुठाराघात केला असे नाही तर तिचे तीनही फनच जणू काढून घेतले आणि 'तिफन' भोंडी केली.

असो, प्रा. विठ्ठल वाघांची ही वाचकास एकाच वेळी गोचर अगोचर सृष्टीत लीलया नेणारी नितांत सुंदर कविता आहे. विश्वनिर्मितीचे रहस्यच जणू ती उलगडून दाखविते. आणि म्हणू-नच ती प्रत्येकांच्या 'जिवाले भूल' पाडते.

शितणे-जितणे-जिकणे-(गाठणे) असा प्रवास असावा.

□ □

शैलजा देवगावकर

माडियांची लोकगीते

माडिया ही चंद्रपूर जिल्ह्यातील (सध्याचा गडचिरोली) घनदाट अरण्यातील एक अत्यंत मागास आदिम जमात. संस्कृतिकरणाच्या अत्यंत कनिष्ठ स्तरावर असलेली; पण स्वतःचे पुरातनत्व टिकवून असलेली ही जमात. घनदाट अरण्यात दूरवर गिरिकंदरात राहणारे माडिया आजही रानटी अवस्थेत आहेत. पूर्वापार रूढीला, परंपरांना, विचारसरणीला चिकटून असलेले हे लोक निसर्ग-पूजक. वृक्षराजी, वन्यपशु, वनराजीतील पशु-पक्ष्यांचे मधुर–कूजन ह्यातच लहानाचे मोठे होतात. निसर्गाच्या सौम्य, शांत, जीवनदायी स्वरूपा-बरोबरच भीषण, रौद्र आणि विनाशकारी स्वरूपाचे अवलोकन त्यांनी फारच जवळून केलेले असते, म्हणूनच त्या अनाकलनीय स्वरूपाचे ते पूजक बनलेले आहेत.

दिवसभर कष्टाची कामे केल्यानंतर रात्री गावातील एखाद्या विवक्षित ठिकाणी माडिया युवकयुवती घोटुलच्या समोर मोठी लाकडाची होळी पेटवितात आणि ढोलकीच्या (माडिया भाषेत पागई) तालावर बेभान होऊन आनंदाच्या बेहोषीत नाचू लागतात. ढोलकीच्या तालावर म्हटली जाणारी गीते त्यांच्या लोकसाहित्याचा एक अमोल ठेवा आहे. त्यांच्या अभिजात संस्कृतीचे व समृद्ध जीवनाचे ते विलोभनीय दर्शन आहे.

माडियांच्या बोलीला लिपी नाही. ती मौखिक आहे. म्हणजेच पर्यायाने ती मुक्त आहे, म्हणूनच चैतन्यपूर्ण आहे. ज्या परिसरात ते वावरतात, त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या लोक साहित्यात आहे. निसर्गातील विविध गोष्टींचे प्रतिरूपच त्यांच्या काव्यात आढळते. माडिया शीघ्र कवी आहेत. प्रसंगाला अनुरूप काव्यरचना करून 'गीत गाणे' ही त्यांची खास लकब.

त्यांची गीते केवळ गायली जात नाहीत. आत्यंतिक आनंद किंवा दुःख निव्वळ शब्दांच्या साहाय्याने व्यक्त करणे कठीण असते. त्यासाठी हालचाली, हावभाव, डोळे, चेहरा, यांची साथ आवश्यक असते. ह्याच हालचालींना सूत्रबद्धता येऊन माडियांच्या नृत्याचा उगम झाला. त्यांची लोकगीते आणि नृत्य ह्यांचा अन्योन्यसंबंध आहे. आदिवासींची लोकगीते ही लोकनृत्याच्या संदर्भातच अभ्यासावी लागतील. ते एका जागी बसून गात नाहीत. सवंगड्यांच्या सोबतीने ढोलकीच्या ताला-वर, पायांच्या ठेक्यावर त्यांच्या गीतांच्या ओळी ओठातून बाहेर पडतात. शोकाचे, आनंदाचे, उत्सवाचे, उल्हासाचे, मीलनाचे, विरहाचे सारेच उन्मेष त्यांच्या लोकगीतांमधून नृत्याच्या माध्यमाने साकार होतात.

अशा प्रकारच्या लोकगीतांमध्ये श्रोत्यांचा विचार नसतो; कारण सर्वच त्यात सहभागी झालेले असतात. त्यामुळे त्यात परंपरासातत्य आढळते. जुन्या प्रथांचे अवशेषही सापडतात. 'गेयता' हे त्यांच्या गाण्याचे विशेष.

लोकगीत 'गेय असणे' हे एक त्यांचे खास वैशिष्ट्यच होय. त्यांच्या गीतांना विषयांचे बंधन नसते. अनेक लहानसहान एरवी क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टींना लोकगीतात प्राधान्य मिळते.

रात्र झाली. लाकडांची शेकोटी पेटली, ढोलकीचे सूर कानावर यायला लागले की एका-एका झोपडीचे दार उघडून माडिया युवक–युवती जमू लागतात अन् परस्परांच्या गळ्यात व कमरे-

वर हात ठेऊन पायांनी ठेका धरत गाणी म्हणू लागतात. त्यांचे फार आवडते नृत्य म्हणजे 'रेलाँ ऽऽ नृत्य !'

"रेलाँ'...रिरीलो ऽऽ रिरी ऽऽ रिरीलो"

'रेलाँ' हे पालूपद किंवा ताल समजण्यात येतो. गीताच्या सुरवातीला, शेवटी आणि मधला आलाप किंवा सूर म्हणजे रेलाँ ऽऽ. विविध प्रसंगी विजयादशमी, बडादेवपूजन, लग्नप्रसंग व धार्मिक आणि सामाजिक प्रसंगी रेलाँनृत्य असतेच. रेलाँ-लोकगीताचे विषय विविध–प्रसंग विविध असतात. पण शृंगारिक विषयांना प्राधान्य असते. त्यात मुलामुलींची छेडखानी, परस्परांची, थट्टामस्करी, वैवाहिक स्वप्नांवर, वैवाहिक जीवनावर आधारित गीते असतात.

*रेलाँ ऽ रेलाँ रे रे लाँ ऽऽ
सालीमेटा हनूम् दादी
रे रे लो ऽ रे रे लो ऽऽऽ रे

(वर्षभरासाठी नवऱ्याकडे जा बाई आनंदाने)

किनीर विनीर हनूम् दादी,
निवा दायना जोडी दादी.
किनीर विनीर हनूम् दादी
किनीर–विनीर; रे रे लो ऽ रे रे ऽऽ रे रे लो ऽऽऽ रे

(हासत नाचत आहे दादी (नवरा) तुला घेऊन जाईल दादी. हासत नाचत तुला नेईल सुखाने जा.)

लग्नाच्या वेळी नवऱ्या मुलाला मुलीची किंमत देण्याची आठवण गाण्यातून करून देण्यात येते. मेहुणीचे नाते तर थट्टेचेच, मग तिला चिड-वायचे ठरते. एखादा जावई आपल्या मेहुणीला म्हणतो–

एरे वाईरो एरे वाईरो
मर्मीत वाईरो मर्मीत वाईरो
(जवळ या, जवळ या लग्नाला या)
सांगोना दिवाना बारी वायो
एरे वाईरो, एरे वाईरो

* प्रस्तुत लेखातील लोकगीते 'चंद्रपूर जिल्ह्यातील माडिया गोंडांच्या गोंडी बोलीचे भाषिक अध्ययन–सांस्कृतिक अनुबंधासह' ले. डॉ. सौ. शैलजा देवगावकर. ह्या अप्रकाशित प्रबंधातील आहेत.

रिरीलो ऽऽ रिरी ऽऽऽ

(मेहुणीच्या बरोबर खुशी करू. मग कशी मजा येईल. या हो या, लग्नाला या.)

एखादा मेहुणीला दिवाळीला 'येन्दलावा बाई' (नाचायला ये) म्हणून निमंत्रण देतो. थट्टामस्करीला उधाण येते. भावभावना उचंबळून येत असतात अन् मग मुलीकडचे लोक मुलीला सोडून जाण्याचा प्रसंग येतो. अगदी 'गंगायमुना डोळयात उभ्या का? जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा'–अशाच प्रकारच्या भावनांनी ओथंवलेले गीत ऐकले की नकळतच मनाला कुठे-तरी दिलासा मिळतो की इथून तिथून मानवी भावभावना आणि त्यांचा भावनिक स्पर्श हा असाच आरस्पानी आहे.

रीऽ रिलोऽरीरी लो
साले मुंडा रोयता
निवा मुलू रोयता

(सालईचा (खांब) वाकलेला तसे तुझे लोकही वाकलेले).

निकू पोहची दायनू
नीवा जीवा उईता
निवा रेलो मुलूये
रिरीलो ऽऽ री रेलो ऽऽ

(तुला घेऊन जातील तेव्हा तुझा जीव थोडाथोडा होईल. दुःख होईल.)

'मर्मींग रेलाँ पाटा'–(लग्नाची गाणी) हे त्यांच्या जीवनातील विसाव्याचे–आनंदाचे क्षण असतात. त्याचा पुरेपूर आस्वाद ते घेतांना दिसतात. ह्याबरोबरच निरनिराळया सणांची गाणीही आढळतात. दसरा, पिन्डी पण्डुम, विज्जा पंडुम हे त्यांचे महत्त्वाचे सण आहेत. दसरा ह्या सणासाठी अरण्यातून असंख्य माडिया त्यांचे परंपरागत राजे अहेरीचे जमीनदार श्री. विश्वे-श्वरराव महाराज ह्यांच्या दर्शनाला येतात. महाराजांची पालखी निघते. मग ते महाराजांना भेटी देतात त्या सणाच्या वेळचे गाणे–

तिना नामूर, नेई नामूर हो हो ऽऽ
तेदाना उदाना, मावोर बाबाना डेरा

(उठत बसत आमचा जमाव राजाकडे पोहोचला.)

अनुक्रमणिका

मार्चिंग साँग सारखी ही लय आहे. आमचा डेरा मजल दरमजल करीत राजाच्या दर्शनासाठी अहेरी गावी यऊन पोहोचला.

बाबा ले बाबा ले
चिट्टीत पोहोन चिट्टी बाबाले
डागता पोहोन डागी बाबा ले
ले ऽऽ ले ऽऽ हो ऽ हो ऽ

(तू पुन्हापुन्हा पत्र पाठवून आम्हाला बोलावलेस म्हणून आम्ही आलो.)

राजाबद्दलच्या अपार प्रेमाने हे गाणे म्हटले जाते. राजाच्या पावलांचे चुंबन घेऊन राजाला भेटी अर्पण करून मग हे माडिया लोक आप-आपल्या गावी परत जातात.

पंडुम म्हणजे सण. निरनिराळ्या सणांची गाणी त्या त्या प्रसंगी गायीली जातात. नवीन धान्य दळण्याचा सण, बीजांकुराचा सण, नवीन निघालेले फळ खाण्याचा सण इ. सण असतात.

अशा प्रकारच्या परंपरागत गीतांच्या बरोबरच माडियांना आता शिक्षणाचे व विकास-कार्यक्रमांचेदेखील महत्त्व पटू लागले आहे. निवडणूक, सरकारी अधिकारी, मतदान इ. गोष्टींवरही त्यांच्या रचना आढळतात. शाळा, शिक्षण व शिक्षकाच्या बाबतीत मुलांना उपदेश करताना माडिया म्हणतो–

वाईरो कोको वाई
इस्कुलता वाई
अ, आ, इ, ई पठे करयाना
पढे करता पजा बुद्धी वायन्ता

(या रे या, मुलांनो या. शाळेत या. अ, आ, इ, ई शिकता येईल आणि नंतर बुद्धी येईल.)

'शाळेच्या शिक्षणाने हुशार होशील आणि मग तू खूप मोठा होशील. म्हणून शिक्षण घ्यायला हवे.' ही जाणीव आता त्यांच्यात जागृत होत आहे आणि या जाणीव जागरणाचा समावेश त्यांच्या परंपरागत गीत–नृत्यांमधे झाला आहे.

केवळ मौखिक परंपरेने चालत आलेल्या व बोलीरूपात जतन केलेल्या या गीत–नृत्यांद्वारे माडियांची सांस्कृतिक व वाङ्मयात सघनता निदर्शनास येते. त्यांच्या लोक–संस्कृतीचे सरल, भावपूर्ण स्वरूप–दर्शन या लोकगीतांत आढळते. ही त्यांची गीते त्यांच्या बोलीची आभूषणे होत.

■ ■

मनोहर तल्हार

एक शून्य आणि एक दोन तीन !

० : नमस्कार !
१ : नमस्कार ! बसा !
: थँक्यू !
: आमची ही खाजगी संस्था आहे. तेव्हा 'इंटरव्ह्यू' मध्ये आम्ही तिघे जण वाटेल ते विचारू...इव्हन् खाजगी, तुमची तयारी आहे ?
: होय, त्याच तयारीनं आलोय् !
: 'इंटरव्ह्यू'चा अर्थ ?
: इंटर–व्ह्यू ! म्हणजे आतले दृश्य !
: 'इंटरव्ह्यू' म्हणजे मुलाखत ! मुलाखत म्हणजे आतले दृश्य नव्हे !
: मुलाखत म्हणजे मुलास खत...खत म्हणजे पत्र ! म्हणजे मुलास पत्र !
: डोन्ट बी ओव्हर स्मार्ट ! आपलं नाव ?
: चंद्रवदन मधुकर ढोले !
: याच इंग्रजी भाषांतर करा...सरळ आणि सोपे !
: अं. Moonface Honeyhand Whole !
: ढोलेचं भाषांतर चुकलं !
: ढोल म्हणजे व्होल ! ढोले म्हणजे व्होले !
: ते चुकलंच ! ढोले म्हणजे अनेकवचन... व्होल्स् म्हणा हवं तर !
: एस्सर ! चुकलं खरं !
: चाचणी परीक्षेत अशा चुका म्हणजे घोड-चुकाच–
: एस्सर ! हॉर्स मिस्टेकच !
: पण याचं भाषांतर करण्याची काही गरज ? आगाऊ बोलायचं नसतं. अंडरस्टँड ?
: एस्सर ! अंडरपँट !
: आय सेड अॅण्डर स्टॅण्ड !
: नाऊ आय अॅण्डरस्टॅण्ड !
: एनिवे, दुसरं असंच एखादं नाव आहे का तुम्हाला ? न चुकता भाषांतर करता येईल असं ?
: आहे ना !
: सांगा–
: वन् मिनिट प्लीज्–
: झाला एक मिनिट !
: Godpleasure Kindsea DoDieDo !
: म्हणजे ? सरळ सोपे नाही. अर्थ काय ?
: देवआनंद दयासागर करमरकर !
: बनावट वाटतं ! पण तरी चालेल ! बरं पण तुम्हाला ही दोन वेगवेगळी नांवे कशी ?
: पहिले पूर्वीच्या घरचे !
: असं काय मुलीसारखं बोलता ? माणसाचे पहिले आणि दुसरे घर असते का ?
: मी सध्या दत्तक पुत्र आहे !
: छान...म्हणजे इस्टेट भरपूर असेल ?
: होती ! आता फक्त बाप आहे !
: म्हणून नोकरीसाठी आलात...असंच ना ?
: हो !
: शिक्षण किती ?
: कलानिपुण किंवा कलाविशारद किंवा बी. ए.... असंच काही तरी !
: म्हणजे पदवीधरच ना ?
: होय ! धंर्यधर, श्रीधर तसेच हे आपले पदवीधर !
: बी. ए. पूर्वी सर्वजण मॅट्रीक वगैरे होतात असे ऐकतो, खरे काय आहे ?
: आमच्या भाग्यात तो योग नव्हता सर... आम्ही डायरेक्ट पदवी धरली !
: पुढे आणखी काही शिकायची इच्छा आहे काय ?
: आहे ! IASS करिता आम्ही फॉर्म भरलाय् !
: ही कुठली पदवी ?
: माहीत नाही ! कदाचित् चुकून एखादा 'एस्' अधिक पडला असावा !

: आयं ए डबल एस् म्हणजे माहीत आहे, काय होते ते ?
: होय ! मी गाढव-
: खरंच तुम्ही गाढव आहात !
२ : आता मी तुम्हाला प्रश्न विचारतो... विचारू ?
: विचारा !
: तुम्ही टायपिंग वगैरे पास आहात ?
: एस्सर ! आय अॅम टाईपरायटर !
: म्हणजे ?
: टंकलेखक Type Writer ! पण काही लोक चुकून टंकलेखकचं इंग्रजी भाषांतर 'टायपिस्ट' असं करतात ! मूर्ख साले !
: Don't be Absurd !
: Sorry !
: स्पीड किती आहे ?
: पण त्यापेक्षा मी बुलबुलतरंग छान वाजवतो ! दोन्ही ठिकाणी सारखीच बटनं असतात !
: बुलबुलतरंग वाजवून टायपिंग होईल काय ?
: टाईपरायटर वाजविल्यानं संगीताचे सूर उमटतील काय ?
: इंटरव्ह्यू कुणाचा आहे ? तुमचा की माझा ?
: तुमचा ! म्हणजे इंटरव्ह्यू घेणारे तुम्ही म्हणून तुमचा !
: प्रश्न आम्ही विचारायचे, तुम्ही फक्त उत्तरे द्यायची, काय ?
: होय्. चूक झाली माझी-
: वारंवार चुकताय् तुम्ही !
: तशी चूक पुन्हा नाही करणार !
: इटस् ऑल ! गणित कसं आहे तुमचं ?
: चुकीचं ! म्हणजे गणितात बऱ्याच चुका होतात. तरी पण बरोबर उत्तरे देण्याचा प्रयत्न करतो !
: एखादं गणित विचारू ?
: विचारा !
: मला सांगा, एका डोळ्यानं एक चंद्र दिसतो तर दोन डोळ्यानं किती दिसतील ?
: दोन ! एका तोंडाचे दोन तोंडे केलीत तरच-
: व्हेरी गुड ! गडकरी वाचलेला दिसतो तुम्ही !
: कोण गडकरी ?
: 'विटां'चा गड करी तो गडकरी !
: वाचला असावा...पण आता आठवत नाही.
: दहा फूट लाकडाचे दहा सारखे भाग करायचे आहेत. किती ठिकाणी कापाल ?
: दहा ठिकाणी !
: चूक ! नऊ ठिकाणी !
: येस्सर !
: काळ काम वेगाची गणितं येतात का ?
: नाही आमच्या आजोबाच्या वेळी होती ती ! दहामाणसे एक काम एक दिवसात करतात...तेच काम करायला स्त्रियांना दोन दिवस लागतात दोन दिवस का लागतात त्याचे उत्तर नसते.
: उत्तर सोपे आहे, पुरुषापेक्षा स्त्रियांना मजुरी कमी मिळते म्हणून ! पुरुषांना पाच रुपये रोज तर स्त्रियांना अडीच रुपये !
: हे गणित खरे नाही. सरकारी कार्यालयातल्या स्त्रियांना कुठे अर्धा पगार मिळतो ?
: त्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात !
: चुकलो सर ! तेवढे नव्हते माहीत !
: एनिवे, आता काही 'कॉमनसेंस्'चे प्रश्न विचारतो.
: विचारा !
: स्त्रिया डोक्यांत जी फुले माळतात, ती सदैव टवटवीत राहाण्यासाठी काय उपाय कराल ?
: झारीने सदैव पाणी टाकणारा पोरगा ठेवावा!
: चूक ! अंबाडयांत एक छोटीशी कुंडीच 'फिट्' करावी म्हणजे फूल वेलीवरच राहील आणि सदोदीत टवटवीत राहील !
: अगदी बरोबर !
: पावसात फिरतांना चष्म्यावर पाणी गोळा झाले तर काय कराल ?
: 'वायपर' बसवून घ्यावेत !
: करेक्ट ! बापाचे नाव बदलायचे झाले तर ?
: आईचे दुसरे लग्न उरकवून टाकावे !
: चूक ! तिने दुसरे लग्न केले तरी तुमच्याच् बापाचे नांव – तुमच्या पाठीशी – आयमिन् नावाशी राहील ! बरोबर ?
: अगदी बरोबर !

: मग उत्तरं काय ?

: 'गॅझेट' मध्ये 'नोटीफिकेशन' दिले की ते बदलू शकेल !

: बिलकूल बरोबर !

: नोकरीतल्या बढतीसाठी जात बदलायची झाली तर काय कराल ?

: ॲफिडिव्हिट !

: करेक्ट !

६ : आता मी प्रश्न विचारतो.

: विचारा.

: तुमची जात कोणती ?

: आडवी !

: म्हणजे ?

: जी नोकरीत नेहमीच आडवी यते ती ! खरे म्हणजे जात विचारणे कायद्याने गुन्हा आहे, सर !

: सॉरी तुमच्या अर्जावर ते लिहिलं आहे ! विचारणं गुन्हा आहे पण लिहवून घेणं गुन्हा नाही. उलट, आवश्यकच आहे.

: वास्तविक जातीयवाद नष्ट करायचा असेल तर कुठल्याही प्रवेशासाठी जात वगैरे विचारू नये...एकजात सारे गरजू समजावेत...त्यातले आडजात बाजूला करू नये...

: आडजात लाकडाचा प्रकार आहे. माणसांचा नाही. जाऊंद्या. तर तुम्ही 'नोमॅडिक्' आहांत ! भटक्या जातीचे तुम्ही... असंच ना ?

: होय !

: कुठे कुठे भटकता ?

: गावभर !

: गावोगावी नाही ?

: गावोगावी भटकतो पण नोकरीच्या शोधार्थ !

: म्हणजे भटक्या जातीचे तुम्ही असूनही कुठे तरी निश्चित स्थायिक झाला असाल ?

: हो ! गेल्या पन्नास वर्षापासून आमचे आजोबा इथे स्थायिक झाले आहेत ! त्यांची स्वत:ची एक इमारतही आहे. इथून मग ते कुठेकुठे भटकतात पण येतात इथेच ...त्याच इमारतींत !

: तरी तुम्ही स्वत:ला भटकेच समजतां ?

: होय ! आमची जातच भटकी ! खरे म्हणजे दर तीन वर्षाने बदलीसाठी या गावाहून त्या गावाला जाणारे नोकरदारही आमच्याच भटक्या जातीचे ! नाही कां ?

: नाही नोकरीसाठी भटकणे वेगळे आणि पोटासाठी भटकणे वेगळे !

: नोकरी पोटासाठी नसते काय ?

: पोटासाठीच असते ! इथे अर्थार्जनाची शाश्वती असते, तिथे नसते ! भामटा जातीचा माणूस भामटा म्हणजे चोरच असावा असे कुठे आहे ?

तरी पण चोराला आपण भामटा म्हणतो ! असं 'आऊट ऑफ वे' जाऊ नका !

सॉरी सर !

: आता एक सांगा, बाजारातून चांगली वस्तू विकत घेतांना तुम्ही काय बघाल ?

: वैज्ञानिक सूचना !

: म्हणजे ?

याचे सेवन प्रकृतीस अपायकारक आहे ही सूचना ! सिगारेटच्या पाकिटावर किंवा दारूच्या बाटलीवर असते तशी सूचना ! म्हणजे ती वस्तू चांगली आहे, असेच ना ? होय

दारूबंदी धोरणाबाबत तुमचं काय मत आहे ?

: दारूचे धोरण असण्याऐवजी धरण असावे ! म्हणजे असे की धरण बांधून दारूचा तलाव बंदिस्त करावा ! धरण नेहमीच फुटते, तसे ते फुटले की गावागावात दारूच दारू ! किंवा असे करावे, अर्थात्‌च ही एक अव्यवहार्य सूचना आहे. घरी जसे नळाने पाणी येते तसे अगदी मिनिटभर का होईना, नळाने दारू सोडावी. महिन्याच्या शेवटी बिल पाठवावे !

: दारूबंदीबद्दल तुमचं काय मत आहे ?

: तरुणांनी 'दारूबंदी बंद करा' असे नारे लावावेत !

: आता शेवटचा प्रश्न ! आम्ही चाचणी परीक्षा घेणारे तिघे जण आहोत. आम्ही तुम्हाला सहाशे रुपये महिन्याची नोकरी देऊ, तुम्ही आम्हाला काय द्याल ?

आपण जे मागाल ते मिळेल !
म्हणजे ?
तिघा जणांना तीन अंगठ्या ! ती अंगठी बोटात घातली की तुम्ही जे मागाल ते मिळेल ! बोटात अंगठी घातल्यापासून त्याचा 'इफेक्ट' सुरू होईल ! इथून साता समुद्रापलिकडे असलेली आपली प्रिय व्यक्ती आपल्या पायाशी लोळण घेईल !

: तशी अंगठी सध्या आमच्यापैकी प्रत्येकाच्याच बोटात आहे. आम्हाला हवीय् सोन्याची अंगठी ! द्याल ?

: मजजवळ फक्त अंगठा आहे ! फार फार तर दोन अंगठे ! पण तुम्ही तिथे आहात— तुम्ही जाऊ शकता ! नेक्स्ट प्लीज्...

□ □

पाच कविता संग्रह / वसंत वाहोकर

नितळाई

सौ. सुलभा हेर्लेकरांच्या 'स्वप्न-वस्ती' या कवितेतल्या ह्या काही ओळी.

'आता कोणताही किनारा माझा नसतो...
कितीतरी वाळूवरल्या स्वप्नांना
नावे द्यायची राहूनच गेलीत'

अशी व्यथाफुलं अंतःकरणाशी कवटाळून ही कवयित्री किनाऱ्यावर त्रयस्थासारखी उभी असते आणि स्वाभाविकच आपले लक्षही मग त्या किनाऱ्यावरच लागून राहाते.

'नितळाई' हे या संग्रहाचे नावही किती सूचक आहे ? सगळ्या कविता तलम-मुलायम् इथून तिथून नितळ. सगळ्यांचे नाते केवळ मनाशी. अंतःस्थ जाणिवांशी. देह-स्पर्श-श्वास मात्र या कवितांमधून भेटतात खरे, परंतु त्यांचीही नेहमीची परिचित खूण केव्हाच पार झालेली असते. कापूर उडून जावा, पारा घरंगळून जावा, असे हे शब्द भेटतात, भेटून जातात. कविताही हाती सापडतच नाही.

'हे जन्ममृत्यूचे गाणे
अंथरून स्वरपोकळीत
कुणी शब्द वेचतील
दिवाणे, माझ्या गीतात'

स्वप्नवास्तवांच्या झुल्यावर ही कविता झुलते-जीवनाचा शोध घेत फुलत जाणारी कविता आहे ही. अतिशय सौम्य शांत-लय, मृदू आविष्कार, हे तिचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. आणि विभिन्न अनुभवही त्याच पातळीवरून प्रगट होतांना दिसतात.

'त्याच्यातला 'तो' कधीतरी
तेजाळून जातो.
आणि सूरानेच सूर पेटतात...
श्वास श्वासात रुतल्यावर
उरते एकच लय...तीव्र दारुण दुराव्याची
कढ आतल्या आत मिटून घेण्याची.'

'क्षितिजपंख', 'स्वप्नवस्ती', 'भान' 'आसरा' यासारख्या कवितांमधून असे अनुभव भेटतात...'जन्मांतरीच्या कविता' ही आपले लक्ष वेधून वाट रोखून उभ्या होतात-अंतःकरणालाच हात घालून.

'साऱ्या गावातूनच कशी,
हुर्हुरीची नक्षी पेरून गेलास
तनूतील स्पर्शजाणिवांच्या किनाऱ्यांना
तुझ्या श्वासोच्छवासाची झुंबदेही लावलीस,
काय तू सूर्य किरणांच्या बनातून
तर फिरत नाही आलास ?'

सौ. सुलभा हेर्लेकरांच्या कवितांची जात ही अशी आहे. वृंदा लिमये, इंदिरा संत, पद्मा या कवयित्रींनी सुरू केलेली ही वाटचाल....त्यात सुलभा हेर्लेकरही आता समाविष्ट झाल्या आहेत. आणि त्या यशस्वी होतीलही...फक्त असे नितळ अनुभव तेवढ्याच निखळपणे यावेत, ते फॅशनच्या तावडीत झापडू नयेत आणि 'चोंचपाखरे' 'क्षितीजपंखी' 'पंखश्वास' 'पाऊसपाखरं' 'केशरवारा' अशा शब्दांनी भुलून जाऊ नये. कवयित्रीने एवढे सांभाळले तर त्यांच्या कवितांची ताकद पुढे निश्चितपणे जाणवल्याशिवाय राहणार नाही.

'नितळाई' हा त्यांचा दुसरा कवितासंग्रह जेमतेम तीस बत्तीस कवितांचा. पृष्ठसंख्येनेही तसा

क्मीच. मात्र मुद्रण, सजावट, मुखपृठ या अंगांनी देखणा व विलोभनीय झाला आहे.

नितळाई / सुलभा हेर्लेकर
अमेय प्रकाशन, नागपूर
पृष्ठे ४०/ मूल्य रु. १०

भ्रमिष्टाचे शोकगीत / तुळशीराम काजे

१९५५ ते १९८० या काळात मौज, सत्यकथा, छंद, प्रतिष्ठान, तरुण भारत, अनुष्टुभ अशा साहित्यिक व वाङ्मयीन नियतकालिकांमधून कविता लिहून साहित्यिक विश्वात नावारूपास आलेले कवी श्री. तुळशीराम काजे, आणि त्यांचा दुसरा कवितासंग्रह आहे, 'भ्रमिष्टाचे शोकगीत.' विदर्भातील मोजके पाच दहा कवी ज्या काळात कविता लिहून पश्चिम महाराष्ट्रालाही परिचित होते, त्या काळातले श्री. काजेही एक आहेत... अतिशय कमी व मोजक्याच कविता त्यांनी लिहिल्या आणि रसिकांची मान्यताही मिळविली. आशयघनता हे त्यांच्या 'कवितेचे वैशिष्ट्य राहिले आहे. 'कोंभ' या कवितेतून ते लिहितात—

'इथूनतिथून लाल...पळसफुले अंथरलेली
चुकीकडून चुकीकडे वाटचाल,
उद्याचा अनुभव डाळिंबासारखा उलून
चैतन्योद्‌गारासाठी हपापलेला,
असे कसे मला फुटतात कोंभ कर्दळीचे ?'

चिंतन आणि आशयघनता यांनी काजेंची कविता फुलत गेली आहे—समृद्ध होत गेलेली आहे आणि त्यांच्या मर्यादित व मोजक्याच कवितांमधून या खुणा अतिशय स्पष्टपणे जाणवतात. 'कोंभ' 'शब्दांची राख' 'घर' 'एक होती ज्योती' अशा अनेक कवितांमधून काजे समर्थपणे भेटून जातात. थक्क करून सोडतात.

'गळून पडताना कळीचे पाऊल वाजत नसते का ?
पेट घेतांना कापुरास चाहूल लागत नसते का ?
एक झोत...एक फटकारा...झाली माती,
एक होती ज्योती !'

'माडीच्या सराईतप्रमाणे पायऱ्या उतरतांना...आता
विरह नसतो...विरहासारखा अंधार असतो
...लगटून पुढे
रुग्णालयातील एकाकी दिव्याच्या आधाराने,
पावलांना ढकलत असते माझे मढे...'

वाट्याला येणारे प्रारब्ध सारेच स्विकारतात, स्वीकारावेच लागते. नियतीचे हे देणे या कवीनेही स्वीकारले आहे आणि म्हणूनच 'जपून आहे पापणीत...थोडासा आटलेला आसवांचा भार... बाकी सगळेच गेले निळाईपार' असे म्हणण्याची वेळ त्यांचेवर आली आहे. मात्र त्याबद्दलही त्यांची तक्रार आढळत नाही.

आयुष्य आणि विसंगती यांचे एक कायम नाते असते आपल्या वाट्याला—आणि मग त्या एकट—एकारलेपणातून उपरोध जन्मास येत जातो. कधीतर तोच आयुष्याचा स्थायीभाव होण्याचीही शक्यता असते. काजेंचे तसे झाले आहे काय ?

'शोधून जखमा
चोच खुपसणे
झाले ऐसे जीणे
नेहमीचे'

असे लिहायला ते का प्रवृत्त झाले असावे ? पुढे तर ते अगदी बेदरकार होऊन जातात.

'भगवंतावरी
ओकावे गरळ
पाप—पुण्य—मूळ
उखडावे !'

कारण संतापाने जीव काहीलतो आहे आणि संतांच्यासारखे आता बोलवतही नाही: ही एक सल आहे.

'घर' ही या संग्रहातली एक उल्लेखनीय कविता आहे. प्रश्नांतून प्रश्न यावा तसे 'घरातून घर येते' असे कवीचे म्हणणे आहे. याशिवाय या व्यवहारी जगात कसे जगावे याचेही सूत्र या कवीला सापडलेले दिसते. कारण रोज काहीतरी टवाळी करावी, भाडे बुडवून चाळी बदलाव्या; एवढेच ते म्हणत नाहीत तर त्याहीपुढे...

'काळ्यापांढऱ्याचा कोण आहे वाली ?
घरी व्हावे नट, बाहेर मवाली !'

असे सांगण्याएवढी त्यांच्या मनाची तयारी व्हावी, ती का—कशी ?

मुंबईच्या मौज प्रकाशनाने—शासकीय अनुदान योजनेतून हा संग्रह प्रकाशित केला आणि तुळशीराम काजेंना पुन्हा एकदा रसिकासमोर

प्रखरपणे उभे केले–हे महत्वाचे वाटते.

मौज प्रकाशन मुंबई
पृष्ठे ५५ / मूल्य रु. ७–५०

'उन्हातल्या चांदण्यात' / दत्ता हलसगीकर

सोलापूरचे श्री. दत्ता हलसगीकर, नाशिकचे श्री. योगेश्वर अभ्यंकर, पुण्याचे श्री. कल्याण इनामदार आणि यांच्याच वर्तुळातील दिवंगत कवी स्व. सूर्यकांत खांडेकर. या चारपाच नावांचेही एक वैशिष्ट्य आहे. एकतर त्याच त्या परंपरा-वादी साच्यातील काव्यलेखन आणि विपुलता! जिथे छापलं जाईल तिथं छापणं. वर्षोनुवर्षे जिथल्या तिथे तसंच हे सारं सुरू आहे. त्याच चौकडीतील हे एक कवी दत्ता हलसगीकर. 'आषाढघन' हा त्यांचा पहिला कविता संग्रह आणि दुसरा आहे. 'उन्हातल्या चांदण्यात'. निसर्ग–सृष्टी दैव–प्रारब्ध अशा ठरीव साच्यातून हे कवी आपले वेगळेपण इतकी वर्षेही टिकवून आहेत, हे विशेष.

साध्या–सोप्या स्वच्छ सरळ अशा त्यांच्या कविता असतात आणि हा गुणही कधीतरी इतका पराकोटीला जातो की त्यांच्या कवितेतले 'काव्य'च हरवून जाते...उरतो फक्त कोरडा तपशील, उदा. 'सहवासाच्या कविता' इतका उत्कट, काव्यमय विषय कवीला सापडूनही त्याच्या या अतिरेकाने पार रसभंग होऊन गेला.

'निरोप देतांना
दाराच्या चौकटीत उभी राहातेस
ही सुंदर फ्रेम डोळ्यात ठेवून...
दिवसभर मी कार्यमग्न'

थकून घरी आल्यावर, आपलं स्वागत करणारं कुणीतरी आहे–एवढ्या कल्पनेने दिवसभर कामाचे डोंगर उपसतो' असेही हे कवीवर्य सहवासिनीला सांगून टाकतात.

'आत्मा', 'तुझ्यासाठी', 'सकाळ' अशा काही कवितांमधून असेच भरकटलेपण दिसून आले तरी कितीतरी कवितांमधून आलेले अनुभव आणि आशयाची गुंफण, शब्दांची अचूकता यांचा नेमके-दार मेळ जमून गेला आहे आणि स्वाभाविकच अशा कविता मग गुंतवून टाकतात रसिक मनाला,

'शब्दकळा पान्हावली अर्थ झुरूझुरू वाहे
माझे सुखदु:ख आज पान्ह्यातून बोलताहे
कळा ऋतूमती झाल्या छळ झाला असा सुरू
उन्हं चांदणे उरात कसा स्वत:ला आवरू'

'ये म्हटल्यावर', 'माणसे', 'एकांत', 'पारध', 'ऐलपैलकाठ', 'प्रिय' इत्यादि कविता खरोखर सुंदर आहेत–गुंतवून टाकणाऱ्या आहेत. गेय कवितांतील रचनाकौशल्याचे भान राखल्यास आणि 'काव्यात्मकता' अधिकाधिक गहिरेपणी जोपासल्यास, दत्ता हलसगीकर विपुल लिहूनही कसदार लिहू शकतील एवढा विश्वास वाटतो.

भुईकोट प्रकाशन, सोलापूर
मूल्य १० रु.

एका कवीच्या बरगड्यांवर / जीवन आनंदगावकर

'एका कवीच्या बरगड्यांवर' हे काहीसे चमत्कारिक नाव कवितासंग्रहाला देणारे कवी श्री. जीवन बळवंत आनंदगावकर हे मराठ-वाड्यातील नव्या कवींच्या पिढीतले एक लक्षात घ्यावे असे नाव आहे. 'सत्यकथा', 'हंस', 'प्रतिष्ठान' अशा वाङ्मयीन मासिकांमधून कविता लिहून ते मराठी वाचकांना परिचित झाले आहेत. हा त्यांचा पहिलाच कविता संग्रह...

गंभीर प्रकृतीच्या या कवीच्या कविता स्वत:पासून स्वत:पर्यंतच जास्तीत जास्त प्रवास करताना दिसतात. 'तो' हा त्यातला एक प्राति-निधिक नामविशेष झाला आहे. 'पुलावर उभा असताना त्याने छातीतली धडधड कधी ऐकलीच नाही...तेव्हा पुलाखाली हातभर पाणी असेल' असे लिहणारा 'तो'च मधूनमधून 'मी' होतो. या कवीचा रानामळ्यांशी–शेतांशी संबंध आल्याचे जाणवते. माणसांशी व्यवहार सांभाळून रानातला हा कवी म्हणतो,

'जरा जांभुळल्या पोरी
त्यांचा गवसेना तळ
बारा गावचा पाऊस
त्याचा लागेचना मेळ'

वास्तवाचा रखरखीतपणा या संवेदनक्षम मनालाही जाणवला आहे आणि तो त्याने टिपला. अशा-प्रकारे...

कोणतेही वास्तव मला स्वप्नांइतके
प्रखरपणे जाणवत नाही.

'छातीतून कफाऱ्या नद्या जोपर्यंत वहात आहेत तोपर्यंत मी लिहू शकेल, पण जगू शकेन असे वाटत नाही,' असे लिहून जाणाऱ्या या कवीने निदान लिहीत राहावे, असे वाटते.

प्रजित प्रकाशन, सेलू (परभणी)
पृष्ठे ५४ / मूल्य १० रु.

कुरुक्षेत्रावरील वर्तुळे / गौतम सूर्यवंशी

मराठवाड्यातील नव्या कवींपैकी अजून एक नाव आहे गौतम सूर्यवंशी आणि 'कुरुक्षेत्रावरील वर्तुळे' हा त्यांचा पहिलाच कवितासंग्रह. चित्रकार कवी प्रकाश कामतीकर यांची प्रस्तावना या संग्रहाला मिळाली आहे. वैजनाथ दुलंगे या चित्रकाराचे मुखपृष्ठ या संग्रहाचे आकर्षण आहे.

प्रणय–प्रेम–रान–शेत– राजकारण–वास्तव अशा विविध प्रकारांतून सूर्यवंशीची कविता प्रवास करताना दिसते. त्यामुळे तिचा नक्की चेहेरा सापडणे सध्यातरी कठीण वाटते. कवीच एकदा असे म्हणतो,

'अंगांग कविता झाली
तर मला दोष ना द्यावा
शब्दांचा हा खेळ सारा
तू डोळ्यांनी आपुल्या प्यावा'

कवीने जरा जाणीवपूर्वक विचार करून निदान शब्दांचा सारा खेळ तरी टाकावा, आणि अर्थाच्या अधिक जवळ जावे–

'म्हणजे विचारांना फितूरीचे
ग्रहण लागणार नाही
आणि आपले स्वामित्व
अबाधित ठेवता येईल,
पेटलेल्या मशालीसारखे'

रेणूका प्रकाशन, सेलू
पृष्ठे ५९, मूल्य ८ रु.

□ □

॥ परिचय ॥ सुधीर देव

पावसाळा / नितीन तेंडुलकर

नितीन तेंडुलकर हा आता आता परिचित होत असलेला तरुण कवी. ५४ गद्य–कवितांची बरसात 'पावसाळा' संग्रहात आहे. विंदा करंदीकरांनी नोंदवल्याप्रमाणे सध्याच्या वयाशी इमान राखणारी कविता आहे. 'संतान' या कवितेपासून व साधना कुमार अंकात ७० मध्ये प्रसिद्ध झाल्यापासून या 'कवी'चा जन्म असला तरी किंवा तशा किशोर कविता या संग्रहात कशाला ? अवचटांचे कवितेला घेऊन अवतरलेले मुखपृष्ठ लोभस आहे.

असस प्रकाशन, मुंबई
पृष्ठे ५० / रु. १०

कावड / बिरादर बाबू

श्री विद्याने आयोजित केलेल्या कादंबरी स्पर्धेद्वारा नांदेड जिल्ह्यातील काठेवाडी या खेड्यातील एका समर्थ लेखकाचा शोध लागला हे महत्त्वाचे. मृदंगाच्या बोलात हरवलेला गोरख मास्तर वाचकांना वारकरी जीवनाचे दर्शन घडवतो व बराच अंतर्मुख करावयास लावतो. 'देव चालले' या मोकाशींच्या कथेनंतर मराठीत आलेली उत्तम कलाकृती म्हणजे कावड. मुखपृष्ठात अवतरत असलेली चित्रकारांची साहित्यजाण प्रशंसनीय ठरावी.

श्री विद्या प्रकाशन, पुणे /
पृष्ठे ८८ / रु. १५

पोस्टमन / घनश्याम सांगतानी

सुभाष अवचट हा अतिशय कसरक जातीवंत कलाकार, मराठी कलाकृती नेमकी स्पष्ट करणारा आहे हे निर्विवाद. साध्या अन्तर्देशीय पत्राचा व पोस्टमनचा उपयोग करून घनश्याम सांगतानी हे सर्वस्वी अपरिचित नाव व उत्सुकता तसेच अन्तर्गत स्वरूपासंबंधी आपलेपणा निर्माण करू शकण्यास समर्थ ठरले. अतिशय मोकळ्या शब्दात रेखाटलेले पोस्टमनचे जीवन या कादंबरीत कळते. लेखकाचा अनुभव पोस्टमनशी निकटचा असावा.

नितिन प्रकाशन, सेलू (जि. परभणी)
पृष्ठे ११५ / रु. २०

अक्षरित / भारती पांडे

जाणवलेल्या सहसंवेदनेशी प्रामाणिक राहून 'अक्षरित' मध्ये समाविष्ट केलेल्या १२ कथा लेखिकेचे वेगळेपण सिद्ध करतात. भाषाशास्त्र व मराठीमध्ये पारंगत असलेली प्रत्येक व्यक्ती साहित्यिक असते असेही नाही. एखादीच 'भारती पांडे' त्यात असते. लेखिकेचा पहिला कथासंग्रह अतिशय साध्या, सरळ रेषेद्वारे आखलेल्या मुखपृष्ठाद्वारे लक्ष वेधून घेतो. कथेतील 'पोझ' विरहित मांडणी व विविधता रसिकांना मनापासून आवडावी. 'माजी सासू' सारखी ग्रामीण बोली कथा या संग्रहात घालण्याचा अनावर मोह समजू शकतो.

'र' प्रकाशन, पुणे /
पृ. १०७ / रु. १६

ऋतुगंध / सुषमा मुंजे

भीतभीत का होईना संग्रहाच्या शेवटी पावभर लावलेल्या शुद्धिपत्रामुळे एकदमच उत्साह मावळला. ३१ अक्षरदोष सुधारून लेख संग्रह वाचावा लागतो. ह्या दोष मुद्रकाच्या घाईचा असावा. कारण मराठी व इंग्रजीमध्ये एम. ए. व मराठी विभाग प्रमुख असलेल्या लेखिकेस दोष वेळीच काढणे शक्य होते. १८ लेखांतून लेखिकेतील कवयित्रीच जास्त डोकावते. भाषा ओघवती आहे. प्रसंग बहुतेक परिचित आहेत. पहिली कलाकृती म्हणून रसिकांनी स्वीकारावी.

परिचय प्रकाशन, औरंगाबाद /
पृ. १०७ / रु. १७-५०

न्यायदंड / दादा देशकर

'असस' 'र' 'नितिन' 'परिचय' या नवोदित प्रकाशनांच्या पार्श्वभूमीवर राज प्रकाशनचे 'न्यायदंड' सर्वच बाबतीत उणे जाणवते. मांडणी, मुखपृष्ठ लेखन यात सौंदर्याचा अभावच. दादा देशकर अॅडव्होकेट. हे त्यांचे तिसरे पुस्तक. सत्यघटनेचा, सविस्तर तपशील घेऊन साकारलेले, ज्यांना भरपूर वाचायला मिळावे, (जेमिनी सिनेमासारखे) त्यांना ही कादंबरी न आवडण्याचे कारण नाही. कच्चामाल भरपूर जवळ असला तरी उत्तम कलाकृती रूप घेत नाही.

राज प्रकाशन, चंद्रपूर /
पृष्ठे १८३ / रु. १२

गर्भरेशीम / इंदिरा

नुकताच अनंत काणेकर स्मृत्यर्थ इंदिरा यांच्या 'गर्भरेशीम'चा गौरव करण्यात आला. इंदिरा या मान्यवर व प्रतिभासंपन्न कवयित्री. त्यांच्या १०९ निवडक कवितांचा लोभसवाणा गुच्छ बेळगावच्या आशा जवळकरांनी गुंफून, त्यांनी रसिकांना अवीट ठेवा दिला आहे. वासंती मुजुमदारांनी मुखपृष्ठांवर केलेली रंगाची शिंपणच प्रथमतः मोहून घेते. कविता लक्षणीय आहेतच. तीन तपापासून सातत्याने काव्यलेखन करणारी कवयित्री नव्या पिढीचा सूर पकडू शकण्यास समर्थ आहे.

नवसाहित्य प्रकाशन, बेळगाव/
पृ. १३२ / रु. २८

पाणभवरे / आनंद यादव

डॉ. आनंद यादव यांचा वेगवेगळ्या प्रसिद्धी माध्यमाद्वारे वाचकांसमोर आलेल्या १९ कथा-लेखांचा संग्रह. यादवांनी नागरी व ग्रामीण साहित्याची त्या त्या चौकटीतून सुटका केली आहे याचे एक प्रमुख कारण दोन्ही प्रकारच्या वातावरणात यादव मनापासून रमले आहेत, हे होय. भाषेवरील प्रभुत्व या कथा संग्रहात जाणवते. नेमकी शब्दयोजना व विषय फुलवत नेण्याची हातोटी अभिनंदनीय. मौज प्रकाशनची निर्मिती हेही लक्षात घ्यायला हवे.

मौज प्रकाशन गृह, मुंबई /
पृष्ठे १९५ / रु. ३१

खानोलकरांच्या शोधात / जया दडकर

सुप्रसिद्ध छायाचित्रकार जया दडकर यांनी चि. त्र्यं. वर अतोनात प्रेम केल्याचे त्यांनी संकलित केलेल्या ६ लेखांवरून जाणवते. प्रगल्भ बुद्धीमत्ता, साहित्याची सूक्ष्म जाणीव, भाषेचे

अनुक्रमणिका

सौंदर्य या लेखकापाशी आहे; हे एक अद्भुत आहे ! खानोलकरांच्या प्रत्येक साहित्य कृतीचा खोलवर व चिकित्सक अभ्यास त्यांच्या लेखात दिसतो व त्याचबरोबर चिं. त्र्यं. एक संपूर्ण माणूस आपल्यासमोर उभा राहतो. मराठी साहित्यात हा ग्रंथ उत्कृष्ट समजावा. हा ग्रंथ मात्र लेखकास स्वतःच प्रकाशित करावा लागला आहे ! चिं. त्र्यं. रसिकांनी, किंमत जास्त वाटली तरी संग्रही ठेवावा.

जया दडकर/
पृष्ठे २२३ / रु. ५५

चावडी / दया पवार

'बलुतं'कार दया पवार मराठी साहित्यात एक निश्चित दिशा घेऊन आलेले लेखक हे जर मान्य केले तर तोच दृष्टिकोन कायम ठेवून दिनांक, संसद, तात्पर्य यातून केलेले स्तंभलेखन या संग्रहात आहे. एका विशिष्ट विषयावर लेखक त्यामुळे केन्द्रित झालेला नाही. राजकारण, साहित्य, चित्रपट, नाटक यासंबंधी तत्कालिक प्रतिक्रिया व तीही त्यांच्या शैलीत वाचावयास मिळते.

दिनपुष्प प्रकाशन, मुंबई /
पृष्ठे १६८ / रु. २०

■ ■

लेखन सहाय्य हवे . . .

युगवाणीला दर्जेदार लेखनाची फार आवश्यकता आहे. एखादा जबरदस्त आशय तेवढ्याच जबरदस्त अभिव्यक्तीने साकार का होऊ नये ?
आशय–अभिव्यक्तीचे नवे महत्त्वपूर्ण प्रयोग युगवाणीला हवे आहेत.
शिवाय ललितबंध, संशोधन, कला व सांस्कृतिक टिपणे यांनाही युगवाणीत स्थान आहे.
समांतर कथा–कवितांचीही उणीव का भासत आहे ? युगवाणीसाठी लिहावे.

–संपादक
युगवाणी, वि. सा. संघ, नागपूर



॥ स्वातंत्र्याच्या कविता ॥ / शशी मुनेश्वर

(८०–४७ = ३३)
(80–47 = 33)

खुर्च्यांनी खिळवून ठेवलेली
पावलीकम जमात.
हिशेब देता देता माझ्याच
पेकाटात बसत्येय लाथ
–आज पेश करतोय माझ्या
मोडलेल्या हाडांचा हिशेब
तुमच्या ‘ ह्या ’ विधिमंडळात
पर्णहीन झाडांचा हिशेब.
–आदिम अंधश्रद्धेपायी
देवदासी बनविल्या गेलेल्या
वेश्यांचा अहवाल !
–देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या
बलात्काराच्या बोल्डटाईपमध्ये
द्यायच्या बातम्यांचा स्पेशल रिपोर्ट.
–दलितपीडितांवरील वाढते अत्याचार
ही एक छोटेखानी बातमी
बारा पाईंटमध्ये प्रसिद्धीसाठी

–तेलबियांचे पिकच झाले नाही
गेल्या पाच वर्षांपासून
साखरेपेक्षा मुंग्यांची निर्मिती जास्त.
दोस्ता, तुला पान खिलविले असते
पण सारी खतावणी कोरी
माझ्याकडे तेहत्तीस पैसेच फक्त
तू माझ्याजवळ सात पैसे येईपर्यंत थांब
दोन पानं येतील अशी आशा बाळगू या.
मग पान खाऊन
इथल्या रस्त्यावर थुंकता येईल मस्त
तेवढाच आनंद मनविला असता
स्वातंत्र्याचे दुःख कमी करणारा
–म्हणा बे पोट्टे हो,
भारत माता की ऽऽ जय ऽऽ

□ ☐

मोर्चा / लोकनाथ यशवंत

पहिल्या पावसाची शपथ खरं सांगतो,
काल गल्लीतून लहान मुलांचा मोर्चा निघाला
सगळ्यांचा एक ताल एक आवाज
डोळ्यात काळ्या शिरांचा थयथयाट
वृद्ध नेहमीसारखे गप्प

लहान मुलांच्या रडण्याचे स्वप्न
पूर्वी मला दररोज यायचे
संपूर्ण गल्लीत रडण्याचा आवाज
सगळे असह्य आणि स्वप्न तुटून जायचे

या मोर्चाची पूर्वी कुठेही जाहिरात झाली नाही
अथवा त्याविषयी कुणी काहीही बोलले नाही.

हे कधीतरी होणार होते–
गावात काही घडणार होते
सगळे वृद्ध गुडघ्यात मान खुपसून–लाचार स्तब्ध.

लहान मुलांचा मोर्चा रक्तवाहिन्यांसारखा
गावात पसरला
आणि आश्चर्य–
सगळ्यांच्या जिभेला शब्द फुटले.

□ □

कविता / प्रसेनजीत ताकसांडे

निळ्या वेदनेचं एक जंगल
कसंतरी कण्हत कुंथत शहरात पाऊल टाकते
आणि दिव्यांचा प्रकाशझोत पाहिला की
कांजव्यासारखे गर्भगळीत होऊन
कुठल्या मायदेशी जाते
हेच कळत नाही

मी वाऱ्याला विसंगतीवर नेऊन सोडणारा
कडक स्वरातला एक मोर्चा पहिलाय्
आपण ओरडतोय कशाला
याचे भान त्यांना आले असते, तर बरे झाले असते

सूर्याची तब्येत ठीक नाही
अवकळाच आली आहे साऱ्या मायदेशी माणसांवर
माघार घेत चालली आहेत जंगलाची पावलं
येणाऱ्या ऋतूंची पुढे बरसण्याची
शक्यताच उरली नाही.

□ □

कविता / डब्ल्यू. कपूर

ते मला शोधताहेत वैराण वाळवंटात
हातात पलिते घेऊन
अंधार पेटवायचाय् त्यांना
माझ्यातला, माझ्याभोवतालचा

मी मात्र क्षितिजसावलीत
सूर्यास्ताच्या वेदनांनी विव्हळत पडलेला
माहेरपणाला आलेली रात्र
आणि ती सुद्धा खुज्या एस्किमोची
अरबी दुपार लिहीत बसलीय
तिच्या एकुलत्या इग्लूचे मृत्यूपत्र
ही तफावत पटायचीय् मला
पण विझून जाऊ देत
ते पलिते प्रथम
माहेरपणाला आलेली रात्र
विसरून कसे चालेल ?

□ □

वस्तीच्या आसपास / अनंत अमदावादकर

वस्तीच्या आसपास
उमगतील एवढीच झाडे लाव
वनाचा सोस
झेपणार नाही तुला इतक्या निकट

थरकाप उडवतील
श्वापदांची अंगणात उमटलेली पावलं

पाहवणार नाहीत तुला त्यांचे
वासंतिक पुनर्जन्म

त्यांच्या शिशिराच्या थरात
बुडून जातील तुझी पावलं

सोसता येतील तेवढीच जपावीत किरणे
–पेक्षा निवृत्त डोळ्यांनी पाहत असावे सूर्यास्त
हेच श्रेयस्कर.

□ □

अनुक्रमणिका

प्रश्नपर्व / श्रीपाद भालचंद्र जोशी

येथून पुढे आता
प्रश्नपर्व सुरू होते, सखे,
आता
आपआपले आभाळ कसे स्वतंत्र भरून येईल
आपल्या पापण्यांच्या प्रदेशात
आपणच होत जाऊ गुलाम आता आपल्याच
स्वदेशात
तसे पाहिले तर
बेटावर वादळ घोंघावून येते तेव्हाच फक्त
आपण एकाच नजरेने पेटतो
लाटा किनाऱ्यावर
आणि आपण अंतर्गत फुटतो
बाकी तर
पाठीवर फिरणारे परस्परांचे हातही
विकत घेत सुटतो क्षणोक्षणी
असा इथला डोह सखे,
असे इथले डोहपाणी
तळाशी चमकतातच नाही म्हटली तरी
काही चलनी नाणी
स्वदेशीची सखे आता
आपल्या अंतर्गत एक चळवळ
कळत, नकळत उमटतील आता
आपलेच आपल्यावर वळ
सारेच सल सखे आता प्रश्नांकित
आपल्या झाडांच्या वळचणीचे पक्षी भेदरलेले
डोहात सावल्यांनी हादरलेले
या पर्वात
एकमेकांची उत्तरे
पक्षांच्या पापण्याआडून डोहात तरंगतात सखे,
आणि काठावरची पोरे–सोरे
माळरानावरची तृषार्त ढोरे
डोह दैनंदिन ढवळून काढतात
या पर्वात अशीच वाढतात
प्रश्नांची झाडे सखे,
अशा वेळी तंबू ताणू नये
या पर्वात सखे
काहीच आणू नये
येथून पुढे खरे तर सत्र सुरू होते
प्रश्नपक्षी पिंजऱ्यात परदेशी चीजवस्तु जाळण्याचे
आंदोलनही तीव्र होते
आपलेच आपल्यावर भाळण्याचे
प्रश्नपर्वाला इथेच पुन: दिवस जातात
घालून हात आपल्याच हातात
डोहसावल्या पुन: थरारतात
आपल्या बेटांवर तरळतात
काही अनोळखी बाहुल्या
डोहात मिसळतात सावल्या
आणि पाण्याचा आवाज होतो
अशावेळी प्रश्नपक्षी चिवचिवतात
आपण घास भरवतो
येथून पुढे आपण प्रश्नपर्व जगवतो
प्रश्नपक्ष्यांच्या वस्तीला तारे फुटतात
पिंजऱ्यांच्या मस्तीला वारे सुटतात
अशा वेळी वळचणीचे पक्षी उठतात
चोचींनी आभाळ थुंकतात
या पर्वात अशीच पेटत जातात अंतर्गत
हाडे; सखे,
कातडींचा संबंध नसतो
पक्ष्यांच्या पापण्याआडून डोह मिस्किल हसतो
गर्द सावल्यांच्या प्रदेशात अलगद फसतो
उन्मादी प्रश्नपक्षी
वस्तीत पिंजरा मोकाट हलतो प्रश्नपर्वात
येथून पुढे आता.

□ □

काटे / धर्मराज निमसरकर

या शहरातल्या रस्त्यांवरून चालीन म्हणतो !
कारण आतापर्यंत पायाखालून घातलेले रस्ते
रस्ते नव्हतेच मुळी
चिचोळच्या अरुंद पायवाटा होत्या
काट्याकुट्यांनी गच्च भरलेल्या.
किती डेकोरेटिव्ह रस्ता आहे हा, नाही !
असलेल्या आणि नसलेल्याही गोष्टींची,
डोके पोखरून काटणाऱ्या वादांची,
रूढी परंपरांची
साजुक संस्कृतीची आणि
आणखी अशाच जाणिवांची
अफलातून भुलावण करणाऱ्या कितीतरी गोष्टींची
सरसपणे जाहिरात केली आहे !
मनात नसतानासुद्धा थोडा वेळ थांबावे,
लक्ष द्यावे
अशा जालीम आमिषांचे नग्नप्रदर्शन...
पाहीन म्हणतो अंतर्बाह्य त्याने धारण केलेला झगा
त्याचेवरच्या चित्रविचित्र डिझाईन्स,
त्यातली लक्षवेधी उव...

रस्त्यावर उतरतो आणि त्या तोबा गर्दीमध्ये
विसरून जातो, कशाला रस्त्यावर आलो ते...
जबरदस्त मग्रुर धक्क्याने रस्त्यावर
भुईसपाट पडतो तेव्हा
रस्ताच वेड्यासारखा हसतो आणि
काहीतरी उच्चारतो, मला ते ऐकायला येत नाही.
प्रचंड कोलाहलात कुणाला हसतो हा रस्ता ?
धक्का देऊन निघून गेलेल्या अनाहुतावर की,
धक्का खाऊन भुईसपाट पडलेल्या
माझ्या कलेवरावर ?
ओशाळून उभे राहण्यापलिकडे
आपल्या हातात काहीच नसते.
काय म्हणाला असेल रस्ता ?
कशाला कडमडायला येतात शहरात,
शहरामध्ये कसं वावरावं,
साधी रीत सुद्धा माहीत नाही !
असंच काहीसं, की आणखी काही ?
काय सांगावं, गावाकडच्या रस्त्यांवर
कोणकोणते जुलूम सहन केले ते !
येथेही तीच रीत काय ?...

शहरातल्याही रस्त्यावरून चालणं
तेवढंसं सोपं नाही
येथल्याही रस्त्यांनी जोपासले आहेत काटे...

□ □

जुलूस / पुष्पराज चित्ते

वादळी रात्रीचा घनगर्द प्रहर
घनदाट काळोखाने गिळलेले रस्ते, सुनसान
हरेक गल्ली–बोळात दबा धरून घुमसणारे
जहरीले फूत्कार
घरट्या घरट्यात मृत्यूशी झुंजणारे चित्कार.

वादळी रात्रीचा घनगर्द प्रहर
अंधार–वृक्षांचा विचित्र सळसळण्याचा हिल्लोळ
आकाश चिरत जाणाऱ्या असीम विजांचा किल्लोळ
रस्त्या–रस्त्यावर पिशाच्च्यांच्या
मोहरबंद पाऊलखुणा

वादळी रात्रीचा घनगर्द प्रहर
सर्वत्र घोंगावणाऱ्या वादळाचा निर्दय नाद
दूर क्षितिजकाठावरून येणारी
मृत्यूची भयंकपित साद
अविरत कोसळणारे मध्येच लख्कन चमकणारे,
विजांचे तुकडे.

वादळी रात्रीचा घनगर्द प्रहर,
बेचिराख घरांचे अवशेष
जळणारे...उध्वस्त होत जाणारे...
(वादळी रात्रीचा घनगर्द प्रहर)
रक्ताळलेली प्रेते, प्रेतांचे काफिले,
दिशाहीन सैरभैर

वादळी रात्रीचा घनगर्द प्रहर ओसरलेला
विवस्त्र झोपड्यातील अंधारयात्रिकांचा जुलूस
नवी अस्तित्वगीते गात निघालेला

□ □

पहारे / ज्योती लांजेवार

पानगळीच्या मोसमातच
आपण निघालो प्रवासाला
वादळाने खुडलेल्या, उन्हाने करपलेल्या
पानांचा ढीग बुंध्याशी
अंतरंगात कल्लोळ घेऊन
सभोवतालचे रान पेटत होते
पळसाची अंगारफुले
थोडीशी तू ओंजळीत घेतलीस
मी खोचली अंबाड्यात. तेव्हा
तुझ्या माझ्या अंगांगावर
ओघळलेत रक्ताचे ओघ
डोळ्यात दाटलेत
पूर्वजांचे भोग
एवढ्यात...तूच म्हटलेस
सखे, चल, या खाऱ्या, अज्ञानवाटा
मत्सराच्या खोल दऱ्या
आपण पार करून टाकू
तुझ्या-माझ्यातले अंतर मोडून टाकू
प्रतिष्ठेत मिरवणाऱ्या त्यांच्या छिनाल वस्त्यांना
जाळून टाकू

तुझ्या हातातला हात तसाच ठेवून
मी चालत आले...
शब्दांचे पहारे आता प्रस्थापित जगण्याला...

□ □

पराजय / शिराज सा. मुजावर

या दोन वर्षांत
घरावर कावळा ओरडला नाही,
खूप वाट पाहिली.
स्वतःच्या घराकडे परतणारे कावळे मात्र
घरावरून परतत होते.
पण त्यातला एकही थांबला नाही,
ओरडला नाही!
कालच एक अजब घटना घडली
या गावातले सर्वच कावळे
तुझ्या प्रदेशाकडे उडालेत
आणि मी आता
भ्रमिष्ठासारखा निघालोय तुझ्याकडे!

□ □

तीन तुकडे / चंद्रविन्

सूर्यांच्या आंत
स्फोट होतात
चंद्राच्या घरांत
उल्का कोसळतात!

मेघ येतात
झडून जातात...
वृक्ष होतात
पडून जातात...

स्वप्नांची आतीषबाजी
सुंदर! सुंदर! सुंदर!
देश कसा नाचे...
बंदर! बंदर! बंदर!

झगा / दत्ता हलसगीकर

वस्त्रे उतरून सारीच दाराबाहेर
आमच्या स्वाभिमानाची
आम्ही आमची शरीरे
तुमच्या झग्यात झाकून टाकली.
हे मळखाऊ झगे तुम्हीच दिलेत आम्हाला
तुमच्या लाथांची धूळ आणि मस्तीची थुंकी
दिसू नये म्हणून.

झगे देताना कापल्यात कॉलरी
आणि काढलेत मणक्याचे मणी

असे आयुष्य ज्याने दिले
त्याच्यासाठी एखादा झगा नाही काय?

अनुक्रमणिका

अर्भक / राजीव जोशी

दोस्तो, सापांच्या भेंडोळ्यात नवजात अर्भकाला सोडून निघून जाणं.
आपल्याला शोभणारं नाही.
अर्भकाला वेढणारे सर्प पुंगी वाजवल्याने पांगतील हा निव्वळ भ्रम
पुंगी वाजवल्याने नाग डोलतेल तरी त्यांचे दंश चुकवता का येणार आहेत ?

पिलांवळींशी झोंबी घेता घेता
कळत-नकळत वाढलेल्या पिलांनी वारूळं कधी तयार केलीत हे समजलंच नाही.
-दूध पाजल्याबद्दल धन्यवाद कुणाकुणाला द्यावेत.

पिलं आता मोठी झालीत आणि
त्यांना वारूळात वस्ती करायलाही आवडत नाही.
...तसं एकदम घाबरून जायचं कारण नाहीये
त्यांचा वावर : माझ्या अवतीभोवतीच आणि त्यांचे पहिले दंशही माझ्याच शरीरावर.

तुम्ही सर्वांनी वारूळ, अर्भक आणि पिलावळीला कडं केलंय हे ठीक
दोन गोष्टी तुम्हालाही ठाऊक नसाव्यात :
एक-पुंगीने नाग कधीच डोलत नसतात आणि दोन :
अर्भकाला विष पचवण्याची सवय
जन्मजात.

□ □

अंकक्रमासंबंधी

नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागाचे प्रमुख डॉ. वि. वा. प्रभुदेसाई यांनी फेब्रुवारी-मार्च ८३ वर्ष ३९ : अंक ३५-३६ आणि नंतर मे-जून ८३ : अंक ३-४ हे कसे अशी विचारणा केली आहे.

नवा संपादनकाळ सुरू झाल्यानंतर जानेवारी-फेब्रुवारी, मार्च-एप्रिल, मे-जून, जुलै-ऑगस्ट या क्रमाने अंकमांडणी करावी, असा विचार आला. पूर्वी केव्हातरी डिसेंबर-जानेवारी असा दोन वर्षांना सांधणारा अंक सुरू झाला होता. वर्ष सलग करण्याचे ठरल्यानंतर डिसेंबर-जानेवारी या अंकाचा नव्या वर्षात समावेश न करता फेब्रुवारी-मार्चचा अंक १-२ आहे असे समजून नंतर निघालेला मे-जून चा अंक ३-४ करावा आणि पुढे जुलै-ऑगस्ट (५-६), सप्टेंबर-ऑक्टोबर (७-८) असा क्रम लावीत सातत्य राखावे, असा विचार आला. या नव्या क्रमरचनेत 'एप्रिलचा' खंड पडत असल्याचे डॉ. प्रभुदेसाई यांनी निदर्शनास आणून दिले आहे. या क्रमरचनेत 'एप्रिल' वगळण्याचा उद्देश नसून पुढील अंकरचना व्यवस्थित करणे हाच आहे हे सर्व अभ्यासकांनी आणि वाचकांनी ध्यानात घ्यावे.

संपादक
युगवाणी

मो. दा. देशमुख

बालवाङ्मयाचे भविष्य उज्ज्वल

मुद्रणकला या देशात प्रवेशण्यापूर्वी मराठीत बालसाहित्याची निर्मिती होतच नव्हती असे मुळीच नाही. उलट या बालसाहित्याची विविध प्रकारे निर्मिती होत होती. संस्कृतातून प्राकृतात आलेल्या कथा, कहाण्या, पुराणातील कथा, लोककथा, लोकनाटचे, लोककाव्य, वीरांच्या शौर्यकथा, संतचरित कथा यांचा प्रसार व प्रचार 'आजोबा-आजी' या संस्थेद्वारे होत होता. कथन पद्धती हे या प्रसार, प्रचाराचे साधन होते. आणि हा लोकवाङ्मयाचा ठेवा अत्यंत निष्ठेने जपल्या जात होता. बालकांचे मनोरंजन, उद्बोधन व त्यांच्यावर मंगल संस्कार करीत हा वसा एक पिढी दुसऱ्या पिढीच्या स्वाधीन करीत होती. विदर्भ हीच ज्यांची प्रामुख्याने कर्मभूमी होती त्या श्रीचक्रधरस्वामींनी एक छोटचा मुलीला साळूची गोष्ट सांगितल्याचा पहिला बालकथासंदर्भदर्शक उल्लेख लीळाचरित्रात आढळतो.

छापण्याची कला अस्तित्वात आली आणि विविध प्रकारचे साहित्य ग्रंथरूपाने उपलब्ध होऊ लागले. १८०६ साली राजे सरफोजी यांनी सखनपंडितांच्याकडून इंग्रजी इसापनीतीचे मराठीत 'बालबोध मुक्तावली' हे भाषांतर करवून घेऊन ग्रंथरूपाजे प्रकाशित केले होते. हा बालवाङ्मयातील पहिला मुद्रित ग्रंथ होय. १८१५ साली वैजनाथ शास्त्री यांनी पंचतत्र व हितोपदेश या दोन ग्रंथाचे मूळ बंगालीवरून मराठीत भाषांतर केले. मराठीत बालवाङ्मयाच्या मुद्रित ग्रंथांचा प्रारंभ इंग्रजी व बंगाली ह्या भाषांच्या अनुवादातून आणि त्यावेळच्या मद्रास व बंगाल प्रांतात झाला. मराठी भाषेतील बालवाङ्मयाचे पहिलेवहिले ग्रंथ महाराष्ट्राबाहेर व परभाषांच्या अनुवादातून जन्माला आले, ही बाब मनाला बोचणारी असली तरी ते एक ऐतिहासिक सत्य आहे.

त्यानंतरच्या बालवाङ्मयाचे सर्वश्री छत्रे, दामले, ओक व आपटे असे महत्त्वाचे टप्पे आपणाला आढळून येतात.

श्री. कै. सदाशिव काशीनाथ उर्फ बापू छत्रे यांची बालवाङ्मयाच्या संदर्भातील कामगिरी मौलिक आहे. त्यांनी इसापनीती व बर्किनसच्या 'द चिल्ड्रन्स फ्रेन्ड' वरून 'बाळमित्र' अनुवादिले. हे दोन्ही ग्रंथ बालकांच्यासाठी असलेत तरी ते तीनशे ते चारशेच्या दरम्यान पृष्ठसंख्या असलेले ग्रंथराजच होते. त्यानंतर १८३० ला वेताळ पंचवीशी श्री. ताराचंद दत्त या बंगाली लेखकाच्या कथांचा 'बोधकथा' हा अनुवाद केला. ग्रंथ निर्मिती बालकांच्यासाठी आहे या गोष्टीचे भान मात्र पुरेपूर बाळगले. रंजकता व सोपेपणा याकडे श्री. बापू छत्रे यांनी काटेकोरपणे लक्ष पुरविले.

दुसरा कालखंड

बालवाङ्मय निर्मितीचा दुसरा कालखंड श्री. हरि कृष्ण दामले आणि श्री. विनायक कोंडदेव ओक यांचा. श्री ओक हे १८६१ ते १८९५ पर्यंत असिस्टंट एज्युकेशनल इन्स्पेक्टर होते. या कालावधीत

* विदर्भ साहित्य संघाने ४ सप्टेंबर ८३ रोजी नागपूर येथे आयोजिलेल्या पहिल्या बाल-साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. मो. दा. देशमुख (बरोडा) यांच्या अध्यक्षीय भाषणाचा अंश.

त्यांनी क्रमिक पुस्तकांच्याशिवाय काही उत्तम बाल पुस्तकेही लिहिलीत. 'हिंदुस्थानातील योध्यांच्या थोरवीच्या गोष्टी', 'शिरस्तेदार', 'मुलास थोडासा बोध', 'मुलांचे कल्याण', इत्यादि पन्नास पुस्तकांची भर बालवाङ्मयात घातली. म्हणून बालवाङ्मय विकसनात श्री. विनायक कोंडदेव ओक हे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. त्यांनी १८८१ ला काढलेल्या 'बालबोध' या मासिकाचाही आवर्जून उल्लेख करावा लागतो.

श्री. विनायक कोंडदेव ओक यांचे प्रमाणेच श्री. हरि कृष्ण दामले यांनीही विपुलप्रमाणात बालसाहित्य निर्मिती केली. मात्र त्यांची ही निर्मिती बहुतांश इंग्रजीवरूनच अनुवादित अशी होती. एवढे खरे की त्यांनी अनुवादासाठी निवडलेली इंग्रजी पुस्तके अत्यंत चोखंदळपणे निवडलेली होती. ही निवड करतांना मुलांचे उद्बोधन व्हावे, त्यांची करमणूक व्हावी, त्यांना वचनाची गोडी लागावी, आवड निर्माण व्हावी यावर त्यांनी विशेष भर दिला होता. ही निर्मिती करताना मुलांच्या मानसशास्त्राचा त्यांनी अभ्यास केला होता. त्यांच्या आकलनक्षमतेचा वकूबही ध्यानात घेतला होता. त्यांची भाषा बाळबोध व चटकन बालकांना आपलेसे करून घेण्याइतपत आकर्षक होती. बालवाङ्मय लेखनाची भाषा काही वेगळी असते याची जाण त्यांनी त्यांच्यानंतर बालवाङ्मय निर्माण करणाऱ्या लेखकांना आपल्या लिखाणाने करून दिली. बालवाङ्मयातील अनुवादित साहित्याची शाखा त्यांनी समृद्ध केली.

१९०६ साली वासुदेव गोविंद आपटे यांनी 'आनंद' मासिकाला जन्माला घालून बालजगतात आनंदी आनंद पसरविला. आतापर्यंत निर्माण झालेल्या बालसाहित्यापेक्षा 'आनंद'चे स्वरूप अगदीच आगळे वेगळे होते. उद्बोधनाच्या गांभिर्याकडून ते बालमनोरंजनाच्या खेळकरपणाकडे वळलेले होते. कोडी, चुटके, गंमती जमती, आनंदाची फुलबाग हे कवितांचे सदर, कथा, कहाण्या, परिकथा, साहसकथा यामुळे बालकाचे मन प्रसन्न होत असे. 'आनंद'चे आणखी एक अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मुलांचे लेखनही त्यातून प्रसिद्ध होत असे. मुलांचे लेखन प्रकाशित करणारे 'आनंद' हे मराठीतील पहिले बालमासिक होय. यातूनच श्री. गोपीनाथ तळवलकरांच्या सारखे संपादक 'आनंद' ला लाभले आहेत. आजही पाऊणशेवर वयमान झालेल्या 'आनंद'ने आपले बाळपण जपलेले आहे. बालवाङ्मयाच्या इतिहासात श्री. वासुदेव गोविंद आपटे यांचे 'आनंद' मासिक म्हणजे बालवाङ्मयाला वेगळे वळण देणारा महत्त्वाचा टप्पा होय.

श्री. कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे पण आता श्री. रा. पा. रानडे यांचे 'शालापत्रक' श्री. सहस्रबुद्धे यांचे 'बालोद्यान'; श्री. का. रा. पालवणकरांचे 'खेळगडी', श्री. पंडित अ. कुळकर्णी यांचे 'किशोर', श्री. भा. रा. भागवतांचे 'बालमित्र', श्रीमती दुर्गाबाई भागवतांचे 'जंमत-गंमत,' श्री. वि. का. शिरवाडकरांचे 'कुमार' श्री. अमरद्र गाडगीळांचे 'गोकुळ', श्री. पारूजी नारायण मिसाळ यांचे 'बालसन्मित्र' हे पाक्षिक यांनी आपआपल्या परीने मुलांचे मनोरंजन केले आहे. यातील काही मासिके व उल्लेख न केलेली मासिके बंदही पडलेली आहेत. विदर्भ वगळून बालसाहित्याची ही वाटचाल पाहता बालवाङ्मयाची बालप्रियता कळून येते. आणि मनात प्रश्न उद्भवतो-बालवाङ्मयाचे प्रयोजन तरी कोणते ?

बालवाङमयाचे प्रयोजन :

बालवाङमयाचे प्रयोजन काय ? या प्रश्नाची उकल करीत असताना मनात दुसरा प्रश्न उद्भवतो की बालवाङ्मय म्हणजे काय ? एखाद्या कथेचा, काव्याचा किंवा नाटकाचा नायक बालक किंवा बालिका असेल तर अशा कथेला, काव्याला अथवा नाटकाला केवळ नायकाच्या बालकत्वावरून बालवाङमयात गणायचे काय ? असे बालकांना केंद्रस्थानी कल्पून त्याच्या भोवती सारे कथानक फिरते ठेवले तर ती कथा, कविता अथवा नाटक बालकांच्या कुतुहलाचा विषय होईल काय ?

'युकेवारिसू' नावाचा एक जपानी चित्रपट खूप वर्षापूर्वी पहिला होता. बालकाला त्यात मध्यवर्ती भूमिका होती. वरवर पाहता ती त्या बालकाची कथा असली तरी मूलतः ती प्रौढांची कथा होती. तिचे आकर्षण बालमनाला वाटणे शक्यच नव्हते. उलट 'बालशिवाजी' या चित्रपटाचे आकर्षण बालकांना प्रचंड प्रमाणात असलेले आढळून आले.

बालकांचे जग न्यारे असते. त्यांनी स्वतःभोवती उभविलेली कल्पनासृष्टीही आगळीवेगळी असते. त्या सृष्टीत त्यांना खेचून नेणारे, त्यांचे कुतुहल जागविणारे, रंजन करणारे असे वाङमय असेल तर त्याला बालवाङमय म्हणता येईल. मग अशा कथांचा नायकराजा शंभर वर्षांचा आणि राक्षसराज हजार वर्षांचा वृद्ध असला तरी त्यामुळे त्यांचे आकर्षण कमी होत नाही. मुलांना त्यात सारस्य वाटले पाहिजे, मुले क्षणभर स्वतःला, भोवतालच्या जगाला विसरून त्यात रंगून गेली पाहिजेत तरच ते सरस बालवाङमय होईल. मग ते एखाद्या किशोरवयीन लेखकाने लिहिलेले असो अथवा प्रथितयश प्रौढ लेखकाने लिहिलेले असो.

बालवाङमय ही एक सर्जनशील निर्मिती आहे याचा विसर पडू देऊन जर लेखनाच्या निव्वळ चौकटीच निर्माण होणार असतील तर ते एक संकटच मानावे लागेल. बालवाङमयाचे प्रयोजन जाणून घेऊनच जाणीवपूर्वक त्याची निर्मिती झाली पाहिजे. उद्‌बोधन, प्रबोधन, सुसंस्कार, सदुपदेश या साऱ्यांची बालकाची सुयोग्य जडण-घडण होण्याला नितांत आवश्यकता असली, तरी हे एवढे असले की झाले बालवाङमय. मग ते जाड टाईपात तेवढे छापायचे. थोरांची चरित्रे, महापुरुषांच्या कर्तृत्वाचे वर्णन, त्यागाचा महिमा, शौर्याच्या गाथा हे सारे कोंबून जर निर्जिव सांगाडेच तयार केलेले असतील तर मुले त्याकडे आकर्षित होत नाहीत. आणि संस्काराचे उद्दिष्टही त्यातून साध्य होत नाही. ज्या सृष्टीचे दर्शन या बालवाङमयातून मुलांना घडविण्यात येणार आहे, त्या सृष्टीचे स्वरूप कसे असते या गोष्टीला अधिक महत्त्व आहे. केवळ एखादा लेखक प्रथितयश आहे म्हणून तो बालकांच्यासाठीं उत्तम लिहू शकेलच असे नाही. 'ग्रीम', 'हॅन्स अण्डरसन' यांच्या तोलामोलाचे लेखकच ते करू शकतील. प्रौढपणातही जे बालवृत्तीने या बालसृष्टीत प्रवेशू शकतात; त्यांनाच हे शक्य होते.

बालवाङमयातील एखादे कथेचे पुस्तक असेल, गीतांचे पुस्तक असेल तर सर्वच वयोगटातील मुलांना त्याचे सारखेच आकर्षण राहू शकत नाही. तीन वर्षाच्या मुलाला जे तालगीत, बडबडगीत त्यातील तालाच्या गतिमानतेमुळे; नादरम्यतेमुळे आकर्षित करेल, ते सहा ते दहाच्या दरम्यानच्या किशोरांना कधीच करू शकणार नाही. किशोरवस्थेतून कुमारावस्थेकडे झुकणाऱ्या मुलाला अद्‌भूतापेक्षा वास्तवातील पराक्रम, साहस अधिक आकर्षित करेल. अर्थात ही वयोगटाची विभागणी अगदी काटेकोरपणे मात्र मुळीच करता येत नाही. बालवाङमय लेखकाला बालवाचकांच्या सहजप्रवृत्ती लक्षात घेऊन आपली निर्मिती करावी लागते.

बालवाङमयाचे माझ्या मते महत्त्वपूर्ण प्रयोजन म्हणजे निर्भेळ मनोरंजनातून त्यांच्या उपजत क्रीडाप्रवृत्तीला वाव करून देऊन आनंदाची प्राप्ती करून देणे. साहित्यादि कलाविषयीची निकोप अभिरुची घडविणे होय. उत्तम व्यक्तिमत्त्वाचा आणि निकोप मनोवृत्तीचा संवेदनशील, सुसंस्कारित माणूस घडविणे हे होय. असे वाङ्मय मुलांच्या हाती देता आले नाही तर या वयात वाचनासाठी वखवखलेली मुले प्रौढांच्या पुस्तकाकडे वळल्याशिवाय राहणार नाहीत. जशी आजची किशोरकुमार पिढी क्रौर्य, खून, बीभत्स नृत्य, अश्लील दृश्ये, हाणामाऱ्या यांनी बरबटलेल्या चित्रपटांच्याकडे वळलेली आहेत. तुम्ही-आम्ही वेळीच दखल घेतली नाही तर या विषवल्लीचा विशाल वृक्ष झाल्याशिवाय राहणार नाही.

बालवाङमयाचे पूर्वोक्त प्रयोजन ध्यानात घेऊन विपुल प्रमाणात बालवाङमय निर्माण

करण्याची कधी नव्हे अशी नितांत गरज आज भासत आहे. शिक्षण सार्वत्रिक झालेले आहे. वाचक वर्ग वाढला आहे वाढत राहणार आहे. ग्रामीण भागातून शेकड्याने वाचकवर्ग तयार होतो आहे. अशा वेळी उत्तम बालवाङ्मयाची विपुल निर्मिती आवश्यक झालेली आहे. पण केवळ उत्तम बालवाङ्मय लेखन करून भागणार नाही. त्याचा सर्वदूर प्रसार झाला पाहिजे. त्याची उपलब्धी स्वस्त आणि सहज झाली पाहिजे व बालवाङ्मयाची चळवळ उभी राहिली पाहिजे.

कथा–बालकादंबरिका हा बालकांचा सर्वाधिक बालकप्रिय वाङ्मयप्रकार आहे. मग त्या कथा पौराणिक, ऐतिहासिक, लोककथा, अद्‌भूतकथा, रहस्यकथा, भूतकथा, साहसकथा, प्राणिकथा, चित्रकथा–कोणत्याही असोत; ह्या साऱ्याच निरनिराळ्या वयोगटाला आकर्षित करून घेतात. किशोर वयात मुले आपल्या भोवती एक सत्यसृष्टीपेक्षा अगदी भिन्न असे काल्पनिक जग निर्माण करीत असतात त्यांच्या या जगात दोराच्या साहाय्याने स्वर्ग गाठता येतो. समुद्र दुभंग होऊन वाट करून देतो. आंगठ्या एवढी परी असते आणि ढगांना कवेत घेणारा राक्षसही असतो. आणि ते हे सारे विश्वासार्ह मानतात, सत्य समजतात. नव्हे ते त्यांच्या जगतातील पूर्ण सत्यच असते. या मखमली जगाला धक्का न लावता भ्रमर परागु नेती या पद्धतीनं; या हळूवारपणानं जर अलगदपणे लेखक त्यांना तिथे घेऊन जात असेल तर तो बालप्रिय ठरतो. या वयात त्यांना उपदेशांनी भरलेली आणि बोधामृत पाजणारी रूक्ष पुस्तके नकोशी वाटतात. म्हणून त्यांच्या प्रवृत्तींचे नीट आकलन करून बालवाङ्मय लेखक त्यांना नवीन काही देत असेल तर मुले त्याचा निश्चित आत्मियतेने स्वीकार करतील. अजूनही आपल्याकडे बालांना आवडेल अशी विज्ञानकथा फारशी नाही. वयोगटाचे भान बाळगून जर चांगली विज्ञानकथा लिहिली गेली तर मुले तिचा स्वीकार करतील. कारण अशा कथांना अद्‌भुताशी जवळीक साधता येते.

शिशु–गीते

बालवाङ्मयात शिशुगीतांची रचना ही एक अवघड कसरत आहे. केवळ बोल बोबडे करून शिशूगीत होत नाही. 'अडगुलं–मडगुलं' मध्ये कोणते शब्द बोबडे आहेत? 'ये रे ये रे पावसा' या कवितेत कोणते शब्द बोबडे आहेत ? तेव्हा बोबडेपणा हे काही शिशुगीताचे वैशिष्ट्य नव्हे. उलट ते माझ्या मते व्यंगच आहे. शिशुगीतात शब्दाला, शब्दांच्या अर्थाला नेहमीच दुय्यम अथवा नगण्य स्थान असते. महत्त्व असते तालाला, तालातून निर्माण होणाऱ्या गतिमान, कर्णमधुर नादाला. हा तालाचा तोल ज्या कवीला साधता आला तोच शिशूंना जिंकू शकतो.

आज बालवाङ्मयात शिशुंच्यासाठी, किशोरांच्यासाठी भरमसाठ काव्यलेखन केलेले आढळून येते. पण त्या शेकडो कवितातून फारच थोड्या कविता 'चांगल्या' या दर्जाला भूषविणाऱ्या आहेत. गेल्या पिढीत श्री. मायदेव, श्री. भ. श्री. पंडित, श्री. ना. के. बेहरे यांची कामगिरी काही दृष्टीने महत्त्वाची आहे. श्री. वि. दा. करंदीकरांच्यासारखे फार थोडे आज खऱ्या अर्थाची बाल-कविता लिहितात. विदर्भातील प्रकाशकांनी श्री. सुरेश भटांच्यासारख्या समर्थ कवीकडून ती लिहून घ्यावी. एक मोठी उणीव दूर होईल.

चांगली बालकविता वाचताना, गुणगुणताना, गाताना मुलाला प्रसन्न चित्त वाटायला हवे. आनंद वाटायला हवा. खेळण्यांशी ज्या तन्मयतेने मुले खेळतात. त्या तन्मयतेने त्यांना कवितेशी खेळता आले पाहिजे. परंतु कवितेला असे रूप प्राप्त करून देणे सहज साध्य गोष्ट नाही. मुलांनी या वयात वास्तवाचा स्वीकार केलेलाच नसतो. एका तरल स्वप्नासमान कल्पना सृष्टीत ते वावरत असतात. तिथे त्यांच्या नकळत त्यांना घेऊन जाण्याचे सामर्थ्य कवीमध्ये पाहिजे. कारण अद्‌भूतता, नवलाई हे सारेच त्यांना हवे असते. त्याच्या निर्मितीतील अतिशयोक्ती त्यांना भावते. चमत्कारिक कल्पना, अद्‌भूत प्रतिमा त्यांना आकर्षित करून घेतात. पण मुळातच कवीजवळ संपन्न असे कल्पनासामर्थ्य हवे. तेच नसेल तर कविता फसते. एवढे खरे की, मुले मात्र फसत नाहीत.

अनुक्रमणिका

अशा काव्याचा ते स्वीकारच करीत नाहीत. कवितेचा विदुषकी थाट किंवा तिच्यातील विक्षिप्तपणासाठी आलेला विक्षिप्तपणा म्हणजे कल्पनाविलास नव्हे याचे भान त्यांना असते.

आजही मराठी बालवाङ्मयात शिशुंच्यासाठी बडबड गीते, किशोरांच्यासाठी आनंदगीते उपलब्ध आहेत. त्याप्रमाणात किशोरावस्थेतून कुमारावस्थेत जाणाऱ्या मुलांच्यासाठी भावगीते, साहसगीते, मात्र उपलब्ध नाहीत. मुला–मुलींचे हे वय अतिशय श्रद्धाळू व भावूक असे असते. या त्यांच्या भावविश्वाचे पोषण होणे, त्या भावुक वृत्तीचे योग्य तऱ्हेने संवर्धन होणे जरूर असते. तसे झाले नाही तर हे कोवळ्या वयातील नाजूक भावविश्व विकृत होण्याचा अधिक संभव असतो. यात फार मोठा धोका त्यांना आहे.

बालनाट्य

बाल वाङ्मयाची बालप्रिय व महत्त्वाची शाखा ही बालनाट्याची आहे. हे एक दृक्‌श्राव्य माध्यम आहे. वाचनाबरोबरच अभिव्यक्तीचा, निर्मितीचा आनंद यातून प्राप्त होत असतो. कधी ही अभिव्यक्ती प्रत्यक्ष रंगमंचावर वावरून ते प्रकट करतात तर कधी प्रेक्षकात बसून पात्राच्या ठिकाणी स्वत:ला कल्पून तो करीत असतात. म्हणून बालनाट्याची शाखा ही महत्त्वपूर्ण अशी शाखा आहे.

बालनाट्य हा बालप्रिय वाङ्मय प्रकार असला तरी त्याला मराठीत पूर्वारूढ अशी परंपरा नाही. ज्याप्रमाणे मराठी बाल–कथा–कवितांना लोककथा, लोकगीते यांची समृद्ध परंपरा लाभली आहे. यांचे अस्तित्व मुद्रण कलेपूर्वीही होते. तशी अवस्था बालनाट्याची नाही. उत्तरप्रदेशात कृष्णलीला, रामलीला या लोकनाट्याद्वारे बालरंगभूमी अस्तित्वात होती. तशी परंपरा महाराष्ट्रात नव्हती. अगदी मराठी नाटक वैभव काळात नांदत असतानाही बालरंगभूमी व बालनाट्ये निर्माण झालेली नव्हती. तेव्हाही बालकांना नाटक पाहण्याची अनावर ओढ ही निर्माण झालेली असणारच. ती त्यांनी वैयक्तिक पातळीवर नकला वगैरे करून व समूह पातळीवर काल्पनिक नाट्य सादर करून भागविली असणार. मुलामुलींची भातुकली, किंवा बाहुला–बाहुलीचे लग्न हे दुसरे काय आहे ? ही मुलांची बालनाट्येच होत. अर्थात यात नट, प्रेक्षक वगैरे एकच समूह असायचा स्वतंत्र प्रेक्षक नसायचा. पुढे शालेय रंगभूमीने ही तहान भागविली. कै प्र. के. अत्रे यांचे गुरुदक्षिणा व वीरवचन ही माझ्या लहानपणी शालेय रंगभूमीवर हमखास रंगणारी नाटके होती. पण त्यातील पौराणिक, बोजड विषयामुळे त्या नाटकांशी मुलांना मनापासून समरस होता येत नसे. आनंद घेता येत नसे हेही मी अनुभवले आहे. ना. घो. ताम्हणकर, श्री. शुक्ल यांची नाटके बालजीवनावर आधारित असत. त्याचा शालेय जीवनाशी संबंध असे. पण त्याकाळी सर्वच लेखकांचा एक हट्ट असे. मुलांच्यासाठी जे जे काही लिहायचं ते मनोरंजक असो–नसो बोधामृताने थबथबलेले असलेच पाहिजे.

आपण लिहीत आहोत ते बालकांच्यासाठी लिहित आहोत याचे भान बाळगून श्री. पु. ल. देशपांडे, श्री. विजय तेंडुलकर, सौ. सुधा करमरकर, श्री. रत्नाकर मतकरी, सौ. सई परांजपे यांनी नाट्यलेखन केले. मराठी बालनाट्य हाही मूळ ललित वाङ्मय प्रकार आहे याचे त्यांनी पूर्णत: भान बाळगले.

आज मराठीत अद्‌भूतरम्य नाटकापासून विज्ञान नाटकापर्यंतची बालनाट्ये लिहिली जात आहेत, सादर केली जात आहे. बालनाट्यावर बोधामृत किंवा ज्ञानात भर या गोष्टीचे ओझे लादल्या जायला नको. बालनाटकांनी बालकांना मुक्त क्रीडेचा आनंद प्राप्त करून दिला पाहिजे. दुसऱ्याच्या सुखदु:खाशी चटकन् समरस होणे हा जो बालमनाचा निकोप प्रकृतिधर्म आहे त्याची कलात्मक प्रतीती बालनाटकांनी बालप्रेक्षकांना आणून दिली पाहिजे. केवळ एखादे कथानक घेऊन, पात्रे निर्माण करून, त्यांच्याकडून बोधवचने वदवून घेऊन, संवादामागे संवाद रचून उत्तम बालनाट्याची निर्मिती होत नाही. शिवाय लेखकाने बालनाट्य लिहिताना वयोगटाचाही विचार करायला हवा.

वैदर्भीय बालसाहित्याची वाटचाल

वैदर्भीय बालसाहित्याची वाटचाल पाहताना आदरणीय वा. रा. नोडक यांच्या १९२७ साली जन्माला आलेल्या 'मुलांचे मासिक' या मासिकाने महत्त्वपूर्ण व आवर्जून उल्लेख करावा अशी कामगिरी बजावलेली आहे. हे मासिक जन्माला येताना 'विद्यार्थ्यांचे ज्ञानवर्धक मासिक' या स्वरूपात जन्माला आले असले तरी हळूहळू त्याचे स्वरूप बदलत गेलेले आहे. इतको दीर्घकाळ सेवा करणारे विदर्भातील हे एकमेव मासिक आहे. या मासिकाने आजचे कितीतरी नामवंत लेखक घडविलेले आहेत. मुलांचे लिखाण प्रसिद्ध करून त्यांना प्रोत्साहित केलेले आहे. आणि विशेष म्हणजे ही गोष्ट ते सातत्याने करीत आहेत. या त्यांच्या सेवेबद्दल विदर्भ सदैवच त्यांचा ऋणी राहणार आहे. मी त्यांचा व्यक्तिशः ऋणी आहे. माझे कुमार वयातील कितीतरी लिखाण यातून प्रकाशित झाले आहे.

मुलांच्या मासिकाशिवाय श्री. भावे यांचे 'सुमन', श्री. राम कोलारकर, दिनकर देशपांडे, भाऊ मांडवकर व मो. दा. देशमुख यांनी माढलेले 'जय कुमार' ही मासिके अल्पजिवी ठरलीत. आज तरुण भारत, लोकसत्ता, नागपूर पत्रिका मुलांच्यासाठी साप्ताहिक सदर चालवितात. 'गंमत-जंमत' मासिक दिवाळीत मुलांचा आनंद वृद्धिगत करते. यांचाही आवर्जून उल्लेख केलाच पाहिजे.

बालकथा कादंबऱ्यात श्री. वामनराव चोरघडे, श्री. शरदचंद्र टोंगो यांनी अत्यंत मौलिक भर घातली आहे. श्री. वामनराव चोरघडे यांची 'प्रभावती' आणि 'चंपाराणी' ही लोककथांची पुस्तके अतिशय बालप्रिय आहेत. 'असे मित्र अशी मैत्री' किंवा 'घामाचा रुपया' ही पुस्तके मुले आवडीने वाचतील. श्री. टोंगो यांची 'झेलम' व 'कुमार' ही दोन बाल कादंबऱ्यांची पुस्तके कुमार जगतात प्रिय किंवा कुमारप्रिय आहेत. श्री. दिनकर 'देशपांडे यांनी बालकथा वाङ्मयात विपुल भर टाकलेली आहे. बालजीवनातील आकलन सुलभ विषय निवडून अत्यंत खेळकरपणाने किंवा खोडकरपणाने ते आपली कथा साकार करतात. त्यांच्या कथेला विनोदाची पुटं चढविलेली असतात. त्यामुळे बालवाचक त्यांच्यावर खुष आहेत. याशिवाय श्रीमती गीता साने; श्री. गो. नी. दांडेकर, कै. वि. वा. जोशी, भा. श्री. परांजपे, श्री. आकाशानंद, श्री. प्रभाकर पुराणिक, श्री. वामन पात्रीकर, श्री. अंबादास देवळे, श्री, शंकर कऱ्हाडे, श्री. वसंत वऱ्हाडपांडे, श्री. बाबा मोहोड, श्री. वसंत निगवेकर, श्री. गोविंद गोडबोले, श्री. तु. ना. काटकर, श्री. प्र. ग. सहस्त्रबुद्धे, श्री. ल. वा. पडोळे, सौ. सुगंधा शेंडे, सौ. मालती निमखेडकर, सौ. पुष्पा काणे; सौ. शुभांगी भडभडे, सौ. प्रमिला कुळकर्णी, श्रीमती मायादेवी भालचंद्र, सौ. सुनिती आफळे; सौ. शैलजा काळे या आणि इतरही लेखक-लेखिकांनी या वाङमयात मौलिकभर घातलेली आहे.

काव्याच्या प्रांतात अत्यंत उल्लेखनीय व विपुल प्रमाणात भर श्री. भ. श्री. पंडित, श्री. ना. के. बेहरे, श्री. आनंदराव टेकाडे यांनी घातलेली आहे. श्री. वि. द. सरंजामे, श्री. दा. के. ओक, श्री. वा. भा. दामले, सौ. कमलाबाई शिदोरे, श्री. वा. ना. निगम, श्री. पद्माकर निमदेव, श्री. जयवंत काकडे, श्रीमती उषा लिमये, कुमारी विनिता करपे यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. पण श्री. कै. शरद मुठे यांच्या बालकविता सर्वच दृष्टीने सरस आहेत. त्यात मुलांच्या क्रीडा प्रवृत्तीला भरपूर बाब आहे. गेयतेमुळे, नादमाधुर्यामुळे त्या कमालीच्या बालप्रिय आहेत. श्री. गुलाबराव महाराजांची काही बालगीते उपलब्ध आहेत. सर्वच वाङमय क्षेत्राप्रमाणे याही क्षेत्रात त्यांचे ऋण आहेच.

विदर्भाच्या बालनाटच वाङ्मयात श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर, श्री. मधुकर आष्टीकर, श्री. जोशी (जळगांव जामोद) श्री. दिनकर देशपांडे, श्री. रंजन दारव्हेकर, श्री. प्रभाकर पुराणिक, श्री. प्रभाकर शिरास, श्री. आसाराम वर्मा, श्री. नाना ढाकूलकर, सौ. पुष्पा काणे, श्री. मधुकर बान्ते, इत्यादि नाटयलेखकांचा कृतज्ञतेने उल्लेख करावा लागेल. त्यातही अगदी सातत्याने बालनाटके

लिहिणारे श्री. दिनकर देशपांडे यांचा अग्रक्रम लागतो. सौ. सुधा करमरकर यांनी दिग्दर्शित केलेले "हं–हं आणि हं–हं–हं !" हे त्यांचे नाटक विदर्भातच नव्हे तर महाराष्ट्रात बालप्रिय झालेले आहे. संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्टया सर्वाधिक लिखाण करणारा हा एकमेव बालनाटय लेखक आहे. दुसरे सकस नाटयलेखन करणारे लेखक श्री. प्रभाकर पुराणिक हे होय.

प्रकाशन क्षेत्रात विदर्भात अग्रक्रम लागतो श्री. धुमाळ याच्या नागपूर प्रकाशनाचा. त्यांनी अतिशय देखणी पुस्तके बाल वाचकांच्या हाती दिलेली आहेत; देत आहेत. त्यानंतर श्री. गजाभाऊ देशमुख यांचे प्रभा प्रकाशन, श्री. राजाभाऊ कुळकर्णी यांचे साहित्य प्रसार केन्द्र, श्री. ना. स. देशपांडे यांचे विद्या विकास, चंद्रकांत कस्तुरे यांचे श्री. चंद्रकांत प्रकाशन, श्री. ल. वा. पडोळे यांचे पूजा प्रकाशन, सौ. शैलजा काळे यांचे ज्ञानेश प्रकाशन, श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समितीद्वारा अनुवादित पुस्तकांचे (व स्वतंत्रही) भारत भारती प्रकाशन यांनी मौलिक कामगिरी बजावलेली आहे. 'भारत–भारती 'ने अल्पावधीत भरपूर बालवाङ्मय निर्माण केले.

विदर्भाने बालवाचकांना काय दिले हे पाहताना श्री. वामनराव चोरघडे यांनी भाषासौष्ठव व वेगळी वर्णनशैली दिली. लोककथांच्या शैलीमुळे त्यांच्या कथा कमालीच्या आकर्षक झालेल्या आहेत. बालकांना त्यांनी सृष्टीसंबंधीची आपुलकीची देणगी दिली आहे. श्री. शरदचंद्र टोंगो यांनी काव्यमय अशी अतिशय चटकदार स्थलवर्णने दिली आहे. कै. भ. श्री. पंडितांनी तालबद्ध अशी शिशुगीते दिलेली आहेत. श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी बालमनाचा अभ्यास करून त्यांच्या जीवनातील विषय हुडकून आणि नाटकात बालकविता घालून बालसंगीत रंगभूमीच निर्माण केली आहे. श्री. दिनकर देशपांडे यांनी वास्तव व कल्पितांची सुंदर सरमिसळ करून विनोदी नाटके दिली आहेत. श्री भाऊ मांडवकरांनी ग्रामीण विषयांची देण दिली आहे. श्री. गो. नी. दांडेकर, श्री. शंकर कऱ्हाडे, सौ. सुनीती आफळे, श्री. भाऊ मांडवगणे यांनी सुरेख चरित्र पुस्तिका लिहिलेल्या आहेत. श्री. प्रभाकर पुराणिक यांनी बालमनाची सखोल जाण आपल्या लिखाणाहून दाखविली आहे. जुन्या काळात कुमारी लीला देशमुख यांनी बालकांच्यासाठी बालसन्मित्र पाक्षिकातून उत्तम, चटकदार, ज्ञानवर्धक प्रवास वर्णने लिहिलेली आहेत. श्री मधुकर आष्टीकरांनी संतचरित्र नाटय दिलेले आहे. तर जळगांव जामोद येथील जोशी यांनी शालेय रंगभूमीवर रंगणाऱ्या नाटिका दिल्या आहेत. अनेक वैदर्भीय लेखकांनी–लेखिकांनी अनेक प्रकारची देण दिली आहे. श्री. दिनकर देशपांडे, प्रभाकर पुराणिक, प्रभाकर, शिरास, श्री. भा. श्री. परांजपे यांना सरकारी पुरस्कारही मिळाले आहेत.

वैदर्भीय बालवाङ्मयाचा भविष्यकाल अधिकाधिक प्रकाशमान होत आहे. पण अजून विज्ञान कथा, विज्ञान नाटय याची उणीव आहे. बदलत जाणाऱ्या आणि प्रगत होत जाणाऱ्या विज्ञान जगात ही बालकांची भूक भागविणे आवश्यक आहे. तसेच ग्रामीण भागातून तयार होत असलेल्या वैदर्भीय बालवाचकांना त्यांच्या जगातले, त्यांना जवळीक व जिव्हाळा वाटेल असे विषय निवडून लेखन करणेही आवश्यक आहे. एरवी त्यांची नव्याने निर्माण झालेली वाचन–तृष्णा कोण भागविणार !

विदर्भ साहित्य संघाने हे पहिले बालसाहित्य संमेलन भरविले याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन ! पण बालसाहित्य ही एक चळवळ व्हायला हवी. विदर्भ साहित्य संघाच्या आज चाळीसच्या जवळपास शाखा आहेत. वर्षा–दोन वर्षात उत्साही कार्यकारिणीमुळे त्या शंभरही होतील. या सर्व शाखांचा उपयोग ही बालवाङ्मयाची चळवळ बांधण्यास, फोफावण्यास करून घेतला पाहिजे. ही चळवळ नागपूर–व्यापी नको, विदर्भ–व्यापी हवी.

□ □

वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे

बुक फायनान्स कार्पोरेशन हवे

कोणत्याही लेखकाला आपलं लेखन पुस्तकरूपानं जगापुढं यावं असं वाटणं स्वाभाविक असतं आणि दर्जेदार लेखन करणाऱ्यांची संख्या विदर्भात कमी आहे असंही नाही. मग अशा गुणी लेखकांचा शोध घेऊन, त्यांच्या साहित्याचा संग्रह आरण आवर्जून प्रसिद्ध करावा असं विदर्भातील प्रकाशकांना का वाटत नाही ? आमच्या प्रकाशकांच्या ठिकाणी तेवढं धाडस नाही असं मी म्हणणार नाही. माझ्या मते ह्या प्रश्नाचं उत्तर अगदी स्पष्ट आहे आणि ते म्हणजे अशी पुस्तकं प्रकाशित करणं आमच्या प्रकाशकांना व्यवसायदृष्ट्या परवडत नाही ! त्यामुळेच अशा प्रकाशकांच्या अभावी स्वत: लेखकानंच प्रकाशक बनण्याचा प्रकार आपणाकडे बऱ्याच मोठ्या प्रमाणात दिसून येतो. कै. अप्रबुद्ध ह्यांची 'वैदिक संस्कृति माला', प्रा. श्री. मा. कुळकर्णी ह्यांच्या पुस्तकांचे प्रकाशन करण्यासाठी मुख्यत्वेकरून निघालेलं 'उन्मेष प्रकाशन', प्रा. भा. श्री. परांजपे ह्यांचे 'पद्मश्री प्रकाशन', 'व्रजवासी' आणि प्रा. वामन पात्रीकर या दोघांचे 'समन्वय प्रकाशन', सौ. शैलजा काळे यांचे 'ज्ञानेश प्रकाशन', डॉ. भाऊ मांडवकरांचे 'सेवा प्रकाशन', विदर्भ साहित्य संघाचे विद्यमान अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांचे 'श्रीवत्स प्रकाशन', डॉ. सुभाष सावरकर ह्यांचे 'समीर प्रकाशन' इत्यादींचा या संदर्भात उल्लेख करावासा वाटतो. अर्थात, ह्यातल्या काही प्रकाशनांनी अन्य लेखकांची पुस्तकंही प्रसिद्ध केलेली आहेत ही गोष्ट खरी आहे. परंतु सामान्यपणे पाहता वरील प्रकाशनं मुख्यत्वेकरून त्या त्या लेखकाच्या साहित्यकृती प्रकाशित करण्याच्या एकमेव उद्देशानं जन्माला आलेली आहेत. अशा हौशी प्रकाशकांच्या अस्तित्वानं विदर्भातला ग्रंथव्यवहार फारसं बाळसं धरू शकत नाही...शकणार नाही, हे अगदी स्पष्ट आहे ! विदर्भातील ग्रंथव्यवहार सर्वांगांनी प्रगत व्हावा असं संबंधितांना खरोखरीच वाटत असेल, तर विदर्भात हौशी प्रकाशकांपेक्षा व्यावसायिक प्रकाशकांची संख्या वाढेल या दृष्टीनं प्रयत्न व्हायला हवा आहे. हौशी प्रकाशक, संबंधित प्रकाशनातली आपली गुंतवणूक तेवढी निघाली की पुरे, या अल्पसंतुष्ट व आत्मसंतुष्ट दृष्टीनं त्या प्रकाशनाकडे बघत असतो. ग्रंथव्यवहारात सहभागी असलेल्या वितरक, मुद्रक इत्यादी अन्य घटकांचाही व्यवसाय नेहमीसाठी सुखरूप चालत राहू शकेल अशी हमी अशा हौशी प्रकाशकांच्या कडून फारशी मिळू शकत नाही, कारण त्यांची प्रकाशनंच मुळी नैमित्तिक असतात. त्यांच्यात सातत्य नसते. आपली पुस्तकं जर आपणसुद्धा प्रसिद्ध केली नाहीत तर मग ती कधीच निघणार नाहीत अन् मग साहित्य-विश्वात आपण दुर्लक्षित, उपेक्षित राहू अशी भीतीही अशा प्रकाशनाच्या पोटी असते. त्यामुळं अशा प्रकाशकांना ग्रंथप्रसिद्धीचा क्षण हाच सर्वोच्च आनंदाचा क्षण वाटत असतो. अर्थलाभ वगैरे बाबी त्यांच्या दृष्टीनं गौण असतात ! अर्थातच, ग्रंथव्यवहाराच्या निरामय विकासाच्या दृष्टीनं ही तात्कालिक ग्रंथनिर्मिती फारशी उपकारक होण्याचा संभव नाही हे उघड आहे व म्हणूनच व्यावसायिक

विदर्भ साहित्य संघाने ३ सप्टेंबर ८३ रोजी नागपूर येथे आयोजिलेल्या प्रथम ग्रंथ-व्यवहार परिषदेचे अध्यक्ष डॉ. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे यांच्या अध्यक्षीय भाषणाचा अंश.

अनुक्रमणिका

प्रकाशकांनी आपल्या क्षेत्रातील गुणी लेखकांचा शोध घेऊन त्यांची पुस्तक प्रकाशित करण्याची, आहे त्याहूनही अधिक धडाडी दाखविली पाहिजे.

मागासलेपण

ही धडाडी व्यावसायिक प्रकाशकांनी दाखविली पाहिजे असं म्हणणं हा आदर्शवाद झाला. परंतु ती धडाडी त्यांना दाखवता यावी इतपत सुदृढता त्यांच्या अंगी आहे काय याचाही विचार केला पाहिजे. मला स्वतःला विदर्भातील व्यावसायिक प्रकाशन संस्थांची आजची अवस्था फारशी स्पृहणीय वाटत नाही. विदर्भातील प्रकाशन–महर्षी म्हणून ज्यांना आपण गौरव करतो त्या श्री. दिगंबर मारुती घुमाळ ह्यांच्या 'नागपूर प्रकाशना'चा अपवाद केल्यास या प्रदेशात आजही सातत्यानं प्रकाशनकार्य करणारी जुनी प्रकाशन–संस्था अभावानंच आढळेल. प्रा. श्री. ना. बनहट्टी ह्यांची 'नवभारत ग्रंथमाला', श्री. ना. हुद्दार ह्यांची 'अभिनव ग्रंथमाला' ह्यांच्यासारख्या ध्येयवादी ग्रंथमालांनी एके-काळी येथील ग्रंथप्रकाशनाच्या क्षेत्रात चांगला लौकिक प्राप्त केला होता. श्री. गर्गे यांचं 'वीणा प्रकाशन', आज अस्तंगत झालेल्या 'सुषमा' मासिकाचे संपादक श्री. कुंडलराय मोहेकर ह्यांचं 'पराग प्रकाशन', डॉ. ल. वा. पडोळे यांचं 'पूजा प्रकाशन', अमरावतीची 'महाराष्ट्र नाग–विदर्भ' ही दोन प्रकाशनं यांनी काही काळ धडाडीनं प्रकाशन–कार्य केलं खरं; पण आज ती अस्तंगत झाली. नागपूरच्या 'सुविचार प्रकाशन'ची सूत्रं आज पुण्यावरून संभाळली जात आहेत! या खेरीज जुन्या वाङ्मयीन नियतकालिकांतून नागपूरची 'वागीश्वरी ग्रंथमाला', अमरावतीची 'विदर्भ प्रकाशन संस्था', डॉ. वि. भि. कोलते यांचा 'लव्हाळी' हा कवितासंग्रह प्रकाशित करणारी 'विदर्भ साहित्यमाला' यासारख्या काही प्रकाशन संस्थांचा नैमित्तिक उदय झाला होता असं वाचायला मिळतं. पण त्यांचा फार मोठा प्रकाश पडण्यापूर्वीच त्या संस्था नामशेष झाल्या. आज विदर्भातल्या ग्रंथप्रकाशन व्यवसायाची धुरा संभाळण्याचं काम 'अमेय प्रकाशन', 'विजय प्रकाशन', 'वसुधा प्रकाशन', 'सुविचार प्रकाशन', 'ज्ञानेश प्रकाशन', 'प्रभा प्रकाशन', 'राधेय प्रकाशन', 'सुनील प्रकाशन', 'मंगल आणि कौस्तुभ प्रकाशन', 'चंद्रकांत प्रकाशन', 'नेत्रा प्रकाशन', 'साहित्य प्रसार केंद्र', 'हिंदुधर्म संस्कृति–मंदिर' इत्यादिकांच्या द्वारा पार पाडलं जात असलं आणि यांपैकी काहींनी एकूणच मराठी प्रकाशन क्षेत्रात आपली विशिष्ट अशी प्रतिमा प्रभावीपणे उभी केली असली, तरी, महाराष्ट्र प्रदेशातील एकूण ग्रंथनिर्मितीच्या संदर्भात आपले प्रयत्न तुलनेनं बरेच थिटे पडतात हे मान्य करावेच लागेल! मुंबई, पुणं, कोल्हापूर आणि औरंगाबाद या महाराष्ट्रातील अन्य ग्रंथनिर्मिती केंद्रांच्या तुलनेनं आपण ग्रंथनिर्मितीत व पर्यायानं त्यावरच अव-लंबून असलेल्या ग्रंथव्यवहारात बरेच मागे आहोत. ग्रंथव्यवहारातलं आपलं हे मागासलेपण आपण निःसंकोचपणानं मान्य केलं पाहिजे.

कारणे कोणती ?

या मागासलेपणाचं कारण काय असावं? विदर्भातील जनतेत वाङ्मयीन अभिरुचीची जोपासना करण्यात आपण थिटे पडतो काय? विदर्भ–मराठवाडा बुक कंपनी किंवा प्रसाद प्रकाशन यांच्या वेद–पुराणे अथवा रामायण–महाभारत प्रकाशित करण्याच्या लक्षावधी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी योजना पुण्यामध्ये विलक्षण यशस्वी होत असताना, किंवा 'ललित', 'साहित्य सूची'सारख्या वाङ्मयीन नियतकालिकांतून नवप्रकाशित मराठी पुस्तकांची उदंड जाहिरात प्रसिद्ध होत असताना; विदर्भभूमीची कूस मात्र हव्या त्या प्रमाणात उजवू नये याचं काय कारण असावं?–असे प्रश्न मला पडतात. वास्तविक आपणही आता पुस्तकाच्या अंतरंगाइतकंच त्याच्या बाह्यांगाकडेही काळजीपूर्वक लक्ष पुरवू लागलो आहोत. उत्कृष्ट कागद, निर्दोष व सुरेख मुद्रण, टिकाऊ बांधणी, नेत्राकर्षक वेष्टनचित्र ह्या आजवर काहीशा दुर्लक्षित राहिलेल्या बाबींकडे आपण आता विशेष जागरूकतेनं बघू लागलो आहोत. आपल्या प्रकाशनांना पुण्या–मुंबईसारख्या अग्रेसर प्रदेशांतील प्रकाशनांशी

मुकाबला करायचा आहे याची आपणाला पूर्ण जाणीव आहे. अर्थात् काही अपरिहार्य कारणांमुळं आपणाला अपेक्षेनुरूप यश या बाबतीत मिळत नाही हे खरं, तथापि निर्मितिमूल्याबाबत आपण आता अन्य प्रदेशाहून मागं आहोत असं नाही. असं असूनही विदर्भातील प्रकाशनं अन्य प्रदेशातील प्रकाशनां-पेक्षा तुलनेनं अत्यंत कमी प्रमाणात खपतात, असं का व्हावं ? आजही विदर्भातील प्रकाशनांचा मुख्य व बहुसंख्य ग्राहकवर्ग पश्चिम महाराष्ट्रातच आहे. विदर्भात त्याचं प्रमाण अत्यंत कमी आहे! याचं कारण पश्चिम महाराष्ट्रातील सुशिक्षितांच्या प्रमाणापेक्षा विदर्भातील सुशिक्षितांचं प्रमाण कमी आहे हे असू शकेल का ? पूर्वी नागपूरसारख्या मध्यवर्ती ठिकाणी मॉरिस कॉलेजमधील 'शारदा मंडळ', हिस्लॉप कॉलेजमधील 'महाराष्ट्र भाषा संवर्धक मंडळ', सिटी कॉलेजमधील 'सरस्वत्युपासक मंडळ' यांसारख्या वाङ्मयमंडळांकडून नवसुशिक्षितांच्या ठिकाणी वाङ्मयीन अभिरुची निर्माण करण्याचा कटाक्षानं प्रयत्न केला जाई. आज ती प्रक्रिया संपुष्टात आलेली आहे का ? खरं तर, शिक्षणाचा आज विलक्षण वेगानं प्रसार होत आहे अन् त्यामुळं सुशिक्षितांची तशीच ग्रंथालयं-वाचनालयं यांची संख्या पूर्वीच्या मानानं कितीतरी पटींनी वाढलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे विदर्भातील लहान-मोठ्या ग्रंथालयांची संख्याच जवळजवळ आठशेहून अधिक असून कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांची, म्हणजेच पर्यायानं त्या महाविद्यालयांतील ग्रंथालयांची संख्या दीडहजाराहून अधिक आहे. माध्यमिक शाळांतील ग्रंथालयांचा यात समावेश नाहीच. अशा परिस्थितीत वैदर्भीय प्रकाशकांची पुस्तकं विदर्भातच फारशी खपू नयेत ही केवढी विलक्षण वाटणारी गोष्ट आहे! सुमारे पाच कोटींच्या वर लोकसंख्या असलेल्या या खंडप्राय महाराष्ट्रात नवप्रकाशित मराठी पुस्तकाच्या एक हजार प्रतीही वर्षभरात विकल्या जाऊ नयेत ? वर्षभरात त्याच्या तीन-चारशे प्रती खपल्या की पुस्तक उत्तम गेलं असं मानण्याची पाळी आमच्या प्रकाशकांवर यावी, याचा अर्थ काय ? 'स्वामी', 'राजा शिवछत्रपती', 'श्रीमान योगी' यांसारख्या अपवादात्मक पुस्तकांचा मी विचार करीत नाही. प्रयत्नांतीही न खपणाऱ्या कविता-संग्रहांचाही मी विचार करीत नाही. पण कथा-कादंबऱ्यांच्या बाबतींतही ही अवस्था असावी हे किती लाजिरवाणं आहे! संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी पुस्तकांच्या विक्रीचं हे चित्र आहे...विदर्भातील विक्रीबद्दल तर मग बोलायलाच नको हे चित्र बदलण्याच्या दृष्टीनं आपण जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवे आहेत.

अभिरुची-पोषण

विदर्भ साहित्य संघाच्या विविध शाखांच्या द्वारा या दृष्टीनं आपणाला हालचाल करता येईल असं मला वाटतं. 'ग्रंथाली'ची ग्रंथदिंडी, मॅजेस्टिकच्या 'साहित्यिक गप्पा', ग्रंथजत्रा, 'लेखक तुमच्या भेटीला' यासारखे पश्चिम महाराष्ट्रात लोकप्रिय ठरलेल्या वाचकाभिमुख उपक्रमांसारखे उप-क्रम आपणाला सुरू करून बघायला हरकत नाही. या उपक्रमांना अपेक्षित यश येईलच असं नाही, तथापि समाजातील साहित्यिक अभिरुचीचं पोषण होण्यास असे उपक्रम उपयुक्त ठरू शकतील असं मला वाटतं ! या संदर्भात आपणाकडं चालू असलेले काही उपक्रम अत्यंत स्पृहणीय आहेत. श्री. सुधीर देव यांची 'माग्रस' योजना व 'माग्रस मेळावा', विदर्भ साहित्य संघाच्या शिवाजी संदर्भ ग्रंथालया-द्वारा तसेच नागपूरच्या शासकीय विभागीय ग्रंथालयाच्या वतीनं चालविले जाणारे 'वाचक व्यास-पीठ' सारखे उपक्रम, वर्धा बुक क्लबची ग्रंथ प्रदर्शनं यांचा उल्लेख या दृष्टीनं महत्वाचा वाटतो. या व अशा उपक्रमांची व्याप्ती वाढायला हवी. विदर्भातील (व शक्य असेल तर विदर्भाबाहेरीलही) वृत्तपत्रांमधून इकडील नवप्रकाशित ग्रंथांवरील परिचयलेख वा परीक्षणलेख आवर्जून प्रकाशित करणं, 'युगवाणी' सारख्या प्रतिष्ठित वाङ्मयीन मुखपत्रातून विदर्भातील ग्रंथ प्रकाशनांचा वार्षिक आढावा स्वतंत्र विशेषांकाच्या स्वरूपात प्रसिद्ध करणं, 'तरुण भारत', 'लोकमत', 'नागपूर पत्रिका' यासारख्या लोकप्रिय दैनिकांमधून दैनिकांनी विदर्भातील विविध वाङ्मयीन उपक्रमांना कर्तव्यबुद्धीनं ठळकपणे प्रसिद्धी देऊन खेड्यापाड्यातील नवसाक्षर जनतेला नवप्रकाशित वैदर्भीय साहित्याची व

अनुक्रमणिका

साहित्यिकांची ओळख करून देणं इत्यादी मार्गांचा या दृष्टीनं अवलंब करून पाहण्याजोगा आहे. विदर्भातील वृत्तपत्रांनी, ग्रंथप्रकाशकांनी व ग्रंथवितरकांनी अशी उपक्रमशीलता प्रगट केल्यास विदर्भातील ग्रंथव्यवहारावर आज पडलेलं उदासवाणं सावट थोडया तरी प्रमाणात दूर होऊ शकेल असा मला विश्वास वाटतो. विदर्भातील प्रकाशन संस्था आणि वैदर्भीय लेखक यांच्या विषयीची व्यापक मान्यता जर आपणाला निर्माण करता आली तर आपल्याकडील ग्रंथव्यवहाराच्या उत्कर्षाच्या दृष्टीनं ते उपयुक्त ठरल्यावाचून राहणार नाहीं.

ग्रंथविक्रेता, ग्रंथवितरक

लेखक आणि प्रकाशक यांच्या इतकाच, किंबहुना एका अर्थी ग्रंथव्यवहाराच्या संदर्भात त्यांच्याहूनही अधिक महत्त्वाचा घटक म्हणजे ग्रंथविक्रेता किंवा ग्रंथवितरक हा होय. वाचकांपर्यंत ग्रंथ नेऊन पोहोचवण्याचं फार मोठं काम हा घटक करीत असतो. खरं तर ग्रंथव्यवहाराच्या बहुतेक नाडया यांच्याच हाती असतात. ग्रंथप्रकाशक व ग्रंथवितरक यांचं जीवनच परस्परावलंबी असतं. ज्या प्रकाशकांची स्वत:ची ग्रंथवितरणाची व्यवस्था असते तिथं हा व्यवहार चांगला चालतो. परंतु ज्या प्रकाशकांची अशी वितरण व्यवस्था नसते त्यांना सर्वस्वी या वितरकांवरच अवलंबून रहावं लागतं. अशा परिस्थितीत नवख्या वा हौशी प्रकाशकांची बरेचदा मोठी विचित्र कोंडी होऊन बसते ! या संबंधी अधिक तपशील इथं देण्याची आवश्यकता नाही. कारण आपण ते जाणताच. आजपावेतो प्रमुख वितरक हा सामान्यत: ३३ वा ४० टक्के कमिशन घेऊन ग्रंथवितरणाचं काम करीत असे. आता मात्र हे कमिशन किती मागावं याच्यावर फारसा धरबंद राहिलेला नाही असं दिसतं ! ३३ वा ४० टक्क्यांऐवजी आता ५० ते ६० टक्क्यापर्यंतही कमिशन मागितलं जातं, नव्हे प्रकाशकाकडूनच देण्यात येतं असं मी ऐकलं आहे. हे खरं असेल तर ग्रंथव्यवहारावरील ही एक फार मोठी आपत्ती होय, असंच म्हणावं लागेल ! अर्थात याला जबाबदार, ग्रंथव्यवहार हाच ज्यांचा उपजीविकेचा व्यवसाय नाही असे लेखक/प्रकाशक हेच आहेत. लेखनाची भरपूर हौस आणि ते लेखन प्रसिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेला पैसा सहजपणानं गुंतविता येण्यासारखी आर्थिक सुबत्ता ज्यांना दैवयोगानं लाभली असे लेखक–आणि लेखिका देखील–तसेच त्यांचे प्रकाशक ग्रंथविक्रेत्यांना भरमसाट कमिशन द्यायला मागंपुढं बघत नाहीत. आपल्या या करणीनं सारा ग्रंथव्यवहारच आपण नासवून टाकतो आहोत याचं भानही या उत्साही महाभागांना राहात नाही ! अर्थात, हे विक्रेतेही मग अन्य चिल्लर विक्रेत्यांना व ग्रंथालयांना अन्य प्रकाशक–विक्रेत्यांपेक्षा जास्त कमिशन देऊन आपल्या मालाचा उठाव करविण्यात यशस्वी ठरतात. मुंबई–पुण्याकडे असा व्यवहार आज अत्यन्त तेजीत झालेला आहे. व त्यामुळे बॉम्बे बुक डेपोसारख्या विशिष्ट आचार संहिता जपणाऱ्या ख्यातनाम संस्थेच्या चालकांना अत्यंत निराशेचे उद्‌गार काढावे लागत आहेत. अर्थात, या विक्रेत्यांचंही एक विशिष्ट तर्कशास्त्र आहे त्यांना त्यांच्या संस्था–ग्राहकांना कमीशन द्यावं लागत असल्यानं होणाऱ्या नुकसानीची भरपाई त्यांना ह्या मार्गानं करून घेण्याविषयी गत्यंतर नसतं हा त्यांचा अशा प्रसंगीचा युक्तिवाद असतो ! सध्याच्या परिस्थितीत तो कदाचित खराही असू शकेल ! मला मात्र विक्रेत्यांनी ग्रंथालयांना कमिशन कां द्यावं हे अजूनही कळलेलं नाही ! सर्वच ग्रंथालयं असं कमिशन घेणं हा आपला जन्मसिद्ध हक्क समजतात. फार काय, राजा राममोहन राय ग्रंथालय प्रतिष्ठानाच्या वतीनं होणाऱ्या शासकीय खरेदीवरही ३३ टक्के कमिशन द्यावं अशी अट घालण्यात येते. कदाचित, ही खरेदी साक्षात प्रकाशकाकडूनच केली जात असल्यानं ग्रंथविक्रेत्याला एरव्ही द्यावी लागली असती ती ३३ टक्क्यांइतकी रकम प्रकाशकानं आपणालाच द्यावी असा प्रतिष्ठानाचा युक्तिवाद असेल. आणि तो समर्थनीयही म्हणता येईल. पण अन्य विक्रेत्यांकडून (–प्रकाशकाकडून नव्हे !)–जी शासकीय वा खाजगी ग्रंथालयं ग्रंथखरेदी करतात त्या ग्रंथालयांनी त्या विक्रेत्यांना १० ते १५ टक्के कमिशन मागावं यामागं कोणतं तर्कशास्त्र आहे ? –(कधी कधी तर एवढं कमिशन देऊनही आपली येणे असलेली रकम लवकर मिळावी

म्हणून संबंधित ग्रंथपालांना वा संस्थाचालकांना आणखी जास्तीचंही कमिशन द्यावं लागतं असंही ऐकतो !) आजकाल ग्राहक आणि प्रकाशक या दोघांचा दुवा जोडणाऱ्या विक्रेत्याची उपेक्षा प्रत्यक्ष ग्रंथव्यवहाराशी संबंधित असलेल्या व्यक्तीही करू लागल्या असल्याचं विचित्र दृश्यही दिसून येतं. 'ग्रंथ प्रत्यक्ष पहा नि सवलतीत घ्या' अशा प्रकारची जाहिरात करून पुण्या-मुंबईच्या अनेक प्रकाशकांनी व वितरकांनी ग्रंथखरेदीवर सरसकट २५ ते ३३ टक्के सवलत देण्याचं घोषित केलं असल्याचं 'ललित', 'साहित्यसूची' इत्यादी नियतकालिकांतील जाहिरातींवरून स्पष्ट होतं.–यामागं सवलतीच्या मोहानं आपली ग्रंथविक्री लवकर व्हावी व ग्रंथप्रकाशनात गुंतलेली रकम लवकर मोकळी व्हावी ही भूमिका प्रभावी आहे हे खरं असलं तरी त्यामुळं मध्यस्थ ग्रंथविक्रेत्याच्या व्यवसायावर त्याचा थोडा तरी विपरीत परिणाम झाल्यावाचून राहणार नाही, इतकंच नव्हे तर एका प्रकारची रोगट स्पर्धा ग्रंथव्यवहाराच्या क्षेत्रात त्यामुळं निर्माण होण्यांची भीती वाटते !– मला वाटतं, या संदर्भात एकूणच ग्रंथव्यवहारासाठी सर्व संबंधितांनी काही एक आचारसंहिता निश्चित करणं आवश्यक आहे. टक्केवारीतील या घातक स्पर्धेमुळे सारा ग्रंथव्यवहारच खालच्या पातळीवर उतरतो आणि परिणामी ग्रंथप्रकाशन व ग्रंथवितरण या दोन्ही क्षेत्रांवर विपरित परिणाम होऊन बसतो ! हे टाळण्याच्या दृष्टीनं काय करता येईल याचाही आपण विचार केला पाहिजे. आपला ग्रंथखरेदी करणारा मुख्य ग्राहकवर्ग हा शासकीय अनुदान मिळणाऱ्या ग्रंथालयांचा आहे. अशा ग्रंथालयांना कमिशन देण्याची तशी काहीच गरज नसावी. विशेषतः नवप्रकाशित पुस्तकांवर तर ते मुळीही देण्यात येऊ नये ! तर्कशून्य कमिशन पद्धतीमुळे ग्रंथाच्या किमती अवाजवी वाढतात व सर्वसामान्य ग्रंथप्रेमी ग्राहक मात्र व्यर्थ नाडला जातो, किंवा ग्रंथ खरेदी करण्यापासून तो परावृत्त होतो ! कमिशन द्यायचं झालंच तर ग्रंथखरेदीसाठी विक्रेत्याकडे आवर्जून जाणाऱ्या वैयक्तिक ग्राहकाला द्यायला हवं पण तसं सहसा होत नाही.

विक्री-किंमत

कागद, मुद्रण, ग्रंथबांधणी यांच्यावर होणाऱ्या खर्चात भरमसाट वाढ झाल्यानं ग्रंथाच्या किमती मुळातच वाढवाव्या लागत आहेत; त्यात या कमिशन-पद्धतीमुळं निष्कारण वाढ करावी लागते. शिवाय, कमिशनच्या मोहापायी, कमी कमिशन मिळवून देणारे दर्जेदार ग्रंथ बाजूला सारून सामान्य दर्जाचे ग्रंथ खरेदी करण्याचा मोह संबंधितांना होऊ शकते. परिणामी चांगली दर्जेदार पुस्तके बाजूला पडून राहतात ! ग्रंथव्यवहार आदर्श ठरण्यासाठी या व्यवहाशी संबंधित अशा लेखक, प्रकाशक, वितरक या तीनही प्रमुख घटकांना, त्यातही प्रकाशक-वितरक ह्यांचा चरितार्थाचा बहुधा तोच एक व्यवसाय असल्यामुळे त्यांना ग्रंथव्यवहार हा आर्थिक दृष्ट्या लाभदायक होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा हा व्यवसाचच अधिकाधिक मंदीकडे झुकण्याची भीती वाटते. प्रसिद्धपूर्व सवलती व विक्री कमिशन यामुळे प्रकाशक भरमसाट किंमती ठेवतात व गब्बर होतात असाही एक भ्रम ग्रंथव्यवहाराशी संबंधित नसलेल्या सामान्य जनांच्या मनात उत्पन्न होतो. कदाचित् लेखकापेक्षा प्रकाशकांची निवासस्थानं अधिक भव्य, श्रीमंती थाटाची क्वचित कुठं दिसतात त्यामुळंही हा भ्रम उत्पन्न होत असावा. परंतु, पाठ्य-पुस्तकांचं हमखास पैसा मिळवून देणारं प्रकाशन-कार्य आता विद्यापीठानं अन् शासनानं आपल्या हाती घेतल्यानं, निव्वळ वाङ्मयीन स्वरूपाचे प्रकाशन करणाऱ्या प्रकाशकाला भरपूर अर्थलाभ होऊ शकतो हे म्हणणं फारसं सयुक्तिक नाही, असा माझा तर्क आहे ! या मुद्याच्या स्पष्टीकरणार्थ एक उदाहरण देतो. ज्याच्या केवळ एक हजार प्रतीच प्रसिद्ध केल्या आहेत. अशा एका प्रकाशित ग्रंथाचं विक्रीमूल्य समजा १०० रु. ठेवलं आहे आणि प्रत्यक्ष त्या ग्रंथाचा निर्मितीचा खर्च केवळ २५ रु. आहे. अशा, म्हणजे विक्रीमूल्य हे निर्मिती खर्चाच्या चौपट ठेवलेलं आहे अशा परिस्थितीत प्रकाशकाच्या हाती शेवटी काय उरतं हे पाहणं मोठं

मनोरंजक वाटेल. ग्रंथ–प्रकाशनाच्या निमित्तानं प्रकाशकाला येणाऱ्या अन्य व एकूण खर्चाची टक्केवारी अशी–

१. निर्मिती खर्च–२५ टक्के.
२. गुंतविलेल्या रकमेवरील व्याज–१५ टक्के.
३. लेखकाची रॉयल्टी–१५ टक्के.
४. प्रमुख वितरकाचं कमिशन–४० टक्के.
५. जाहिरात, पोस्टेज इ–१० टक्के.

या संपूर्ण टक्केवारीची बेरीजच मुळी १०५ टक्के होते ! यातून प्रकाशकाचा लाभ, जागाभाडं, पहिल्या वर्षी संपूर्ण गुंतवणूक निघाली नाही तर नंतरच्या वर्षीही उरलेल्या कर्जावर द्यावं लागणारं व्याज इ. ची तरतूद करावी लागणार ! हे चित्र पाहिलं की आजच्या प्रकाशन क्षेत्रातील समस्या केवढी जटिल आहे याची कल्पना येईल. कदाचित हे उदाहरण देण्यात माझ्याकडून चूकही झाली असेल. पण ग्रंथ प्रकाशन हे सर्वसामान्यांना वाटतं तितकं सुखदायक काम नाही एवढं मात्र आपल्याला मान्य करावं लागेल. यासाठीच प्रकाशन पूर्व सवलतीच्या माध्यमातून ग्रंथनिर्मितीसाठी व्याजमुक्त निधी उभारण्याचे प्रयत्न प्रकाशक करीत असतात. क्वचित लेखकाकडूनही ते अशा निधी साह्याची अपेक्षा बाळगीत असतात. अशा वेभरवशाच्या धडपडीपेक्षा प्रकाशक परिषदेचे अध्यक्ष श्री. अ. ह. भावे ह्यांनी प्रस्तुत व्यवसायाच्या भल्यासाठी 'फिल्म फायनान्स कॉर्पोरेशन' च्या धर्तीवर 'बुक फायनान्स कॉर्पोरेशन' अस्तित्वात यावं अशी जी सूचना केली आहे ती मला अत्यंत उपयुक्त वाटते. तिचा पाठपुरावा आपण करायला हरकत असू नये. पुस्तक–प्रकाशनाच्या या व्यवसायाला जर सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्य असेल तर हा व्यवसाय जगला पाहिजे...प्रतिष्ठेनं जगला पाहिजे आणि त्यासाठी बँकेकडून बिनव्याजी वा अल्पव्याजी कर्ज मिळाले पाहिजे असा सर्व साहित्य संस्थांनी, तसंच साहित्य महामंडळानं एकमुखी आग्रह धरला पाहिजे ! मागासलेल्या विभागांच्या उन्नतीसाठी शासन नेहमीच प्रयत्नशील राहात आलेलं आहे. मराठीच्या ग्रंथव्यवहारात विदर्भ विभाग हा मागास–विभाग असल्याचं मान्य करून शासनानं निदान विदर्भासाठी तरी अशी तरतूद करावी असा आग्रह आपल्या लोकप्रतिनिधींसह सर्व संबंधितांनी धरावा असं मला वाटतं !

■ ■

विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

कार्यवृत्त (१६ जून ते ३१ ऑगस्ट ८३)

स्मृतिदिन : कै. वि. रा. हुंबर्डे (१६ जुलै), श्रीमंत कै. बापुराव देशमुख (११ जुलै), लोकमान्य टिळक (१ ऑगस्ट), साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास (११ ऑगस्ट), कै. पु. भा. भावे (१३ ऑगस्ट), लोकशाहीर अण्णाभाऊ साठे (२७ऑ.)

विशेष १. कै. वि. रा. हुंबर्डे स्मृतिदिनी अमरावती येथे कार्यकारणीची विशेष सभा आणि कै. हुंबर्डे यांच्या निवासस्थानी त्यांना आदरांजली.

२. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांच्या पुण्यतिथीनिमित श्री. बाळासाहेब भारदे यांची दोन भाषणे ११ व १२ ऑगस्ट रोजी, विषय : संताचे धर्मकारण व समाजकारण सहकार्य : 'रसिक' आणि श्रीमती वीणाताई हरदास.

३. रवींद्र जयंती : सौ. अरुंधती देशमुख यांचे रवींद्र संगीत (७ ऑगस्ट)

४. पु. भा. भावे स्मृतिदिनीनिमित श्री. अशोक चिटणीस आणि कु. मुग्धा चिटणीस यांचे कथाकथन.

५. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मृतिदिनी परिसंवाद, अध्यक्ष प्रा. या. वा. वडस्कर, वक्ते : ताराचंद्र खांडेकर, नानासाहेब कठाळे, डॉ. वि. स. जोग नंतर गीतगायन : श्री. माणिक उभाळे व एन. एम. भावे .

नाट्यप्रकल्प : नागपूरच्या हौशी कलाकारांसाठी नव्या महत्वाकांक्षी नाट्यप्रकल्पाबाबत श्री. कमलाकर सोनटक्के यांची कलाकारांसोबत चर्चा (३ जुलै)

महिला एकांकिका स्पर्धा : २१ ते २३ जुलै ८३

शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे सौ. सुलभा हेर्लेकर यांचे इंदिरा संत यांच्या 'गर्भ रेशीम' या काव्यसंग्रहावर समीक्षात्मक भाषण (४ ऑगस्ट),

भाषणे : कन्नड कवी श्री. सनदी यांचे भाषण, विषय : समकालीन कविता (२६ ऑगस्ट)

सत्कार : वि. सा. संघाचे माजी अध्यक्ष डॉ. वि भि. कोलते यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त सत्कार समारंभ अध्यक्ष : कुलगुरु श्री. गुलाबराव कदम, वक्ते डॉ. वि. बा प्रभुदेसाई, डॉ. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे, डॉ रू. पां. पांजणकर (२२ जून)

शिवचरित्रकार श्री. बाबासाहेब पुरंदरे यांचा षष्टयब्दिपूर्ती समारंभ, प्रमुख उपस्थिती : श्री. विजयराव देशमुख, सहकार्य : श्री छत्रपती सेवा प्रतिष्ठान व साहित्य प्रसार केंद्र (६ ऑगस्ट)

कविसंमेलन : वर्षागीतांचा कार्यक्रम, १६ कवयित्रींचा सहभाग अध्यक्ष : डॉ इंदुमती शेवडे (२२ ऑगस्ट)

उर्दू उर्दू अभ्यासवर्गाच्या तेराव्या सत्राचा प्रारंभ (१ ऑगस्ट)

भेट : राज्यमंत्री ना. यशवंत शेरेकर (८ ऑगस्ट)

सभा : वि. सा. संघाच्या कार्यकारिणीची सभा आणि आमसभा (२४ जुलै)

चित्रकला प्रदर्शन : 'कलाचित्रा'च्या सहकार्याने मृणालिनी भालेकर, रेखा माथूरकर, प्रभाकर पाटील व सुरेश देवसंत यांच्या चित्राचे प्रदर्शन (७ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट)

नवीन आजीव सभासद

शिरीष भगवंत तिडके मूर्तिजापूर, पंढरीनाथ सीताराम गोडे मूर्तिजापूर, कृष्णा गणपतराव लुटे नागपूर, समींदरनाथ खत्रा नागपूर, मुकुंद बळवंत काशीकर नागपूर, सौ. विजयालक्ष्मी श्रीहरी अणे नागपूर, अनंत वामन कोल्हे नागपूर, साहेबराव बाजीराव पाटील नागपूर, प्रा. जयंत कुमार गणपतराव बंड काटोल, मोहन रामचंद्र लपालकर नागपूर, अनिल यशवंत आठल्ये नागपूर, परमचंज उदेराज ओसवाल खामगाव, गोविंद पांडुरंग पाटील खामगाव, डॉ. विजय दत्तात्रय गर्गे खामगाव, डॉ सुरेंद्र सूरजमल जैन खामगाव, सौ. आशा गरच्चंद चिटणीस पुणे, विलास जी. जाधव पुणे, मुकुल खोत नागपूर, चंद्रकांत रघटाटे नागपूर.

नव्या शाखा

अचलपूर, अंजनगाव सूर्जी, मोझरी, नेरपिंगळाई, वरोरा, उमरखेड.

शाखावृत्त

गोंदिया २ ऑगस्टला आमसभा, नवे पदाधिकारी

अध्यक्ष श्रीमती मनोरमाबाई धोटे, कार्यकारी अध्यक्ष : अॅड. नानासाहेब तनखीवाले, उपाध्यक्ष डॉ. विजय वोरीकर, वसतराव राजेपांडे व सौ. शालिनीबाई कुळकर्णी, सचिव : माधव पुराणिक, सहसचिव रमेश कोतवाल, शरद रामचंद्र उपाध्ये व प्रकाश देशपांडे, कोषाध्यक्ष : नारायणराव बापट, निरीक्षक : वसंतराव देव व वासू भारद्वाज

अचलपूर : पु भा. भावे स्मृतिदिनानिमित्त प्रा. श्रीकांत तिडके यांचे भाषण, विषय : दलित व ग्रामीण साहित्य, अध्यक्ष : डॉ. दा. ल. अहोणी (१५ ऑगस्ट).

गोंदिया : देशभक्ती गीत स्पर्धा : प्रथम पारितोषिक : जे. एम. पटेल, द्वितीय : नगरपरिषद कन्या, तृतीय : श्रीमती सरस्वती महिला, वैयक्तिक : कु मीना चिचोळकर, कु. संध्या गलांडे, कु. स्वामी वाघमारे बक्षीसमारंभ श्री. म ना. जोशी यांच्या हस्ते (१५ ऑगस्ट).

चंद्रपूर नवे पदाधिकारी, अध्यक्ष : डॉ. शरदचंद्र बि. सातफळे, उपाध्यक्ष गंगाधर वैरागडे, अॅड. विजय मोगर, कोषाध्यक्ष : अ. ज. राजूरकर, सरचिटणीस : मुकुंद ढगे.

भाषण : प्रा. राम शेवाळकर, विषय 'शिवरायाचा आठवावा प्रताप', रात्री साहित्य-चर्चा (१ मे), श्री. बाळासाहेब भारदे यांना भेट (१३ जुलै)

बुलडाणा : नवे पदाधिकारी अध्यक्ष : अरविंद देशपांडे, उपाध्यक्ष गो. या. सावजी, सचिव : सर्जेराव चव्हाण, सहसचिव : रंगनाथ गायकवाड, कोषाध्यक्ष : नेमीनाथ सातपुते, परिसंवाद : भारतीय लोकशाहीची वाटचाल, अध्यक्ष : श्री. अरविंद देशपांडे, वक्ते : सुहास कुळकर्णी, प्रा. खरात, प्रा. कुल्ली, अॅड. व्ही. डी. पाटील, अॅड. आप्पासाहेब कानिटकर, प्रकाश कराळे, जैवीराज गावंडे, बावा कुळकर्णी (२० ऑगस्ट)

वणी : आमसभा, श्री. नानाजी भागवत यांचा गौरव, (२२ जुलै) नवे पदाधिकारी : अध्यक्ष : श्री. ल. ग. उपाख्य दादासाहेब कडू, उपाध्यक्ष : ना. रा. भागवत, कार्याध्यक्ष : माधव सरपटवार, सरचिटणीस :कृष्णा लाडसे चिटणीस गुलाब भेदोडकर, सुभाष उसेवार.

लाखनी : नवे पदाधिकारी अध्यक्ष : ह म. बोरकर, उपाध्यक्ष : र. स. गिऱ्हेपुंजे, दा. सी. शिवणकर, सरचिटणीस : द. सा. बोरकर, चिटणीस : ना. ह. भुरे, कोषाध्यक्ष : भा. गो. वंजारी, आमसभेत कै वसंतराव देशपांडे यांना श्रद्धांजली (२१ ऑगस्ट)

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस, वि. सा. संघ नागपूर

॥ साभार पोच ॥

□ चमच्यांचे सम्मेलन / ज्ञानेश वाकुडकार / सूर्य प्रकाशन १८९, गणेशनगर, नागपूर ९ / पाच रुपये / पृ. ३२ □ विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९८२ / संपादक, श्री. मा. कुळकर्णी / श. गो. कोलारकर कार्यवाह विदर्भ संशोधन मंडळ, पश्चिम हायकोर्ट मार्ग नागपूर / पंधरा रुपये / पृ. २११ □ चावडी / दया पवार / सौ. हिरा पवार १३ / १०० सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.) मुंबई ४००१०४ / पृ. १६७ □ पाण भवरे / आनंद यादव / मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई ४००००४ / एकतीस रुपये / पृ. १९५ □ कला आणि मानव / बाळ सिताराम मर्ढेकर / मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई ४००००४ / सोळा रुपये / पृ. ८६ □ चि. त्र्यं. खानोलकरांच्या शोधात / जया दडकर / १७७ खेतवाडी बँक रोड गिरगाव मुंबई-४ / पंचावन रुपये / पृ. २२३ □ भ्रमिष्टाचे शोकगीत / तुळशीराम काजे / मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई-४ / साडेसात रुपये / पृ. ५५ □ उन्हांतल्या चांदण्यात / दत्ता हलसगीकर / विलास पाटील, भुईकोट प्रकाशन, ८२ रल्वे लाईन्स, सोलापूर / दहा रुपये / पृ, ६० □ कुरुक्षेत्रावरील वर्तुळे / गौतम सूर्यवंशी / रेणुका प्रकाशन ९५ अ विद्यानगर (पूर्व) सेलू जि. परभणी / आठ रुपये / पृ. ५७ □ ते अज्ञात बेट / सुभाष सोनवणे / सौ. यशोदा सोनार / चेतश्री प्रकाशन, अमळनेर जि. जळगाव / वीस रुपये / पृ. ११४ □ धुमधडाका / वि. शा. काळे / काळे ब्रदर्स पब्लिकेशन, शामसदन ६० सोमवारपेठ पुणे-११ / बारा रुपये / पृ. १५० □ एका कवीच्या वरगड्या-वर / जीवन बळवंत आनंदगावकर / प्रजित प्रकाशन जिंतूर कॉलनी, सेलू जि. परभणी / दहा रुपये / पृ. ५३ □ आभाळमाया / गिरिजा कीर / सौ. ज्योती आसरकर १४ ए 'अनुराधा' नेव्हीनगर, कुलाबा, मुंबई-५ / पंचवीस रुपये / पृ. १७९ □ भूकंप / सुरेंद्र नाईक / निर्मळकुमार सूर्यवंशी, निर्मळ प्रकाशन कृष्णाई, कैलासनगर, नांदेड / दहा रुपये / पृ. ४८ □ बखर वाङ्मय / डॉ. बापूजी संकपाळ / रा. धो. दास्ताने, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, ४५६ रविवारपेठ, पुणे २ / पंचेचाळीस रुपये / पृ. २१८ □ २० व्या शतकाअखेरच्या कविता / विजयराजे इंगळे / सतीश थावलकर, नवोन्मेष प्रकाशन, वर्धमाननगर, नागपूर ७ / दहा रुपये / पृ. ९६ □ आभास / उषा मेहता / सौ. यशोदा सोनार. चेतश्री प्रकाशन, देशमुख चाल, अंमळनेर / वीस रुपये / पृ. १६ □ जिव्हार / रविन्द्र दामोदर लाखे / सौ. मालती दामोदर लाखे संवाद प्रकाशन, लेले वाडा, टिळक चौक कल्याण ४२१३०१ / दहा रुपये / पृ. ६२ □ मराठी संशोधन पत्रिका मार्च-एप्रिल / मे-जून / ८३ / मराठी संशोधन मंडळ मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई-१४ / प्रत्येकी रु. सहा / पृ १४८, १८८ □ निळाई / सुलभा हेर्लेकर / अमेय प्रकाशन, २ विजयानंद बिल्डिंग, धंतोली नागपूर / दहा रुपये / पृ. ३३ □ अमेरिका एक तत्त्वज्ञानाने झपाटलेला देश / द. व्यं. जहागीरदार / अमेय प्रकाशन, २ विजयानंद बिल्डिंग नागपूर / वीस रुपये / पृ. ११७ □ हिंदुत्व दर्शन / डॉ. द. न. गोखले / सुविचार प्रकाशन मंडळ, ४६१ / ४ सदाशिवपेठ, पुणे ३० / चाळीस रुपये / पृ. १९८ □ रत्नकांबळ / शांतीलाल भंडारी / चिरायू प्रकाशन, स्वामीकृपा, पारिजात सोसायटी पुणे ३७ / पन्नास रुपये / पृ. २४० □ योजना / पंजाब शिरमाते / निर्मला सावरकर, समीर प्रकाशन, अमरावती / पंधरा रुपये / पृ. १६५ □ आनंदयात्री / गजानन पिंगळे / सौ. शोभना पुरोहित प्रकाशन, ब्रह्म बंगला, म. गांधी रस्ता विष्णूनगर डोंबीवली (प.) ४२१२०२ / दहा रुपये / पृ. ७५ □ पक्षी जाय दिगंतरा / मारुती चितमपल्ली / साहित्य प्रसार केंद्र, सिताबर्डी, नागपूर / वीस रुपये / पृ. १०६ □ मोहिम इंद्रावतीची / जगदीश गोडबोले / दिनकर गांगल / ग्रंथाली प्रकाशन ३४ / ९०२ नेहरूनगर, कुर्ला (पूर्व) मुंबई-२४ / दहा रुपये / पृ. ९२ □ गांधी मला भेटला (कविता पोस्टर) / वसंत दत्तात्रेय गुर्जर / प्रकाशक अशोक शहाणे, प्रास प्रकाशन, कांदिवली (पूर्व) मुंबई / रेखाटन बाळ ठाकूर / मूल्य दोन रुपये.

□ □

अनुक्रमणिका

Yugwani : Regd. No. NGP. 207
युगवाणी जुलै/ऑगस्ट ८३ मूल्य

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर- १२
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर- १२
मुखपृष्ठ मुद्रण : मधुकर आर्ट्स, नागपूर

अनुक्रमणिका